16-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

BGO/ 10:30

16-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1

BGO/ SBT/ KTG/ 10:30

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.राम पंडागळे)**

**पृ.शी.**: वाशिम, बुलढाणा, जळगाव आदी जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडून गेलेली जमीन व खतांच्या तुटवड्यामुळे शेतक-यांचे झालेले आर्थिक नुकसान

**मु.शी.**: वाशिम, बुलढाणा, जळगाव आदी जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडून गेलेली जमीन व खतांच्या तुटवड्यामुळे शेतक-यांचे झालेले आर्थिक नुकसान या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री गोपीकिसन बाजोरीया, सय्यद पाशा पटेल, डॉ. नीलम गो-हे सर्वश्री धनंजय मुंडे व चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरू......

श्री.बाळासाहेब थोरात (कृषि मंत्री) : सभापती महोदय, काल सभागृहामध्ये म.वि.प.नियम 260अन्वये कृषि क्षेत्रातील खरीपाच्या हंगामासंबंधातील चर्चा माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि अन्य सदस्यांनी उपस्थित केली होती. त्या चर्चेला उत्तर देण्याकरिता मी उभा आहे.

या देशात मान्सून सुरू झाला आहे. अत्यंत आनंदाची गोष्ट एवढी आहे की, यावेळी सुरू झालेला मान्सून अत्यंत चांगल्या पद्धतीने महाराष्ट्रामध्ये पडतो आहे. एकंदरीत पावासाची सगळी परिस्थिती पाहिल्यानंतर चिंता करण्यासारखी स्थिती नाही. मात्र, काही जिल्ह्यांमध्ये सरासरी पेक्षा कमी पाऊस झालेला आहे. सह्याद्रीच्या क्षेत्रात खूप चांगला पाऊस होत आहे, मात्र धरण क्षेत्रात पाऊस कमी होत आहे. सन 2007 मध्ये मान्सून नॉर्मल पेक्षा चांगला होता. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त शेती उत्पादन झाले होते. त्यापेक्षा कदाचित थोडे कमी शेती उत्पादन यंदा असले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.......

तरी जो काही मान्सून होत आहे त्याचा आनंद निश्चितपणे सर्व जनतेला होणे उचित आहे. आता राज्यातील 80 टक्के पेरणी पूर्ण होत आलेली आहे. मला असे वाटते की, या पुढचा पाऊस चांगला झाला तर 1996, 2007 नंतर पीक उत्पादनाबाबत यंदाचे वर्ष चांगले जाईल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी चर्चा उपस्थित करताना असा मुद्दा उपस्थित केला आहे की, वाशिम, बुलढाणा आदी जिल्ह्यात 30 जून रोजी अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. सर्वसाधारणपणे 187 गावामध्ये 2487 खातेदार शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे 1871 हेक्टर जमीन खरडून गेली. पीका खालील 4634 हेक्टर जमिनीचे नुकसान झालेले आहे. या संबंधातील सर्व पंचनामे दोन दिवसामध्ये पूर्ण करण्यात येतील व कशा पद्धतीने मदत करता येईल याबाबत शासन निर्णय घेईल याची ग्वाही मी देतो.

यंदा राज्यात चांगला पाऊस होत आहे. असे जरी असले तरी बियाणे आणि खताच्यासंबंधी महाराष्ट्रामध्ये चर्चा सुरू आहे. खरीपामध्ये खतांची आणि बियाणांसंबंधी चर्चा होत असते. त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक गोष्टी घडत असतात. तेथे अनेक चढ-उतार होत असतात. त्यामुळे खत पुरवठा आणि निर्यातीमध्ये अडचणी येतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर रिग होत असते. आपल्याला 60 टक्के खत हे बाहेरून आयात करावे लागते. 40 टक्के खताची निर्मिती ही आपल्या देशात होते. मागील 3 वर्षापासून आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक चढ-उतार झालेले आहेत. येथे सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी आधीच खत खरेदी का केली नाही ? अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, गेल्या 3-4 वर्षापासून मंदीचे सावट होते. तसेच जेवढे आवश्यक असते तेवढेच खत आपण त्या त्या वर्षी खरेदी करीत असतो.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात..

तीन वर्षापूर्वी अशी परिस्थिती निर्माण झाली होती की, बी.ए.पी.खतांची किंमत 1360 डॉलर्सवर गेली होती आणि भारतात 20 गोण्यांसाठी 60 हजार रुपये मोजावे लागले होते. त्यावेळी या विभागाचे तत्कालीन मंत्री श्री.रामविलास पास्वान यांनी खतासाठी 1 हजार 35 कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. आपणास खताची परदेशातून आयात करावी लागत असल्यामुळे अनुदानापोटी फार मोठी रक्कम मोजावी लागते. म्हणून केंद्र सरकारचे धोरण आहे की, खतांचा वापर काटकसरीने करुन आवश्यक तेवढे खत आणावे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भाषणात खतांच्या बाबतीत काही धोरणात्मक निर्णय घेण्यात यावेत असा उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, खतांच्या बाबतीतील निर्णय केंद्र सरकार घेते. पोषण मूलद्रव्यावर आधारित किंमत द्यावी लागते. केंद्र सरकारने खतावरील अनुदान जाहीर करण्यास उशीर केल्यामुळे खतांच्या वितरणावर परिणाम झ ााला तसेच भाववाढीवर परिणाम झाला. मी याबाबत सांगू इच्छितो की, या वर्षी केंद्र सरकारने युरिया खत सोडून अन्य खते डि-कंट्रोल केली आहेत. त्याच बरोबर पोषण मूलद्रव्यावर आधारित किंमतीचा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय घेण्यासाठी उशीर झाल्यामुळे आपण बफर स्टॉक करु शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, खतांच्या किंमतीमध्ये भरमसाठ वाढ झाली असे म्हणता येणार नाही, परंतु दहा टक्के वाढ झालेली आहे हे मी नाकारीत नाही. या वर्षी केंद्र सरकारने खतांसाठी जवळपास 65 हजार कोटी रुपयांचे अनुदान दिलेले आहे अशी मला माहिती मिळालेली आहे. याठिकाणी शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात खत द्यावे असे सांगण्यात आले. परंतु मी अगोदर सांगितल्याप्रमाणे तशी परिस्थिती नाही. आपणास खतांसाठी केंद्र सरकारकडे मागणी नोंदवावी लागते. केंद्र सरकारकडे इतर राज्यांतून देखील मागणी येत असते त्यामुळे केंद्रातील कृषी विभागाला संपूर्ण देशाचा विचार करावा लागतो. आपल्याकडे जिल्हापातळीवरुन मागणी करण्यात येत असते. आपण जास्तीत जास्त मागणी करण्याचा प्रयत्न करीत असतो जेणेकरुन आपल्यावर तणाव येऊ नये. परंतु केंद्र सरकारची भूमिका जास्त नाही, परंतु सर्वांना खतांचा पुरवठा करता

श्री.बाळासाहेब थोरात..

येईल अशी भूमिका असते. आपण 43 लाख 25 हजार मे.टनाची मागणी नोंदविली होती. त्यापैकी 39 हजार 25 हजार मे.टनाची मागणी मान्य करण्यात आली. मागणी मान्य झाल्यानंतर एप्रिल महिन्यापासून सप्टेंबरपर्यंत मागणीच्या संदर्भात कशाप्रकारे पुरवठा होईल याचा एक तक्ता तयार करण्यात येतो. त्यामध्ये मागणी कोणत्या ग्रेडची आहे, कोणत्या महिन्यात आहे, कोणत्या कंपन्याकडून कशाप्रकारे मिळेल असे वर्गीकरण केले जाते. या वर्गीकरणानुसार खतांचा पुरवठा होत असतो. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे आपणास या वर्षी 39 लाख 25 हजार मे.टन खत मिळणार आहे. आपण केंद्र सरकारकडे कितीही मागणी केली तरी केंद्र सरकार मागील वर्षाच्या मागणीच्या फक्त दहा टक्के वाढ करते. मागील काही वर्षात शेतकऱ्यांना चांगला भाव मिळाला म्हणून थोडे जास्त खत टाकण्याची त्यांची वृत्ती वाढली आहे हे नाकारता येत नाही. आपण मागील चार-पाच वर्षाचा विचार केल्यास दर हेक्टरी खतांच्या वापरामध्ये दुपटीने वाढ झाल्याचे दिसून येते. जादा उत्पादन होऊन त्यातून चांगली अर्थ प्राप्ती व्हावी अशी अपेक्षा शेतकऱ्यांमध्ये येणे साहजिकच आहे.

सभापती महोदय, दिनांक 15 जुलै, 2010 पर्यंत झालेल्या खताच्या पुरवठ्याचा विचार केल्यास आपल्यास 100 टक्के खताचा पुरवठा झालेला आहे. आपली एप्रिल महिन्यासाठी 4.89 मे.टन खताची मागणी होती त्यापैकी केंद्र सरकारने 5.09 मे.टन मान्य केली असून प्रत्यक्षात 5.23 मे.टनाचा पुरवठा केला याचा अर्थ आपणास 103 टक्के पुरवठा झाला. मे महिन्यात 96 टक्के, जूनमध्ये 60 टक्के खतांचा पुरवठा झालेला आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ SBT/ प्रथम श्री.अजित शिगम 10.40

श्री.बाळासाहेब थोरात ...

जून महिन्यामध्ये काही प्रमाणात अडचणी आल्या होत्या त्या अडचणी येथे सांगितल्या पाहिजेत.. जून महिन्यामध्ये शेतक-यांना असे वाटू लागले की, राज्यामध्ये खत अपुरे पडणार आहे. काही प्रमाणात खताची टंचाई निर्माण होणार असल्यामुळे ज्या शेतक-याला खताची एक गोणी मिळत असेल तर खताची दुसरी गोणी कशी मिळवता येईल या दृष्टीने प्रयत्न करण्याची शेतक-यांची वृत्ती असते त्यातून काही गावामध्ये काही दुकानांसमोर खते घेण्यासाठी शेतक-यांच्या रांगा लागल्या होत्या आणि त्यातूनच तणाव निर्माण झाला होता हे मी नाकारत नाही.खताचा बफर स्टॉक करणे शक्य नसले तरी सुध्दा कृषी विभागाने जे काही खत आले त्यातील 2.5 लाख मे.टन खताचा एप्रिल आणि मे महिन्यात बफर स्टॉक करण्यात आला होता. त्याचा उद्देश असा होता की, ज्यावेळी पाऊस पडेल त्यावेळी आपण खताचा पुरवठा करु शकू. आपण जर एप्रिल - मे महिन्यातच खत विकण्यास सुरुवात केली असती तर जे मोठे शेतकरी आहेत ते कदाचित हे खत घेऊन जातील आणि जे लहान शेतकरी आहेत ते जून महिन्यात पाऊस पडल्यावर खत घेण्यासाठी पैसे मिळविण्याचा करीत असतात त्यामुळे एप्रिल मे महिन्यामध्ये खताचा विक्री करण्यात आली असती तर हे खत संपून गेले असते आणि आणखी ताण वाढला असता त्यामुळे 2.5. लाख मे.टनाचा बफर स्टॉक करुन ठेवला होता आणि जून महिन्यामध्ये ते विक्रीसाठी काढले होते. जून महिन्यामध्ये या खताचा विक्री करीत असतांना शासनासमोर काही अडचणी आल्या होत्या 5 जून 2010 रोजी अरबी समुद्रात फेत नावाचे वादळ निर्माण झाले होते त्यामुळे परेदशातून खत घेऊन येणा-या बोटी किना-याला लावण्यात आल्या होत्या एवढेच नव्हे तर कांडला बंदरामध्ये खत उतरविण्यात येते त्या बंदरातील मजुरांनासुध्दा सुरक्षेच्या कारणामुळे दुसरीकडे हलविण्यात आले होते. त्यामुळे दहा दिवस वाया गेले आणि जून महिन्यात खताचा पुरवठा होणार नाही अशा प्रकारचे चित्रं निर्माण झाले होते. त्याचा परिणाम म्हणून त्या कालखंडात काही घटना घडल्या होत्या

. सभापती महोदय, यानंतर मला असे सांगावयाचे आहे की ,काही शेतक-यांकडून विशिष्ट प्रकारच्या खताचीच मागणी केली जाते. उदा, 15:15:15 हे खत उपलब्ध असतांना हे शेतकरी सांगतात की मला सुफला खत पाहिजे. एका शेतक-याने सुफला खताची मागणी केली की सर्वच शेतक-यांना सुफला खत हवे असते त्याला जरी सांगण्यात आले की युरिया, वा डीएपी् खत

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ...

उपलब्ध आहे ते घेऊन जावे परंतुं आपले म्हणणे न ऐकता तो 15:15:15 प्रकारचे खत पाहिजे यासाठी आग्रह धरत असतो. एकाच प्रकारच्या खताची मागणी शेतकरी सगळीकडे करीत असल्यामुळे काही ठिकाणी ताण निर्माण झाला होता ही वस्तुस्थिती आहे परंतु त्यानंतर मात्र् सुरळीतपण खताचा पुरवठा करण्यात आला होता.

सभापती महोदय, या संदर्भात ज्या काही महत्वाच्या अडचणी समोर आल्या होत्या त्याचा मी या ठिकाणी उल्लेख करु इच्छितो.परदेशातून आयात केलेले खत उतरवून घेण्यासाठी आपल्याकडे बंदराची व्यवस्था नसल्यामुळे गुजराथ मधील कांडला,मुद्रा,पिपावा आणि आंध्रप्रदेश मधील विशाखापट्टणम्, काकीनाडा आणि कर्नाटक राज्यातील मेंगलोर, कारवार तसेच ओरिसाच्या बंदरातून आपल्याला आयात केलेले खत उतरवून घ्यावे लागते.आयात केलेले खत बंदरात आल्यानंतर ते बॅगेत भरले जाते. सुरुवातीला जे खत येते ते कंटेनरच्या सहाय्याने बदीस्त स्वरुपात न येता मोकळया स्वरुपात येत असते त्यानंतर बॅगमध्ये भरावे लागते. .जून महिन्यापर्यत आपल्याला उघडया रॅक्स मधून खताची वाहतूक करता येते परंतु जून महिन्यानंतर मात्र बंदीस्त रॅक्सची गरज भासत असते. त्यामुळे अशा प्रकारच्या बंदीस्त रॅक्स उपलब्ध होणे ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे.पुरेशा प्रमाणात अशा प्रकारच्या रॅक्स उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने शासनाने सातत्याने प्रयत्न केला आहे.माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात बैठका घेतल्या होत्या. केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवारसाहेबांनी यासाठी मदत केली होती त्याचबरोबर माननीय केन्द्रीय मंत्री श्री सुशीलकुमार शिंदे आणि श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचीदेखील मदत घेण्यात आली होती अशा प्रकारे रेल्वे मंत्रालयाकडे सातत्याने संपर्क ठेवून जास्तीत जास्त रॅक्स मिळविण्याचा शासनाने प्रयत्न केला होता व हा प्रयत्न अजूनही करण्यात येत आहे. आपल्याकडे जर पुरशा रॅक्स नसतील तर खत असूनही त्याचा पुरवठा करता येणार नाही.सगळया देशातील बंदरातून खताचा पुरवठा होत असल्यामुळे याबाबतीत आम्ही माहिती घेतल्यानंतर आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की देशासाठी रोज 65 रॅक्स आवश्यक असून आपल्याला 11 रॅक्सची आवश्यकता आहे परंतु रेल्वेकडून संपूर्ण् देशात 65 रॅक्स न देता 45 दिल्या जातात त्या तुलनेने आपल्याला सुध्दा कमी रॅक्स मिळतात त्यातून काही प्रमाणात ताण निर्माण होत असतो हे मी नाकारत नाही तरी सुध्दा

3.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ..

केन्द्रीय पातळीवर त्यासाठी प्रयत्न केला जात आहे.त्याचप्रमाणे मंत्रालयामध्ये एक सेल निर्माण करण्यात आला असून त्या सेलमध्ये कृषी विभागाचे अधिकारी आहेत आणि रेल्वेचे अधिकारी आहेत. ते वारंवार दूरध्वनीवरुन संबंधिताशी संपर्क साधत असतात. रॅक्सची मुव्हमेन्ट कशा प्रकारे सुरु आहे यासंदर्भात त्या अधिका-यांचे पूर्ण् लक्ष असते.रॅक्स कधी पोहोचतील याकडे देखील लक्ष ठेवण्यात येते. हे रॅक्स पोहोचल्यानंतर त्यातील खत उतरवून घेण्यासाठी माथाडी कामगारांची तयारी ठेवणे हे मोठे काम देखील करावे लागते. हे खत उतरवून घेण्याच्या बाबतीत देखील एक मोठी अडचण निर्माण झली होती .पूर्वी 2500 मे.टन क्षमतेच्या रॅक्स असावयाच्या परंतु आता 4 हजार मे.टन क्षमतेच्या मोठया रॅक्स यावयास सुरुवात झाली आहे माथाडी कामगारांनी या रॅक्स नऊ तासामध्ये खाली करुन घ्यावयाच्या असतात परंतु तेवढया काळात या रॅक्स खाली करुन घेण्यास माथाडी कामगार तयार होत नाहीत. त्यामुळे जळगाव मध्ये 38 तास ती रॅक्स खाली झाली नाही ही रॅक्स खाली करुन घेण्यासाठी ...........

नंतर श्री.सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

आम्ही सतत प्रयत्न करीत होतो, जिल्हाधिकारी प्रयत्न करीत होते. 38 तास ती रॅक खाली न झ ाल्यामुळे डमरेज चार्जेस मोठया प्रमाणात झाले. पहिल्या तासापासून दहा तासापर्यंत 100 रुपयांनी सुरु झाल्यानंतर पुढे ते 600 रुपये तास याप्रमाणे लावले जाते. त्याचा भुर्दंड त्या वहातूकदारांवर पडतो. त्यामुळे वहातूकदार हे काम करण्यास तयार होत नाहीत. त्यासाठी आम्ही मॉनिटरींग करीत आहोत. काही ठिकाणी रॅकबरोबर कृषी विभागाचा माणूस माल उतरवून घेण्याकरिता आम्ही देत असतो. त्याठिकाणी योग्य पध्दतीने वितरण कसे होईल यासाठी आमचा प्रयत्न आहे व या सर्व अडचणीमधून मार्ग काढण्याचा आमचा प्रयत्न आहे हे या ठिकाणी मला सांगितले पाहिजे. त्यामुळे यामध्ये सरासरी डमरेज 18 ते 20 तास आली. त्या रॅक रिकाम्या होऊन परत पाठविल्या तर त्या पुन्हा आपल्याला लवकर मिळत असतात. परंतु त्या अडचणी जून महिन्यामध्ये मोठया प्रमाणावर आल्या. यामध्ये आपण अडीच लाख मे.टनाचा सुरक्षित साठा करुन ठेवला. पुढील वर्षी यापेक्षाही चांगल्या पध्दतीने ही वितरण व्यवस्था कशी करता येईल यासाठी आमचा प्रयत्न राहील. तरीसुध्दा 15 जुलैपासून 30 जुलैपर्यंत येणाऱ्या पुरवठयाचे व्यवस्थित वितरण होईल अशी अपेक्षा आहे. आपण याठिकाणी मागणीप्रमाणे आलेल्या खताबद्दल बोलत असता, आणि आम्ही आवंटनाप्रमाणे सांगत असतो. हा फरक आपण लक्षात घेतला पाहिजे. त्यामुळे मिळालेले आवंटन व्यवस्थितपणे कसे पोहोचेल याकडे आम्ही लक्ष केंद्रित केलेले असते. यामध्ये बॅलन्स पध्दतीने जाण्याचा सुध्दा आमचा प्रयत्न असतो. यामध्ये थोडी ओढाताण होत असते, त्यामुळे सर्व तालुक्यांना बॅलन्स पध्दतीने पुरवठा केला पाहिजे असा आपला प्रयत्न आहे.

दुसरा महत्वाचा प्रश्न खताच्या विक्रीमधील गुणवत्ता नियंत्रण पध्दतीमधील अडचणींचा आहे. या सर्व परिस्थितीचा फायदा अनेक लोक घेतात हे मी नाकारीत नाही. काळया बाजारामध्ये खताच्या किंमती जास्त लावल्या जातात, खताचा साठा करुन ठेवला जातो, आपला माल दुसऱ्या जिल्हयामध्ये विकायला नेऊन त्याठिकाणी जास्त भाव लावला जातो या सर्व भानगडी खताच्या वितरणामध्ये होतात हे मी नाकारीत नाही. हे सर्व प्रकार रोखण्याकरिता 407 भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 993 गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक नेमले आहेत. त्याचप्रमाणे 4289 खतांचे नमुने घेतले असून त्यापैकी 1942 नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये 347 अप्रमाणित असल्याचे आढळून आले. यामध्ये 87 प्रकरणे कोर्टामध्ये प्रस्तावित केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. बाळासाहेब थोरात...

असून त्यापैकी 20 ठिकाणी गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन त्यांना पोलीस कस्टडी दिली आहे. अशाप्रकारची कारवाई आपण केली आहे. त्याचप्रमाणे 421 मेट्रिक टन साठा जप्त केला आहे. दोषी आढळून आलेल्या 103 परवान्यांचे निलंबन केले आहे. व 32 परवाने रद्द केले आहेत. यामध्ये जवळ जवळ 30 हजार परवानाधारक काम करीत आहेत, त्यामुळे यामध्ये कुणाकडूनही गैरप्रकार करण्याचा प्रयत्न होत असेल तर तो आमच्या नजरेतून सुटेल असे समजण्याचे कारण नाही. म्हणून शासन त्याबाबतीत जास्तीत जास्त काळजी घेत आहे. त्यादृष्टीने 332 ठिकाणी विक्री बंदीचे आदेश दिले आहेत. यामध्ये जादा पैसे घेऊन विक्री करीत असेल, साठा करीत असेल किंवा दुसऱ्या ठिकाणी माल नेऊन विक्री करीत असेल तर यामध्ये आपल्याला लिंकिंग हा प्रकार गेल्या दोन-तीन वर्षापासून पहावयास मिळतो. यामध्ये असे आढळून येते की, मोठया नामवंत कंपन्या सुध्दा यामध्ये लिंकिंग करावयास लागल्या आहेत. यामध्ये कंपन्या म्हणावयाच्या लागल्या आहेत की, तुम्हाला जर एवढे खत पाहिजे असेल तर आमच्याकडील खत घ्या, अगोदर आमच्याकडे हे खत नोंदवा मग तुम्हाला आम्ही खत देतो असे प्रकार होत असल्याचे आढळून आले. म्हणून अशा काही कंपन्या त्यांच्याजवळील साठयाचे लिकिंग करतात त्याच्या विक्रीवर बंदी लावण्यात आली आहे. याबाबतीत मी आपल्याला करोमंडलचे उदाहरण देईन, त्या कंपनीमध्ये असे प्रकार सुरु होते. त्यामुळे असे प्रकार ज्या कंपन्यांमध्ये होत आहेत त्यांच्यावर आम्ही बंदी घातली. त्याचप्रमाणे खालच्या पातळीवर सुध्दा असे प्रकार होत असतील तर त्यांच्याबाबतीत काळजी घेऊन त्यांच्यावर आम्ही कारवाई करीत आहोत.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये मिश्र खताच्या गुणवत्तेच्यासंदर्भात खूप चर्चा झालेली आहे. दुसऱ्या राज्यामधून मिश्र खत आपल्या राज्यामध्ये येत होते त्यांना मागील तीन वर्षामध्ये आपल्या राज्यामध्ये येऊ दिलेले नाही. त्यामध्ये मोठया प्रमाणावर गैरप्रकार होत होते जेणेकरुन ते शेतकऱ्याच्या अन्नामध्ये माती कालवीत होते अशाप्रकारचे प्रकार आमच्या निदर्शनास आले.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/ प्रथम श्री. सरफरे.... 10:50
श्री. बाळासाहेब थोरात...

त्या सर्वांचे सन 2007 पासून लायसन्स पूर्णपूणे रद्द केले आहेत आणि आता आपण त्यांना महाराष्ट्रात येऊ देत नाही हे मी या ठिकाणी स्पष्ट करतो. जेव्हा मिश्र खत तयार करण्यात येतात त्यावेळी तेथे इन्स्पेक्टर असतात आणि जो प्रत्येक लॉट तयार होतो त्या प्रत्येक लॉटचे सँम्पल घेण्यात येते. ते सँम्पल लॅबोरेटरीमध्ये आणून तपासून घेण्यात येते मगच विक्रीकरिता रिलीज करण्यात येते. त्या शिवाय विक्रीसाठी परवानगी दिली जात नाही. त्यामध्ये दहा दिवस जातात. पण त्या शिवाय या मिश्र खताच्या विक्रीस परवानगी दिली जात नाही. त्यामुळे आपल्याला एक गोष्ट मान्य करावी लागेल की, गेल्या दोन तीन वर्षामध्ये मिश्र खात्याच्या बाबतीत ज्या जुन्या तक्रारी होत्या त्या आता कमी झाल्या आहेत. सन्मानीय सदस्यांनी या तक्रारी सातत्याने याठिकाणी मांडल्या होत्या त्यामुळे एकत्र पध्दतीने त्यावर कारवाई करावयास सुरुवात केली. त्यामुळे मिश्र खताच्या बाबतीतील पूर्वीच्या तक्रारी आता दिसणार नाहीत. यासंदर्भात निश्चितपणे काळजी घेण्यात येत आहे हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन महत्वाच्या गोष्टी मांडलेल्या आहेत. बरेच मोठे डिलर्स तयार झालेले आहेत. म्हणून लायसन्स देण्यात यावेत आणि ते गाववार कसे देता येतील यादृष्टीने शासन विचार करीत आहे. सहकारी संस्थाना प्रधान्याने लायसन्स कसे देता येतील याचा विचार करण्यात येत आहे. याबाबतीत आणखी नेमके काय करता येईल याची पूर्ण काळजी घेत असताना केंद्र सरकारकडे आणखी खताची मागणी करण्यात येत आहे.. महाराष्ट्रातील एकंदर पावसाचे प्रमाण व खतांची वाढती मागणी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाला आणखी खताचा पुरवठा करण्यात यावा अशी मागणी केंद्र शासनाकडे करण्यात येत आहे.

सभापती महोदय, बियाण्यांच्या बाबतीत गेल्या दोन-तीन वर्षामध्ये काही बदल निश्चितपणे सन्माननीय सदस्यांना आढळून आले असतील असे मला वाटते. बोगस बियाण्यांच्या बाबतीत कसे नियंत्रण आणता येईल याची काळजी शासनाने घेतलेली आहे. एवढेच नाही तर यासाठी आयुक्त कार्यालयामध्ये एक सेल निर्माण केलेला आहे. त्यामध्ये कृषि संशोधक असतात. ज्यांना बियाण्यांची विक्री करावयाची असेल त्यांना त्या समितीपुढे यावे लागते. या समितीने मान्यता दिल्यानंतरच राज्यामध्ये त्यांना विक्री करता येते. यापूर्वी कोणतीही कंपनी यायची आणि खाजगी लायसन्स घेऊन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात.....

जायची व बियाण्यांची विक्री करायची. पण आपल्याला आता हे पूर्णपणे बंद झालेले दिसेल. मागील वर्षी बियाण्यांच्या बाबतीत एक प्रयोग करण्यात आला. जी कंपनी बियाण्यांची विक्री करावयाची त्यांना ही बियाणे कुठे तयार करण्यात आली असे विचारण्यात आले. त्यामधून बऱ्याच गोष्टी निदर्शनास आल्या. बऱ्याचवेळा असे व्हायचे की, बाजारातून सोयाबीन खरेदी करण्यात येत होते आणि ते पिशव्यांमध्ये भरुन बियाणे म्हणून विकण्यात येत होते. हा प्रकार कमी होत होता असे नाही. परंतु ज्यावेळी त्यांना हे सोयाबीन कुठे तयार केले हे आम्हाला दाखव असे विचारण्यात आले त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांची नावे सांगितली. त्या ठिकाणी अधिकारी पाठविण्यात आले.त्यावेळी त्या शेतकऱ्यांनी असे सांगितले की, आमचे नाव कुठून आले हे आम्हाला माहीत नाही. त्यानंतर त्या सगळया बियाण्यांच्या विक्रीची परवानगी रद्द करण्यात आली. अशा प्रकारे बोगस बियाण्यांच्या विक्रीवर कंट्रोल आणल्यामुळे त्याचे परिणाम खूप चांगल्या रीतीने दिसून येत आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या बियाणे निर्माण करणाऱ्या परराज्यातील कंपन्या आहेत, त्यांच्यावर बंधन कसे आणणार? आपल्या राज्यात या कंपन्या असल्या तर ती गोष्ट वेगळी होती. बियाणे महामंडळाच्या वतीने, महाबीजच्या वतीने मध्यप्रदेशातून तसेच इतर प्रांतातून बियाणे मागविण्यात येतात. त्या ठिकाणी ज्या बोगस कंपन्या आहेत त्यांच्यावर कसे नियंत्रण आणणार.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जसे खतामये एमएआयडीसी काम करते आणि सगळयांवर कंट्रोल ठेवते तसे महाबीज सुध्दा काम करते. सोयाबीनचे बियाणे असे आहे की, ते उज्जेन, इंदौर या क्षेत्रातून आणावे लागते.त्या शिवाय पर्याय नसतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागच्या वर्षी आम्ही हा विषय मांडला होता. मध्यप्रदेशातून जे बियाणे आले ते शेतकऱ्याकडून खरेदी केले गेले होते. त्या ठिकाणी कंपन्या अस्तित्वात नसताना बोगस कंपन्यांनी मार्केटमध्ये सोयाबीनची खरेदी करुन ते बियाणे म्हणून महाराष्ट्रात पुरविले.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मध्यप्रदशातून सोयाबीनचे बियाणे येते. याबाबतीत माझे म्हणणे असे आहे की, महामंडळाने किंवा बियाणे मंडळाकडून शेतकऱ्यांना प्लॉट देण्यास काय हरकत आहे. तसे केले तर बियाणे याच ठिकाणी तयार होईल आणि शासनाचे त्यावर कंट्रोल राहील व बोगस बियाणे येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, महाबीज मोठयाप्रमाणात तिकडून बियाणे तयार करुन घेते परंतु ते कसे दर्जेदार असले पाहिजे, त्यांच्यावर कंट्रोल कसा असला पाहिजे, ते कॉन्ट्रॅक्टर टाईपचे काम करतात त्यावर सुध्दा त्यांचे निरीक्षण असले पाहिजे ते कसे करता येईल आणि तेथे काही चुकीचे होऊ नये या दृष्टीने काळजी घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल. बियाण्यांच्या बाबतीत खूप चांगल्या पध्दतीचा प्रयत्न राज्य शासनामार्फत करण्यात येत आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

सभापती महोदय, आपण काही केसेस दाखल केल्या. मागे सभागृहात चर्चा झाल्यानंतर काही निर्णय गुण नियंत्रणाच्या संदर्भात घेतलेले आहेत. या वर्षापासून त्याचे सगळे रिझल्ट्स आपल्याला दिसावयास लागतील. या केसेस यशस्वी होणे ही सगळ्यात महत्वाची गोष्ट होती. या वर्षापासून आम्ही या गुणनियंत्रण विभागाला सक्षम करीत आहोत. या सभागृहातील चर्चेतून जो निर्णय झाला त्यासंदर्भात निश्चितपणे या वर्षापासून आपल्याला कार्यवाही झाल्याचे दिसावयास लागेल याची ग्वाही मी या निमित्ताने देतो.

सभापती महोदय, विषय अनेक आहेत. परंतू मी एकच सांगेन की, पुढच्या काळात खताची फार मुबलकता राहील असे समजण्याचे कारण नाही. जे खत उपलब्ध आहे ते काटकसरीने वापरावे लागणार आहे. म्हणून कृषी विभागाने राज्यातील सगळ्या गावांच्या जमिनीचे निर्देशांक म्हणजे जमीन कशा प्रकारची आहे, त्या ठिकाणची मूलद्रव्ये कशा प्रकारची आहेत त्याचे गाववार तक्ते लावण्याचा प्रयत्न केला. कृषी दिंडीच्या माध्यमातून सगळ्यांना सांगण्याचा प्रयत्न केला. माती तपासून आवश्यक तेवढे खत टाकावयाचे ठरविले तर राष्ट्रीय संपत्तीची बचत होईल तसेच शेतकऱ्यांचे नुकसान सुध्दा थांबेल. याबाबतीत जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्याचा प्रयत्न करीत आहोत. एका बाजूने खताची उपलब्धता करीत असताना त्याचा कार्यक्षम वापर करण्याच्या दृष्टीने आमचा प्रयत्न आहे, हे मी या निमित्ताने सांगेन. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी तसेच सन्माननीय सदस्य ॲड. उषा दराडे यांनी सेंद्रीय शेतीच्या संदर्भातील प्रश्न मांडला हे खरे आहे की, जागतिक पातळीवर यांसदर्भात आता अत्यंत जागृती होत आहे की पुढच्या काळामध्ये कोणत्याही पध्दतीच्या किटकनाशकाचा अंश नसलेले सेंद्रीय अन्न मिळाले पाहिजे. जगामध्ये याबाबतीत काही काम झालेले आहे. आपल्याकडे आपला विभाग किंवा विद्यापीठ याही पेक्षा सन्माननीय सदस्य ॲड. उषा दराडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी प्रयोग केलेला आहे आणि त्यांना तो यशस्वी वाटला. त्याचे प्रमाणीकरण कसे करता येईल याचा विचार करावा लागेल. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे सेंद्रीय शेतीचे धोरण आता तयार केलेले आहे. त्याला वित्त विभागाचा जो आधार पाहिजे तो आम्ही मागत आहोत. कारण कोणतेही धोरण वित्तीय आधार नसेल तर उपयोगाचे नसते. त्यादृष्टीने काही निधीची मागणी

RDB/ SBT/ KTG

श्री. बाळासाहेब थोरात .......

त्यांच्याकडे करीत आहोत. लवकरच सेंद्रीय शेतीचे धोरण महाराष्ट्रामध्ये आणत आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली तसेच सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्याची नोंद घेतलेली आहे.

**तालिका सभापती** ( श्री. राम पंडागळे ) : सभागृहाच्या कामकाजाची वेळ पाच मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पीक विम्याचे पैसे मिळत नाहीत असे सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले. मी सांगेन की त्यासाठी पुरवणी बजेटमध्ये नियतव्यय मिळालेला आहे. त्यामुळे ते पैसे मिळतील. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी 13 लाख 29 हजार रुपये प्रिमियम भरला होता. विभागाला 375 कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर झाला आणि चंद्रपूर जिल्ह्याकरिता 33 कोटी रुपये पीक विम्याच्या माध्यमातून मिळणार आहेत. अनेक मुद्दे सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी चांगल्या पध्दतीने मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी खताच्या तस्करीचा मुद्दा उपस्थित केला. मी सांगेन की अशा प्रकारच्या काही गोष्टी आम्हाला आढळून आल्या. येणारी जी खते आहेत की त्यावर अनुदान असते. ज्या किमतीला खत मिळते त्यापेक्षा त्या खताची किंमत जास्त असते. असे अनुदान मिळालेले खत गोळा करुन ते परदेशामध्ये पाठविण्यात येते. असे काही कंटेनर सापडले. तीन कंपन्यांवर केस झाली आणि 6 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा साठा जप्त केला. परंतु याची सुध्दा तस्करी होऊ शकते, ही वस्तुस्थिती आहे. या पध्दतीने आम्ही यामध्ये कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी अहमदनगर जिल्ह्यामध्ये बोगस खताचा सुळसुळाट या नावाखाली महाराष्ट्रातील आकडेवारी दिली. त्यांनी मिडियाला चांगली बातमी मिळवून दिली. त्यामुळे आज वर्तमानपत्रांमध्ये नगर जिल्ह्यात बोगस खताचा सुळसुळाट अशा बातम्या आल्या. परंतु ही वस्तुस्थिती नाही. फक्त श्रीरामपूरमध्ये एक केस सापडली. त्यामध्ये खताच्या बॅगेवर वेगळे छापले होते आणि त्यामध्ये अप्रमाणित खत भरण्याचा कार्यक्रम एका ठिकाणी सापडला. परंतु सगळ्या जिल्ह्यात सुटसुळाट नव्हता. मराठवाड्यामध्ये मात्र 3 केसेस सापडल्या.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात....

हे सर्व पाहिले तर जास्तीत जास्त नियंत्रण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. 20 पोलीस केसेस दाखल केलेल्या आहेत. काही लोकांना पोलीस कस्टडीमध्ये टाकण्यापर्यंतची कारवाई केली आहे. बी-बियाण्यांचे जास्तीत जास्त वितरण चांगल्या प्रकारे कसे करता येईल असा प्रयत्न आहे. यामध्ये लोकप्रतिनिधींचे सहकार्य अपेक्षित आहे. लोक जागृती आवश्यक आहे, एवढेच मी यानिमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, चक्री वादळासंबंधी मी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी मंत्री महोदय उपस्थित नव्हते. आमच्या मुद्यांची नोंद घेतली जाईल असे सांगण्यात आले होते. बुलढाणा जिल्हयातील 1100 हेक्टर जमीन अतिवृष्टीमुळे खरडून गेली आहे त्यासंबंधी शासन काय कार्यवाही करणार आहे ? मी कांडला बंदराचा उल्लेख केला होता. त्याचेही उत्तर आले नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी माझ्या उत्तराच्या भाषणाची सुरुवातच वाशिम व बुलढाणा जिल्हयातील अतिवृष्टीची माहिती देऊन केली होती. बुलढाणा जिल्हयात अतिवृष्टीमुळे 188 गावे बाधित झाली आहेत. यामध्ये 2487 खातेदार आहेत. 1871 हेक्टर जमीन खरडून गेली आहे. 4634 हेक्टर पिकाखालील क्षेत्र बाधित झाले आहे. वाशिम जिल्हयाचे सुध्दा दोन दिवसात सर्वेक्षण करीत आहोत.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 2008 साली आंबा व काजू बागायतदारांसाठी केंद्र सरकारकडून 23 कोटींचा निधी आला. परंतु एमएआयडीसीच्या चुकीमुळे या खतांचा विनियोग झाला नाही. त्यामुळे या निधीचे रोखीने वाटप करण्याचा निर्णय घेणार आहे काय ? केंद्र सरकारकडून खतासाठी हा निधी आला असला तरी राज्य शासनाकडून खताचे वितरण झाले नाही. म्हणून शासन या बागायतदारांना रोखीने मदत करणार आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे. 32,734 मे.टन खताचे वाटप करावयाचे होते त्यापैकी 7,809 मे.टनाचे वाटप झाले आहे. म्हणजे 24 टक्के वाटप झाले आहे. एमएडीआयसीमुळे ही अडचण झाली असे त्यांनी म्हटले आहे. ही बाब तपासून घेण्यात येईल आणि झालेली चूक दुरुस्त केली जाईल. परंतु केंद्र सरकारचे निकष ठरवून दिले आहेत, त्यांनी नियम घालून दिलेले आहेत. त्यामुळे निधीचे रोखीने वाटप करता येणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी आज जे उत्तर दिले आहे, ते उत्तर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कालच दिले होते. त्यामध्ये कोणताही फरक झालेला नाही. सन्माननीय सदस्यांनी रेकॉर्ड पाहिले तर आता मंत्री महोदय जे बोलले ते

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

सन्माननीय सदस्यांनी कालच सभागृहात भाषणाला सुरुवात करताना सांगितले होते. शासनाने 80 टक्के निधीचे नियोजन केले नाही. मंत्री महोदयांनी केंद्र सरकारकडे शासनाने मागणी केली होती, त्यापैकी किती खत आले ते सांगितले. रॅकची अडचण सांगितली, हमालांची, माथाडींची अडचण सांगितली आहे. परंतु या राज्यामध्ये खतांचा मोठया प्रमाणावर काळा बाजार चालू आहे. यासंबंधी मी उदाहरण दिलेले आहे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उदाहरण दिले आहे. शासनाने शेतक-यांविरुध्द पोलीस बलाचा वापर केला आहे....

**तालिका सभापती ( श्री.राम पंडागळे )** : सभागृहाची वेळ 3 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यासाठी कडक कायदा करण्यात आला पाहिजे. प्रचलित कायद्यामुळे व्यापा-यांवर व कंपन्यांवर जरब बसणार नाही आणि काळा बाजार थांबणार नाही. म्हणून प्रचलित कायदा आहे तो अधिक कडक केला जाणार आहे काय असे विचारले होते. त्याचे उत्तर मिळाले नाही. या प्रश्नाचे उत्तर दिले तर महाराष्ट्रातील शेतक-यांना दिलासा मिळणार आहे. बियाण्यासंबंधी आता सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी सांगितल्याप्रमाणे बियाणे महामंडळ कार्यवाही करीत नाही. ते टेंडर मागवितात. त्या टेंडरमध्ये गफला होतो. या दोन बाबीसंबंधी शासन निश्चित कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील कृषी खात्याच्या माध्यमातून 100 टक्के भ्रष्टाचार चालू आहे. कृषी आयुक्तांकडून बी-बियाणे व खतांच्या अनुषंगाने प्रचंड प्रमाणावर निधी गोळा केला जातो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

(श्री. दिवाकर रावते....

गेल्या वर्षी कंपन्यांकडून 5 कोटी निधी मागितला होता. निधी दिल्या शिवाय कंपन्याकडून परवानगी दिली जात नाही. म्हणून कृषी आयुक्ताची तातडीने बदली करावी अशी आमची मागणी आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मागील वर्षी देखील अशा पध्दतीने मुद्दा उपस्थित करुन 5 कोटीचा उल्लेख केला होता. सन्माननीय सदस्यांनी निश्चित स्वरुपाचा पुरावा दिला तर कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यास आम्ही तयार आहोत हे मी स्पष्टपणे सांगतो. या सभागृहामध्ये आपण आरोप करुन जातो. परंतु कोणाची तरी बदनामी होत असते. आरोप करताना त्याला काही आधार नसेल तर असा आरोप एखाद्यावर अन्यायकारक ठरु शकतो. कृषी आयुक्तालयाकडून असे काही केले जात असेल आणि त्याबाबतीत ठोस पुरावा आणि आधार असेल तर कोणत्याही चौकशीची आमची तयारी आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कडक कायदा असला पाहिजे असे सांगितले. अशा प्रकारच्या कायद्यामुळे काय फरक होऊ शकतो हे निश्चितपणे तपासून पाहू. तसेच बियाण्याच्या गुणवत्तेच्या दृष्टीने काही बदल करण्याची आवश्यकता असेल तर महाबीजला त्याबाबत सूचना दिल्या जातील, त्यांच्यावर बंधन घातले जाईल.

श्री. राजन तेली : 2007-2008मध्ये 27 कोटी रुपये अनुदान नुकसान भरपाई पोटी मिळालेले होते. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की 7 हजार टन खताचे वाटप केलेले आहे. आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 17 हजार टन खताची आवश्यकता आहे. मार्च महिन्यामध्ये सर्वसामान्य शेतक-यांना खताचे वाटप होईल असे सांगितले होते. परंतु अजून खताचे वाटप झालेले नाही. यासंदर्भात सचिव स्तरावर बैठक झाल्याची बातमी वृत्तपत्रात छापून आली होती. तेव्हा उर्वरित खताचे वाटप कधी करण्यात येणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : नुकसान भरपाई पोटीचे अनुदान रोखीने देणे शक्य असेल तर ते देण्यास काही अडचण नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक 11 वाजून 15 मिनिटांनी पुनः भरेल.

(सकाळी 11.08 ते 11.15 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

--

...नंतर श्री. भोगले..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत**

**(१) * ६८०३ श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे, श्री.कपिल पाटील, श्री.रामनाथ मोते, श्री.संजय केळकर, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक २६३० ला दिनांक २५ मार्च, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विना अनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ चा शासननिर्णय निर्गमित करतांना त्यामागे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उल्लेख करण्याचे राहून गेल्यामुळे व उच्च माध्यमिक शिक्षण हा माध्यमिक शिक्षणाचाच एक वरिष्ठ स्तरीय भाग असल्याने उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा समावेश करुन हा भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी शासननिर्णयात सुधारणा करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकाने विनाअनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरली पाहिजे असा सुस्पष्ट धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सन २००३ च्या याचिका क्रमांक ५०५६ मध्ये दिनांक, ४ डिसेंबर, २००३ रोजी दिलेला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) वैयक्तिक प्रकरणात कार्यवाही झालेली आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी हात जोडून विनंती करीत आहे. प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिले दहा प्रश्न हे शिक्षण विभागाशी संबंधित आहेत. परंतु या प्रश्नांबाबत शासनाने सकारात्मक उत्तर न देता नकारात्मक उत्तर दिलेले आहे. विनाअनुदानित शाळांमध्ये केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा धोरणात्मक निर्णय होऊन दिनांक 28 नोव्हेंबर, 2006 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. परंतु त्या शासन निर्णयामध्ये "कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी" या शब्दांचा उल्लेख न झाल्यामुळे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वरिष्ठ व निवडश्रेणी मिळण्यापासून वंचित राहिले आहेत. मागील तीन अधिवेशनात

सातत्याने हा प्रश्न उपस्थित झालेला होता. परंतु प्रत्येक वेळी "विचाराधीन आहे" अशा प्रकारचे शासनाने उत्तर दिले. या निर्णयाच्या विरोधात उच्च माध्यमिक शिक्षकांनी न्यायालयात धाव घेतली. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सन 2003 च्या याचिका क्र.5056 मध्ये दिनांक 4 डिसेंबर, 2003 रोजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाजूने सुस्पष्ट निर्णय दिलेला आहे. असे असताना त्या निर्णयास अनुसरुन शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही. राज्यामध्ये 40 हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व दीड लाख शिक्षकेतर कर्मचारी आहेत. प्रत्येकाने न्यायालयात दावा दाखल करावा असे शासनाला अपेक्षित आहे का? याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे का?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित करताना सांगितले की, शिक्षण विभागाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मक देण्यात आलेली आहेत. बॅलेट बॉक्सचे आभार मानले पाहिजेत. पहिले दहा प्रश्न हे शिक्षण विभागाशी संबंधित आहेत. संपूर्ण अधिवेशनातील प्रश्न एकाच तासात चर्चेला येणार आहेत. ही बॅलेट बॉक्सची कमाल आहे. परंतु या प्रश्नाबाबत शासनाने नकारात्मक उत्तर दिलेले नाही. काही तरतुदीचे विषय आहेत. त्यामुळेच 'विचाराधीन आहे' असे उत्तर दिलेले आहे. निश्चितपणे लवकरात लवकर निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना बॅलेटला हजर राहण्यास नियमामध्ये मनाई केलेली नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : त्याबद्दल माझी शंका नाही. बॅलेट बॉक्सला सवय लागली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : आज शिक्षण विभागाचा दिवस असल्यामुळे शिक्षण विभागाचे प्रश्न यादीमध्ये समाविष्ट झालेले आहेत. या प्रश्नामध्ये स्पष्टपणे विचारले होते की, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी विनाअनुदानित शाळांमध्ये केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरली पाहिजे असा सुस्पष्ट निर्णय माननीय उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सन 2003 च्या याचिका क्रमांक-5056 मध्ये दिनांक 4 डिसेंबर, 2003 रोजी दिलेला आहे हे खरे आहे काय?

(नंतर श्री.खर्चे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. खर्चे ...... 11:20

ता.प्र.क्र.6803.......... प्रा.बी.टी.देशमुख ......

त्याला उत्तर "होय" असे दिलेले आहे. 1 एप्रिल, 2010 रोजी हे उत्तर दिले होते. आज सुध्दा त्याच प्रश्नाला "होय" असेच उत्तर आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे तर 1 एप्रिल 2010 रोजी उत्तर देण्यात आले होते की, "प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची बाब प्रगतीत आहे". आजच्या प्रश्नाचे उत्तर मात्र मागे गेलेले आहे. त्याच प्रश्नाला आज "वैयक्तिक प्रकरणात कार्यवाही झालेली आहे" अशा प्रकारचे अत्यंत हास्यास्पद असे उत्तर दिलेले आहे. वैयक्तिक प्रकरणात उच्च न्यायालयाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी तारांकित प्रश्न विचारावा लागतो असे आहे काय ? ती कार्यवाही शासनाला करावीच लागते. तसे केले नाही तर मंत्र्यांना सुध्दा पकडून नेतात. या राज्याच्या माजी वन मंत्र्यांचे उदाहरण आपल्यासमोर आहेच. यासंबंधी उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय मी येथे कोट करु इच्छितो. त्यात असे म्हटले आहे की, " When the teachers are working in the aided school, they are entitled to revised scale on completion of twelve years even though entire service is not rendered in aided schools". इथे हायकोर्टाने टीचर्स असा शब्द वापरलेला आहे. सारीच्या सारी सेवा अनुदानित शाळांमध्येच केली पाहिजे असे बंधन नाही तर विना अनुदानित शाळा अथवा कनिष्ठ महाविद्यालयात केलेली सेवा असली आणि त्यात 12 वर्षे झाली असतील तरी त्याचा विचार करावा लागतो. कारण हा 4 डिसेंबर, 2003 रोजी माननीय उच्च न्यायालयाने दिलेला धोरणात्मक निर्णय आहे. आम्हाला मात्र त्यासाठी सभागृहात 30 वेळा प्रश्न विचारावा लागतो, तीन वेळा आपल्या दालनात बैठका याच प्रश्नाबाबत झाल्या आणि चार वेळा आपण रुलींग सुध्दा दिलेले आहे. या देशाच्या घटनेप्रमाणे उच्च न्यायालयाचा जो निर्णय आहे त्याची अमलबजावणी करणे शासनावर बंधनकारक आहे. तसेच शासनाने याबाबत सर्वोच्च न्यायालयात अपिल केलेले नसल्याने व अपिलाचा मुद्दा आता निघून गेल्याने जो निर्णय दिलेला आहे त्याची अमलबजावणी करणे शासनाला भाग आहे". आपण या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात दिलेल्या निर्णयातील पहिले एक वाक्य वाचून दाखवितो. 4 जुलै, 2006 रोजीचे आपले रुलींग आहे. "माननीय राज्यमंत्र्यांनी असे सांगितले की, पुढच्या अधिवेशनात हा प्रश्न येणार नाही पण मी असे म्हणतो की, या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या संदर्भात शासनाने प्रयत्न करावा, तोपर्यंत हा प्रश्न मी राखून ठेवतो". हे रुलिंग 4 जुलै, 2006 रोजी आपण दिल्यानंतर दि. 28.11.2006 रोजी

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ......

शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. माझा प्रश्न असा आहे की, सन 2003 मध्ये निर्णय दिला. In that Case you are Respondent No-1, मग कॅबिनेटसमोर प्रपोझल ठेवताना किंवा जी.आर. काढताना आपल्या विभागाचे अधिकारी झोपले होते काय ? उच्च न्यायालयाची माहिती कॅबिनेटसमोर त्यांनी का ठेवली नाही ? अशा गलथानपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यावर आपण काय कारवाई करणार ? हा एक प्रश्न व दुसरा प्रश्न म्हणजे पुढील आठवड्यात सोमवार आणि मंगळवारला आपण हा शासन निर्णय सभागृहासमोर ठेवला पाहिजे. कारण या जगात भारत नावाचा एक देश आहे, त्याला इंडियन कॉन्स्टीटयुशन नावाची एक लिखित घटना आहे, भारतात महाराष्ट्र नावाचे एक राज्य आहे. या घटनेने कारभार चालणाऱ्या राज्यामध्ये आता आपल्याला बोलायला काही जागा नाही, म्हणून शासन यासंदर्भातील निर्णय मी सुचविल्याप्रमाणे पुढल्या आठवड्यात पटलावर ठेवणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जी अमलबजावणी झाली त्याचे स्वरुप वैयक्तिक होते. ज्या पध्दतीने या निर्णयाला सार्वत्रिक स्वरुप देण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी मागणी केली त्या अनुषंगाने ही बाब तपासून पाहिली जाईल व लवकरात लवकर कसा निर्णय घेता येईल हे पाहण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : मी मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर वाचून दाखविले आहे. तारांकित प्रश्न क्रमांक 2597 ला उत्तर देताना मंत्री महोदयांनी दि. 1 एप्रिल, 2010 रोजी सांगितले होते की, मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची बाब प्रगतीत आहे. आता जणू ते सांगत आहेत की, "बरे झाले सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिले". अशा प्रकारचे वर्तन मंत्री महोदयांनी सभागृहात करणे बरोबर नाही., ते मंत्र्यांना शोभेसे नाही आणि तरीही शोभत असेल तर तो दुर्दैवाचा भाग आहे. उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला होता त्यावर शासनाने कुठलेही अपिल केले नाही.....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एखाद्या प्रश्नाच्या उत्तराने जर सदस्यांचे समाधान झाले नसेल तर त्यांना पुन्हा परवानगी दिली जाते. त्यामुळे आपण नंतर देखील उत्तर घेऊ शकता.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 6803....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, बेसीक मुद्दा असा आहे की, यापूर्वी विनाअनुदानित सेवा सर्व प्रयोजनासाठी ग्राहय धरली जात होती फक्त वरिष्ठ आणि निवडश्रेणीसाठी ती ग्राहय धरली जात नव्हती. या विषयाच्या संदर्भात या सभागृहात वारंवार चर्चा झाल्यानंतर शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला व त्यानुसार विनाअनुदानित सेवा वरिष्ठ आणि निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबतचा जीआर 28 नोव्हेंबर, 2006 रोजी काढण्यात आला. या जीआर मध्ये "माध्यमिक शिक्षक" असा शब्द वारल्यामुळे त्रुटी राहिली होती. परंतु शिक्षण क्षेत्रामध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व शिक्षकेतर कर्मचारी या सगळयांना वरिष्ठ आणि निवड श्रेणीची तरतूद आहे. या सभागृहात या विषयावर अनेक वेळा चर्चा झाल्यानंतर या जीआर मधील त्रुटी दूर करण्याचा निर्णय मान्य केला होता. आम्हाला दर वेळेस शासनाकडून अशाच प्रकारचे उत्तर मिळते त्यामुळे यापुढे सभागृहात अशा प्रकारचे उत्तर येणार नाही म्हणून हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन आदेश निर्गमित करेल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये वित्तीय भार सुध्दा आहे तसेच.....

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनात हे नक्की झाले आहे की, शिक्षण विभागाकरिता आता स्वतंत्र वेगळया मंत्र्याची गरज निर्माण झालेली आहे. माननीय मंत्रीमहोदयांना शिक्षण आणि कृषी या दोन्ही विभागाचा भार आता सोसवत नाही हे सिध्द झालेले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी काहीही माहिती घेतल्याचे दिसत नाही. सकाळच्या सेशनमध्ये खताच्या विषयावर चर्चा होती, त्या चर्चेवरच माननीय मंत्रीमहोदयांनी ब्रिफींग घेतलेले दिसते परंतु शिक्षणाच्या प्रश्नाच्या संदर्भात त्यांनी काहीही ब्रिफींग घेतलेले दिसत नाही. गंभीर बाब अशी आहे की, 31 वेळा हा प्रश्न या सभागृहात चर्चेला आल्यानंतरही जर शासनाचे डोळे उघडत नसतील, शिक्षण खात्याला जाग येत नसेल तर ही गंभीर अशी बाब आहे. त्यामुळे माननीय सभापती महोदय, आपण आपल्या दालनात या विषयाच्या संदर्भात निर्णय घ्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 6803....

**सभापती** : परंतु माझा अनुभव वेगळा आहे. सन्माननीय मंत्री महोदय, श्री. बाळासाहेब थोरात, हे नेहमी सर्व विषयाच्या प्रश्नाच्या संदर्भात गंभीर असतात व ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांचे त्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात समाधान कसे होईल यासाठी आपण प्रयत्न करावा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, बसल्या बसल्या असे म्हणत आहेत की, "वित्त मंत्र्यांबरोबर बैठक बोलवा."

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाला काही अर्थ आहे की, नाही याचाच आपल्या सर्वांना विचार करावा लागणार आहे. या विषयाचा तारांकित प्रश्न 12 डिसेंबर, 2001 रोजी उपस्थित झाला होता. 12 डिसेंबर, 2001 ते आतापर्यंत म्हणजे गेल्या 10 वर्षात हा प्रश्न 31 वेळा या सभागृहात चर्चेला गेलेला आहे. हा प्रश्न किती तरी वेळा राखून सुध्दा धरला गेला होता. परवा माननीय शिक्षण मंत्र्यांनी आम्हाला सभागृहात सांगितले होते की, "मी सक्षमपणे दोन्ही विभाग सांभाळू शकतो". त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांकडून आमची एकच अपेक्षा आहे की, माननीय मंत्रीमहोदयांनी आम्हाला आता त्यांचा सक्षमपणा दाखवून द्यावा. सभागृहात 30 वेळा हा प्रश्न उपस्थित करुनही जर या प्रश्नाला न्याय मिळणार नसेल तर आम्ही प्रश्न उपस्थित करावयाचे की, नाही असा प्रश्न आता आमच्या समोर उभा राहिलेला आहे. म्हणून हे अधिवेशन संपण्याच्या आत किंवा येत्या सोमवारी किंवा मंगळवारी या प्रश्नाच्या संदर्भात निर्णय घेऊन माननीय मंत्री महोदय, सभागृहात येणार आहेत काय ? असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, या विषयाच्या संदर्भातील काही बाबी विचाराधीन आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी हायकोर्टाच्या निर्णयाची माहिती दिलेली आहे त्यामुळे ही बाब आम्ही पडताळून पाहू व त्याप्रमाणे याबाबतीतील निर्णय करण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, पडताळून पाहतो म्हणजे काय ? हायकोर्टाचे निर्णय पडताळून पाहण्यासाठी तुम्ही आहात काय? हायकोर्टाचे निर्णय पडताळून पहाण्यासाठी हे सभागृह आहे काय ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 6803....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदर प्रश्न राखून ठेवून पुन्हा हा प्रश्न सोमवारी सभागृहापुढे येऊ द्या. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना तयारी करुन सभागृहात यावयास सांगा.

श्री. दिवाकर रावते : विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांसंबंधीचा हा प्रश्न आहे. सन 2001 साली शासनाने जीआर काढला व विना अनुदानित शाळेतील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भरतीवर बंदी आणली.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6803....

श्री.दिवाकर रावते....

त्यानंतर सन 2004 मध्ये जी.आर.काढून आपण बंदी उठविली. सन 2004 नंतर आपण अनुदान सुरू करायला पाहिजे होते ते देखील केले नाही. त्याला देखील आता 10 वर्षे झाली आहेत. आता त्यांना अनुदान मिळत नसल्यामुळे त्या शिक्षकांना आपण काढून टाकावे असे म्हणत आहात. तेव्हा शासनाने या शिक्षकांचा देखील विचार केला पाहिजे. असे सगळे प्रश्न आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. तो धोरणात्मक आहे. तो मी सभागृहामध्ये वाचून देखील दाखविला आहे. एवढेच नव्हे तर आपण दिलेले रूलिंग देखील वाचून दाखविले आहे. त्यामुळे या सभागृहाची शान राखण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही. हा प्रश्न आपला निषेध करून सभात्याग करावा असा नाही. शासनाला संकोच वाटावा असा हा प्रश्न आहे. हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. त्यामुळे आपण हा प्रश्न राखून ठेवावा. कारण मंत्रिमहोदय काहीच पुढे सरकत नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी मागच्या वेळचे उत्तर देखील पाहिलेले नाही. आता म्हणतात की, बरे झाले आपण लक्षात आणून दिले ते. That is shameful. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा व तो पुढच्या सोमवार, मंगळवारी घ्यावा अशी मी विनंती करीत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. आम्ही यावर विचार करीत आहोत. लवकरात लवकर निर्णय घेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी या भूमिकेचा निषेध करतो. हायकोर्टाच्या निर्णयाविषयी माननीय मंत्रिमहोदय असे बोलत असतील तर ते आम्ही सहन करणार नाही. प्रत्येक शिक्षकांना आम्ही आपण कोर्टात जावे असे सांगायचे काय ? नाही. ही गोष्ट अयोग्य आहे. निषेध करून सभात्याग करणे हा मुद्दा येथे नाही. तसेच आपणही येथे पुढचा प्रश्न पुकारण्याचा विषयसुद्धा नाही. आपले देखील मागच्या वेळचे रूलिंग आहे. त्याप्रमाणे त्यावेळी मंत्रिमहोदयांनी अंमलबजावणी केली, पण उच्च माध्यमिकबाबत अंमलबजावणी करण्याचे त्यांच्याकडून राहून गेले. हायकोर्टाचा निर्णय मी वाचून दाखविला. पण माननीय मंत्रिमहोदयांनी हायकोर्टाचा निर्णय देखील वाचलेला नाही. सभागृहात येताना त्यांनी मागच्या वेळचे उत्तर देखील वाचलेले नाही. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6803.....

प्रा.बी.टी.देशमुख ....

सभागृहाचे कामकाज इतके गलथानपणाने त्यांनी व त्यांच्या खात्याने घेणे हे अत्यंत चुकीचे आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय मंत्रिमहोदय येत्या सोमवार, मंगळवारी बैठक ठेवत असतील तर हा प्रश्न राखून ठेवावा. या सभागृहाची शान, घटनेची शान, हायकोर्टाच्या निर्णयाची शान राखली पाहिजे. आपल्याकडे वेगळा मार्ग नसल्यामुळे मी आता येथे पर्याय सुचविला आहे. त्यासंबंधी तरी माननीय मंत्रिमहोदयांनी काही तरी उत्तर द्यावे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यता नाही. ही बाब आमच्या विचाराधीन आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता का नाही हे मंत्रिमहोदयांनी सांगावे. प्रश्न कधी राखून ठेवतात ? ज्यावेळी माननीय मंत्र्यांचा अभ्यास झाला नसेल त्यावेळी तो राखून ठेवतात. माननीय मंत्रिमहोदयांनी कबूल केले आहे की, आपला अभ्यास झालेला नाही. मागच्या वेळचे उत्तर त्यांना माहिती नाही. हायकोटार्चा निणर्य धोरणात्मक आहे हे देखील मंत्रिमहोदयांनी मागच्या वेळी कबूल केले आहे. आता ही गोष्ट त्यांना ते माहित नाही ही गोष्ट बरोबर नाही. म्हणून घटनेची, हायकोर्टाची या सभागृहाची प्रतिष्ठा राखण्याचा या पेक्षा वेगळा मार्ग मला दिसत नाही.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सोमवारी आपल्या दालनात शिक्षक प्रतिनिधींसमवेत बैठक घ्यावी व त्यानंतर जो काही निष्कर्ष येईल तो सभागृहाला अवगत करावा. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी राजीनामा दिला पाहिजे. ही लाजिरवाणी बाब आहे. शरमेने मान खाली गेली पाहिजे. लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. सभागृहाचा, घटनेचाा अवमान करणारी ही बाब आहे.

यानंतर श्री.अजित....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूकडील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

**सभापती** : अशा गोंधळाच्या परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 35 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 11.50

ता.प्र.क्र.6803..

( स्थगिती नंतर )

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभागृहामध्ये अशा प्रकारचा प्रसंग रेअरली येत असतो.या प्रकरणात हायकोर्टाने स्पष्टपणे पॉलिसी डिसीजन दिलेला आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. त्या संदर्भातील फॉरमॅलिटीज पूर्ण करण्यासाठी काही वेळ लागत असतो परंतु हा वेळ दहा दहा वर्षाचा असू शकत नाही.या बाबतीत आपणसुध्दा या पूर्वी रुलिग दिलेले आहे ते रुलिंग वाचून दाखविले होते ते मी पुन्हा वाचून दाखवत नाही. वर्गामध्ये आम्ही असे शिकवतो की,अपील केले नसेल तर हायकोर्टाचा निर्णय बंधनकारक आहे. उद्या हा धडा बदलून टाकावा लागेल.सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या दालनात बैठक बोलवावी आणि या प्रश्नाच्या सा-या बाजू आपण समजावून घ्याव्यात व तोपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न राखून ठेवण्याच्या बाबतीत आग्रह धरला होता ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. उच्च न्यायालय असो वा सर्वोच्च न्यायालय असो त्यांनी दिलेले जे न्याय निवाडे आहेत त्या न्याय निवाडयाचा त्या त्या विभागातील अधिका-यांनी काळजी पूर्वक अभ्यास करावा असे मला आजही वाटते . एखाद्या प्रकरणातील जर न्याय निवाडा असेल तर त्याचे जे निष्कर्ष असतील ते अलग राहू शकतील परंतु एखाद्या संघटनेने वा एखाद्या समूहाने न्याय मिळविण्यासाठी अपील केले असेल व त्या अनुषंगाने जर उच्च न्यायालय वा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असेल तर तो आपणा सर्वावर बंधनकारक आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी या बाबतीत आता सांगितले आहे. त्याचबरोबर माननीय विरोधी पक्ष् नेते, शिवसेनेचे गट नेते, शिक्षक प्रतिनिधी यांनी या अनुषंगाने माझ्या दालनात आग्रहाने काही बाजू मांडल्या आहेत. माननीय शिक्षण मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी देखील त्या संदर्भात चांगला प्रतिसाद दिला आहे.म्हणून हा प्रश्न राखून ठेवण्याचा निर्णय मी घेतला आहे.या संदर्भात सोमवारी बैठक घ्यावी असे मी म्हणणार नाही पंरतु पुढील आठवडयात दोन तीन दिवसामध्ये ही बैठक बोलाविण्याच्या दृष्टीने व्यवस्था केली जाईल. त्या बैठकीसाठी

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

माननीय शिक्षण मंत्री, माननीय वित्त मंत्री यांना बोलाविण्याची व्यवस्था मी करीन . त्याचप्रमाणे दोन्ही विभागाचे सबंधित सचिव आणि अन्य जणांना बोलाविण्यात येईल. माननीय शिक्षण मंत्री श्री बाळासाहेब थोरात यांना मी सांगू इच्छितो की, तत्पूर्वी शिक्षण विभागाच्या अनुषंगाने हायकोर्टाने जे निर्णय दिलेले आहेत त्या निर्णयाची व्यवस्थित माहिती घेण्याचा प्रयत्न करावा. ज्या काही व्यक्तिगत प्रकरणातील निर्णय असतील तर ते आपण बाजूला ठेवा परंतु शिक्षक संघटनेच्या अनुषंगाने हायकोर्टाने दिलेले जे निर्णय आहेत त्या निर्णयाचा आपण विचार केला पाहिजे. काहीही करुन आपल्याला हा प्रश्न सोडवावयाचा आहे व त्या दृष्टीने आपल्याला वातावरण निर्माण करावयाचे आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, होय

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या दालनात होणारी ही पाचवी बैठक आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्याबाबत मा.वित्त मंत्री व मा.शालेय शिक्षणमंत्री यांच्याशी झालेली एकत्रित चर्चा

**(२) * ६७८५ श्री.विक्रम काळे , प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने केलेल्या, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या विविध मागण्यांच्या संदर्भात दिनांक १५ एप्रिल, २०१० रोजी मा. वित्त मंत्री यांच्या विधानभवनातील दालनात मा.वित्त मंत्री व मा.शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत महासंघाशी चर्चा करुन निर्णय घेण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महासंघाने मांडलेल्या मागण्यांचे स्वरुप काय आहे व चर्चेनंतर मा.मंत्रिमहोदयांनी मागणी निहाय घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) त्यानुसार उक्त चर्चेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) नाही.

बैठकीचे इतिवृत अद्याप अंतिम झालेले नाही.

(२) मागण्यांचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

ए) सहाव्या वेतनआयोगानुसार अर्धवेळ व पूर्णवेळ शिक्षक सेवक, घड्याळी तास शिक्षक, पर्यवेक्षक व उपप्राचार्य यांना सुधारित दराने मानधन मिळणेबाबत.

बी) शैक्षणिक वर्ष २००५-०६ ते २००७-०८ मधील प्रस्तावित पदांना मान्यता मिळणेबाबत.

सी) गणित विषयाच्या प्रात्यक्षिक तासिकांचा कार्यभार गृहीत धरुन वाढीव पदांना मंजुरी मिळणेबाबत.

डी) कनिष्ठ महाविद्यालयील शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी १.१.१९९६ पासून लागू करणेबाबत.

इ) ४२ दिवसांच्या संपकालीन रजा पूर्ववत करण्याबाबत.

एफ) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना २४ वर्षाच्या सेवेनंतर सर्वांनाच विनाअट निवडश्रेणी मंजूर करणेबाबत.

जी) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवा ज्येष्ठतेसाठी डी.एच.ई.ही शासन मान्य शैक्षणिक अर्हता ग्राह्य धरण्याबाबत.

एच) वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी माध्यमिक शिक्षकांप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची विना अनुदान तत्त्वावरील सेवा ग्राह्य धरण्याबाबत.

आय) अनुदानित तुकडीसाठी जादा वैकल्पिक विषय सुरु केल्यास अनुदान तत्वावरच मान्यता मिळणेबाबत.

जे) १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षण सेवकांना अंशदायी निवृत्ती वेतन योजनेतून वगळण्याबाबत.

के) कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर तुकडी मान्यता निकष माध्यमिक स्तराप्रमाणे विद्यार्थी संख्येत सवलत मिळणेबाबत.

एल) कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील कायम विनाअनुदानित मान्यतेमध्ये कायम शब्द वगळणेबाबत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षण विभाग कशा पध्दतीने शिताफीने उत्तर देते त्याचे हे एक ज्वंलत उदाहरण आहे. राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील जवळजवळ 45 हजार शिक्षकांचा प्रश्न गेल्या दहा वर्षापासून प्रलंबित आहे. प्रत्येक अधिवेशनाच्या काळात हे शिक्षक मोर्चे काढत असतात परंतु अजूनही शिक्षण विभागाला जाग येत नाही. गेल्या अधिवेशनामध्ये आझाद मैदानावर मोर्चा काढण्यात आला होता त्यानंतर माननीय वित्त मंत्र्यांनी आणि शिक्षण मंत्र्यांनी वित्त मंत्र्यांच्या दालनात महा संघाच्या पदाधिका-यांबरोबर एक बैठक घेतली होती . ......

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6785...

श्री विक्रम काळे...

जवळपास एक ते सव्वा तास ही बैठक चालली. त्या बैठकीला सर्व शिक्षक आमदार उपस्थित होते. त्यामध्ये काही प्रश्नांच्या बाबतीत निर्णय झाले. याठिकाणी प्रश्न विचारल्यानंतर अजून निर्णय झालेला नाही, चर्चा झालेली नाही, इतिवृत्त मंजूर झाले नाही अशाप्रकारचे उत्तर देण्यात आले आहे. 15 एप्रिल ते 15 जूनपर्यंत तीन महिन्याच्या कालावधीत इतिवृत्ताला अंतिम स्वरुप कां देण्यात आले नाही?

**सभापती** : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांना या सभागृहाचा 25 वर्षांचा अनुभव आहे. त्यामुळे जर त्यांनी एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत विस्तारपूर्वक बोलण्याचे ठरविले तर आपण सर्वजण त्यांचा मान राखतो. अर्थात, त्याच धाटणीने सर्व माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्याची गरज नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या चर्चेच्या अनुषंगाने ज्या 12 मागण्यांवर चर्चा झाली. त्या मागण्यांच्या बाबतीत शासनाने काय कारवाई केली आहे?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 15 एप्रिल रोजी माननीय वित्तमंत्री, माननीय सदस्य व आम्ही सर्वजण चर्चेकरिता बसलो होतो. त्यावेळी करण्यात आलेल्या मागण्यांवर घेण्यात आलेल्या निर्णयास अंतिम स्वरुप अजून प्राप्त झालेले नाही. त्याबाबतीत माझ्या विभागातर्फे पाठपुरावा सुरु आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी फक्त एकाच ओळीमध्ये प्रश्न विचारतो. ज्या 11 मागण्यांवर त्या बैठकीमध्ये चर्चा झाली, त्यावर काय निर्णय झाला तो याठिकाणी देण्यात आलेला नाही. त्या बैठकीला आम्ही उपस्थित होतो व त्या मागण्यांची कागदपत्रे माझ्याकडेही आहेत. याठिकाणी "बैठकीचे इतिवृत्त अंतिम झालेले नाही" असे म्हटले आहे. माननीय शिक्षण मंत्री व माननीय अर्थमंत्री यांच्यासमवेत आम्हा पाच-सहा आमदारांची दीड तास बैठक झाली. प्रश्न असा आहे की, या ठिकाणी आपण सर्व मागण्या दिलेल्या आहेत त्यामुळे एक पान भरले आहे. त्या कार्यवृत्ताला अंतिम स्वरुप देऊन आपण आम्हाला आठ ते पंधरा दिवसामध्ये उत्तर देणार काय? कारण इतिवृत्ताला अंतिम स्वरुप दिल्याशिवाय निर्णय घेऊ शकत नाही ही आपली अडचण आम्ही समजू शकतो. याठिकाणी उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा प्रश्न नाही. त्यामुळे त्या बैठकीमध्ये आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6785.... प्रा. बी. टी. देशमुख....

कोणती भूमिका घेतली? यासंबंधीची माहिती आपण आठ, पंधरा दिवसात किंवा एक महिन्यात कळविली तर आम्ही आपले आभारी होऊ.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, त्या इतिवृत्तावर माझी सही होऊन माननीय वितमंत्र्यांकडे पाठविण्यात आले आहे. ते इतिवृत्त तातडीने मंजूर करावे अशी त्यांना विनंती करण्यात येईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री त्या बैठकीला होते, दीड तास बैठक झाली. ती बैठक आपण बोलाविली होती, त्याकरिता आपण नोटिस दिली होती. या प्रश्नाच्या बाबतीत आपण गंमत करीत आहात अशाप्रकारचा मेसेज बाहेर जात आहे. कार्यवृत्त लिहिण्याचे काम आपणाकडून झाले आहे, ते आम्ही लिहिलेले नाही. त्यामुळे याबाबतीत आपण आठ दिवसात, पंधरा दिवसात किंवा महिन्याभरात उत्तर दिले तर सभागृहाला आनंद होईल.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांकडून लवकरात लवकर ते इतिवृत्त मान्य करुन घेण्याचा माझा प्रयत्न राहील.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील ८ वी इयत्तेपर्यंतच्या सर्व शाळांना अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव**

**(३) * ७७३० श्री.राजन तेली , श्री.विक्रम काळे , ॲड. उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी, शाळांकडे पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी, शैक्षणिक साधनांची असलेली कमतरता पूर्ण करण्यासाठी तसेच अध्यापनासाठी दर्जेदार शिक्षक नेमण्यासाठी ८ वी इयत्तेपर्यंतच्या सर्व शाळांना अनुदान देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान देण्याबाबतच्या प्रस्तावावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) दि.१६ जून, २००९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या राज्यातील (इंग्रजी माध्यम वगळता) अन्य सर्व माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदानावर आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शाळा अनुदानावर येईपर्यंत आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करणे तसेच शाळेच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करणे ही संबंधित संस्थाचालकांची जबाबदारी आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.राजन तेली :सभापती महोदय, १६ जून, २००९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत काय? असल्यास, त्या आदेशाचे स्वरुप काय आहे? त्याप्रमाणे या शाळांमधील विद्यार्थ्यांना खिचडी व मोफत पुस्तके पुरविणार काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, १६ जून २००९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये कायम विना अनुदानित शाळांच्या बाबतीत "कायम" हा शब्द काढून विना अनुदानावर त्या शाळा आणण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या निर्णयाप्रमाणे शाळांचे मूल्यांकन करुन २०१२ पर्यंत सुरुवातीला २० टक्के व त्या नंतरच्या क्रमानुसार २० टक्के, ४० टक्के व ६० टक्के या क्रमानुसार अनुदान देण्यात येईल. शाळांचे मूल्यांकन करुन ते काम पुढील दोन महिन्यात संपविण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करु. (यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/ प्रथम श्री. सरफरे.... 12:00
ता.प्र.क्र.7730...

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, कायम अनुदान न देण्याच्या बाबतीतील जे धोरण होते त्या धोरणानुसार काही शाळांना परवानगी देण्यात आली होती. आता शासन अनुदान देत आहे, ही चांगली गोष्ट आहे. परंतु काही संस्था अशा आहेत की, त्यावेळेला त्यांना शाळा सुरु करावयाच्या होत्या परंतु शासनाने अट घातली होती आणि आम्ही अनुदान मागणार नाही अशा पध्दतीचे अंडरटेकिंग लिहून घेतले जात होते त्यामुळे ज्यांनी शाळा सुरु केल्या नाहीत त्यांच्यावर या निर्णयामुळे अन्याय करण्यात येत नाही काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मला असे वाटत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कायम विना अनुदानित शाळा पहिल्यांदा मागून घ्यायच्या. त्यावेळी शासनाला असे सांगायचे की, आम्हाला तुमच्या अनुदानाची गरज नाही, आम्ही त्याशिवायही चालवू शकतो. तुम्ही फक्त शाळेला मान्यता द्या. त्यावेळी सरकारचेही धोरण असे असते की, चला आपल्यावरचा बोजा कमी होत आहे. कोणाचे ओझे कोणाच्या खांद्यावर. ते त्यांच्या खांद्यावर जाऊ द्या. येथ पर्यंत ठीक होते. सभापती महोदय, कायम विनाअनुदानित मधील कायम हा शब्द काढण्याकरिता या सदनाचा खूप वेळ खर्च झालेला आहे. याचे कारण हे संस्थाचालक आमच्याकडे यायचे, आम्हाला भरीस पाडायचे आणि मग आम्ही या सरकारकडे 'कायम' शब्द कधी काढता, कधी काढता असा सारखा तगादा लावायचो. केव्हा माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम तर केव्हा अन्य मंत्रिमहोदय या बाबतीत शब्द द्यायचे. त्याप्रमाणे मंत्रिमंडळाने यामधील कायम हा शब्द काढून अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मला आनंद झाला. परंतु यातील सर्वात महत्वाचा जो भाग आहे त्या प्रश्नाचे उत्तर मला माननीय मंत्रिमहोदयांकडून मिळाले पाहिजे. कायम हा शब्द काढून जशी उपलब्धी होईल त्याप्रमाणे या शाळांना अनुदानितवर आणण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. "या शाळा अनुदानावर येईपर्यंत आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करणे तसेच शाळेच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करणे ही संबंधित संस्थाचालकांची जबाबदारी आहे" असे उत्तरात म्हटले आहे. 'कायम' हा शब्द काढल्यामुळे या संस्था अनुदानास पात्र झाल्या आहेत. त्यामुळे अनुदान जेव्हा येईल तेव्हा येईल पण त्या अनुदानाच्या भरवशावर शिक्षकांची पिळवणू केली जाईल. पैसे घेऊन शिक्षकांना नोकरीत घेण्यात येईल. तसेच अनुदान उपलब्ध होईपर्यंत शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या जाणार नाहीत या बाबतीत

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शासन कोणती यंत्रणा उभी करणार आहे?अशा संस्थाचा शोध घेऊन त्यांची मान्यता रद्द करणार काय?

श्री. बाळासाहेब थोरात: सभापती महोदय, सन्मानीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे. ज्यावेळी ही कायम विनाअनुदानित योजना घेण्यात आली त्यावेळी सर्व संस्थांनी 100 रुपयाच्या स्टँम्पपेपरवर आम्ही अनुदान मागणार नाही आणि शैक्षणिक सुविधा पूर्णपणे निर्माण करु असे लिहून दिलेले आहे. त्यानंतर जनतेकडून मागणी आली. लोकप्रतिनिधींची मागणी आली आणि त्यातील कायम हा शब्द काढला त्यामुळे जवळ जवळ 400 कोटी रुपयाचा भार शासनावर पुढच्या कालखंडामध्ये पडणार आहे. हा निर्णय घेत असताना या शब्दांकडे काही महत्वाच्या मूलभूत गोष्टी असणे आवश्यक आहे. त्यामध्ये आवश्यक विद्यार्थी संख्या, त्यांची गुणवत्ता, चांगल्या गुणवत्तेचा शिक्षकांचा स्टाफ तसेच भौतिक आवश्यक सुविधा असणे हे महत्वाचे आहे.या सगळयांचे  मूल्यांकन पुढील चार महिन्यात पूर्ण करण्यात येईल. या मूल्यांकनामध्ये ज्या संस्था बसणार नाहीत त्या अ,ब,क,ड या वर्गवारीमध्ये जातील. मूल्यांकनामध्ये ज्या संस्था अनुदानित होऊ शकणार नाहीत त्यांना या सगळया सुविधा पूर्ण करण्याकरिता पुढचा कालखंड मिळणार आहे. सन 2012 मध्ये ज्या संस्थाना अनुदानितवर आणण्यात येणार आहे त्यांना आपण मूल्यांकनामध्ये अमुक या बाबतीत कमी पडलो आहोत हे लक्षात येईल आणि त्या सुविधा पूर्ण करण्याकरिता त्यांना एक ते दीड वर्षाची कालावधी मिळणार आहे. या दृष्टीने या संस्थांचे मूल्यांकन पूर्ण करुन या संस्थांनी सगळया सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये असे महटले आहे की,"आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करणे तसेच शाळेच्या शैक्षणिक  विकासाच्या दृष्टीने प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करणे ही संबंधित संस्थाचालकांची जबाबदारी आहे". सभापती महोदय, या उत्तराचा फायदा घेऊन गेली दहा-पंधरा वर्ष कायम विनाअनुदानित शाळांमध्ये बिन पगारी किंवा अत्यंत तुटपुंज्या पगारावर जे शिक्षक काम करीत होते त्यांना काढून सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी म्हटल्याप्रमाणे पैसे घेऊन नवे शिक्षक नेमले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सगळया जुन्या शिक्षकांना प्रोटेक्शन देण्याची गरज आहे. शासनाच्या या उत्तराचा फायदा

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7730...

श्री. कपिल पाटील....

सगळे संस्था चालक घेतील त्यामुळे या सबंधात दुरुस्ती करणार काय आणि या शिक्षकांना प्रोटेक्शन देण्यात येईल काय?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मूल्यांकन चार महिन्यात करण्यात येणार आहे आणि त्यानंतर 2012 नंतर अनुदान देण्यात येईल परंतु तोपर्यंत शिक्षण हक्क कायद्यानुसार त्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके आणि खिचडी देणे ताबडतोब सुरु करणार काय?

या नंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7730....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये मी तीन महत्वाच्या बाबी सांगितलेल्या आहेत. त्या ठिकाणी विद्यार्थी संख्या, त्यांची गुणवत्ता आणि शिक्षकवर्ग असणे आवश्यक आहे. शिक्षकाचे जे रोस्टर ठेवतो त्या रोस्टरप्रमाणे शिक्षक असले पाहिजेत. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले तशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारत नाही. यापूर्वी सुध्दा शाळा अनुदानावर आल्या तेव्हा जुन्या शिक्षकांना काढून टाकण्याचा प्रयत्न झाला. आतापर्यंत त्यांच्या कडून सेवा करुन घेतली आणि अनुदानावर येण्याच्या वेळी त्यांना काढून टाकले असे होत असेल तर ते योग्य नाही. रोस्टरची बाब त्या ठिकाणी पाळावी लागेल. त्यांना अशा प्रकारे काढले जाऊ नये याची काळजी आम्ही घेऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देत असताना सांगितले की, या माध्यमिक आणि प्राथमिक शाळा अनुदानावर आणत असताना चार महिन्यामध्ये मूल्यांकन करु. मी माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपली जी मूल्यांकनाची पध्दत आहे त्यामध्ये आतापर्यंत माध्यमिक आणि प्राथमिक शाळांचे जे मूल्यांकन झाले त्यामध्ये आपल्या शिक्षण अधिकाऱ्यांनी दहा दहा हजार रुपये घेतलेले आहेत. म्हणून ही मूल्यांकनाची पध्दत बदलून त्या ठिकाणी कोणाही एकाला अधिकार न देता त्या खात्यातील दोन तीन लोकांची समिती करुन त्यांचे मूल्यांकन करणार की शिक्षण अधिकाऱ्याला अधिकार देणार ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये नवीन पध्दतीने जाण्याचा आमचा प्रयत्न आहे. ज्या शाळा आहेत त्यांच्यासाठी वेबसाईटवर फॉरमॅट टाकण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्याप्रमाणे त्यांनी मूल्यांकनाची सर्व माहिती भरावयाची आहे. असे मूल्यांकन सॉफ्टवेअरच्या सहाय्याने होईल आणि त्याची तपासणी करण्यात येईल. यामध्ये सुटसुटीतपणा आणि पारदर्शकपणा येईल याची काळजी घेत आहोत.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, हे मूल्यांकन करीत असताना शासनाने एक गोष्ट लक्षात घ्यावी अशी विनंती आहे. काही शाळा 2001 च्या पूर्वीपासून चालू आहेत. काही शाळांमधील

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7730.... डॉ. सुधीर तांबे ....

शिक्षक 12 ते 14 वर्षे विनावेतन काम करीत आहेत. त्या शाळांमध्ये जे जुने शिक्षक अनेक वर्षापासून काम करीत आहेत त्यांचा सुध्दा विचार मूल्यांकन करीत असताना करावा. आपण 2012 पासून अनुदान देणार आहोत. अशा शाळांना 100 टक्के अनुदानापासूनच सुरुवात करावी. त्यांना टप्प्याटप्प्याने अनुदान देऊ नये. शासन असा विचार करील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची नोंद घेतलेली आहे आणि त्याचा विचार करु.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आदिवासी/नक्षलग्रस्त भागातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोंन्नती व अतिरिक्त घरभाडे भत्ता योजना लागू करणेबाबतची मागणी**

**(४) * ७२२२ श्री.व्ही.यु. डायगव्हाणे , श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २७६६ ला दिनांक १ एप्रिल, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली व इतर आदिवासी/नक्षलग्रस्त जिल्ह्यातील खाजगी माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळांतील ज्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १४ ऑगस्ट, २००८ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे एकस्तर पदोन्नतीचा लाभ मिळत नाही, ही वस्तुस्थिती पहाता याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेऊन उचित निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, केव्हा, व घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) क्षेत्रिय कार्यालयांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, आदिवासी नक्षलगस्त भागातील हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. नक्षलग्रस्त भागामध्ये, आदिवासी भागामध्ये फक्त खाजगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांना एकस्तर पदोन्नतीचा आणि घरभाडेभत्त्याचा लाभ मिळत नाही. इतर सगळ्यांना त्याचा लाभ मिळतो. दिनांक 14 ऑगस्ट, 2008 ला जो शासन निर्णय काढलेला आहे त्याप्रमाणे या कोणालाही लाभ होत नाही. दिनांक 1 एप्रिल, 2010 रोजी हा प्रश्न सभागृहामध्ये आला होता त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी असे म्हटले होते की, मंत्रिमंडळापुढे आणण्यासाठी मी निश्चितपणे प्रयत्न करीन आणि तातडीने निर्णय घेण्यासाठी कार्यवाही करीन. परंतु आता असे उत्तर दिले आहे की, क्षेत्रीय कार्यालयांकडून माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अनेक वेळा हा प्रश्न सभागृहासमोर आलेला आहे. हा कॉमन प्रश्न आहे. नक्षलगस्त भागामध्ये ही डिस्पॅरिटी आहे. यामध्ये कोर्टाचा निर्णय नसला तरी त्या ठिकाणी डिस्पॅरिटी आहे. म्हणून पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या दालनामध्ये माननीय मंत्रिमहोदय तसेच माननीय वित्तमंत्री महोदय यांची जी बैठक होणार आहे त्या बैठकीमध्ये हाही प्रश्न चर्चेला घेता आला तर ते योग्य होईल. कारण हा कॉमन प्रश्न आहे. त्या बैठकीमध्ये हा प्रश्न चर्चेला घेऊन निर्णय घेणार काय ?

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7222 ...

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये सांगितले होते आणि हा अत्यंत योग्य प्रकारचा प्रश्न आहे. काही बदली म्हणून जातात त्यांना काही काळ लाभ मिळतो परंतु जे कायम राहणार आहेत त्यांना लाभ मिळावा. माध्यमिक शाळांमधील हा सेवकवर्ग आहे. सर्व क्षेत्रीय माहिती एकत्र करीत आहोत. कारण कॅबिनेट नोट तयार करण्याकरिता ही माहिती आवश्यक आहे. या पध्दतीने लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर जाण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7222...

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ख-या अर्थाने नक्षलवादी भागामध्ये हे शिक्षक स्वत:च्या जीवावर उदार होऊन काम करीत असतात. नक्षलवाद्यांनी नुकतीच एका शिक्षकाची हत्या केलेली आहे. हे शिक्षक तेथे रहात असताना त्यांना या सर्व गोष्टींपासून वंचित ठेवणे योग्य होणार नाही. शासनाने यासंबंधी दिनांक 14.8.2008 रोजी निर्णय घेतला आहे. त्यानंतर क्षेत्रीय कार्यालयाकडून माहिती मिळाल्यानंतर निर्णय घेऊ असे लेखी उत्तर दिले जाते. दोन वर्षानंतरही क्षेत्रीय कार्यालयाकडून माहिती का मिळत नाही, यामध्ये कोणती अडचण आहे ? यासंबंधी शासन तातडीने निर्णय घेणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : मी सभागृहात आश्वासन दिल्यानंतर हे आदेश निघाले होते. त्याची पूर्तता होत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, एक महिन्यामध्ये ही माहिती गोळा केली जाईल का ? या प्रश्नाबाबत मंत्री महोदयाकडून हा प्रश्न विचाराधीन आहे, करणार आहे, लवकरात लवकर करण्यात येईल, अशाप्रकारची उत्तरे येत आहेत. म्हणून एक महिन्यात याबाबत कार्यवाही पूर्ण करणार का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माहिती कलेक्ट करु.

श्री.कपिल पाटील : मंत्री महोदयांनी कबूल केले आहे की खाजगी माध्यमिक शाळेतील थोडया शिक्षकांचा हा प्रश्न आहे. आतापर्यंत नक्षलवाद्यांनी 2 शिक्षकांची हत्या केली आहे. अतिशय दुर्गम भागामध्ये आपले गाव व संसार सोडून हे शिक्षक काम करीत असतात. त्यांच्या बाबतीत शासन एक महिन्यात सकारात्मक निर्णय घेणार आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : याबाबतची माहिती गोळा करुन मंत्रिमंडळासमोर जात आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

**राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(५) * ७५५८ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.व्ही.यु. डायगव्हाणे, श्री.जयंत पाटील, श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.संजय केळकर , श्री.भगवान साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०८ ला दिनांक २५ मार्च, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ न केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने दि.१३ मे, २०१० रोजी आझादमैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण सेवकांच्या मानधनवाढीच्या विषयावर अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा घडवून आणली जाईल असे अश्वासन दि.२५ मार्च, २०१० रोजी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विषयाबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय,

(२), (३) व (४) सदर बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक वर्षांपासून मी सातत्याने विचारत आहे. राज्यातील शिक्षण सेवकांना शासन वेठबिगारासारखे वागवित आहे अशाप्रकारचे ताशेरे कोर्टाने ओढले आहेत. या शिक्षण सेवकांना शासन अतिशय तुटपुंजे मानधन देत आहे. हे मानधन वाढविण्याचे शासनाने ठरविले होते त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झालेली नाही. शासनाने किमान वेतनाचा कायदा केलेला आहे. या शिक्षकांपेक्षा बांधकाम मजुराला सुध्दा जास्त वेतन मिळते. या शिक्षण सेवकांना केवळ 3 हजार रुपये वेतन मिळते. त्यामुळे तातडीने मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मानधन वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर करुन घेणार आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शिक्षण सेवकांचे मानधन वाढविण्याचा हा प्रश्न आहे. हा प्रश्न बराच काळ प्रलंबित आहे ही वस्तुस्थिती आहे. यासंबंधी समिती गठीत केली होती. त्या समितीने 7 हजार, 8,500 व 11,500 रुपयांपर्यंत वेतन देण्याची शिफारस केली आहे. हा प्रस्ताव विभागाने मंत्रिमंडळासमोर नेला होता, परंतु तो प्रलंबित राहिला आहे. हा प्रस्ताव पुन्हा मंत्रिमंडळासमोर आणून कार्यवाही केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7558.....

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रश्न दिनांक 25 मार्च, 2010 रोजी चर्चेला आला होता. त्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, हा विषय मंत्रिमंडळासमोर प्रलंबित आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणून निर्णय घेऊ. ते अधिवेशन संपण्यापूर्वी असे म्हटले होते. मागील कालावधीत हा विषय पुन्हा मंत्रिमंडळासमोर घेऊन गेला होता काय आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत काय निर्णय झाला होता ?

श्री.बाळासाहेब थोरात : हा विषय मंत्रिमंडळासमोर नेला होता. त्यादिवशी तो संमत होऊ शकला नाही. त्यामुळे हा विषय पुन्हा मंत्रिमंडळासमोर निर्णयासाठी आणत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : मागील वेळा याठिकाणी जे उत्तर दिले होते की, मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय पुढे ढकलण्यात आला आहे. तो विषय नाकारला गेला नाही. हा विषय नाकारण्यासारखा नाही, कारण या शिक्षण सेवकांची नेमणूक तुटपुंज्या वेतनावर होते. त्याचे कंपेरेबल रिव्हीजन करुन समितीने अशी शिफारस केली होती की, प्राथमिकच्या शिक्षकांना 7 हजार रुपये, माध्यमिकच्या शिक्षकांना 8.50 हजार रुपये व उच्च माध्यमिकच्या शिक्षकांना 11.50 हजार रुपये वेतन देण्यात यावे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.7558... प्रा. बी.टी.देशमुख...

हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे विचाराधीन आहे असे 25 मार्च 2010ला सभागृहात उत्तर दिलेले होते. विधिमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर मंत्रिमंडळापुढे हा प्रश्न ठेवून चर्चा घडवून आणू असेही सांगितले होते. तुटपुंज्या पगारावर काम करणा-या लोकांच्या बाबतीत निर्णय घ्यायला विलंब लावणे इष्ट नाही. तेव्हा या बाबतीत माननीय मंत्री महोदय एक ठराविक कालमर्यादा घालून आणि सर्व कार्यवाही पूर्ण करुन शासन निर्णय केव्हा निर्गमित करतील ?

श्री. बाळासाहेब थोरात : याबाबतीत एकदा मंत्रिमंडळापुढे गेलो होतो. परंतु तो प्रश्न प्रलंबित राहिला. पुन्हा हा प्रश्न मंत्रिमंडळापुढे लवकरात लवकर विचारार्थ आणण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

श्री. चंद्रकांत पाटील : शिक्षण सेवक ही तात्पुरती व्यवस्था सुरु केली होती. अशा प्रकारे शिक्षण सेवक नेमण्याचा जो निर्णय घेतलेला आहे ती एक प्रकारची वेठबिगारीच आहे. ही वेठबिगारी आणखी किती वर्षे चालू ठेवण्यात येणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : शिक्षण सेवकाचा अवधी तीन वर्षाचा आहे. तीन वर्षानंतर तो शिक्षक होतो. तीन वर्षे त्याला 3 हजार रुपया पेक्षा जास्त मानधन मिळावे असा आमच्या विभागाचा प्रस्ताव आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, यासंदर्भात आपण शासनाला निर्देश दिले पाहिजेत. माननीय मंत्रिमहोदय हे कॅबिनेट मंत्री आहेत. त्यामुळे आम्ही कॅबिनेट पुढे जाऊ अशा प्रकारचे उत्तर त्यांनी देणे संयुक्तिक नाही. शासनाला 30 दिवस आधी प्रश्न विचारला जातो. या कालावधीत शासन काय करते ? या कालावधीत माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारचा प्रश्न माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊन सांगितले पाहिजे की, याबाबतीत सभागृहाला ठोस असे आश्वासन दिलेले आहे. म्हणून याबाबतीत निर्णय घेऊन निश्चित अशा प्रकारचे उत्तर सभागृहाला देणे आवश्यक आहे. परंतु मागच्या वेळी जे उत्तर दिले तेच उत्तर आता दिलले आहे. तेव्हा समितीने जो काही अहवाल दिलेला आहे त्याबाबतीत शासन किती दिवसात निर्णय घेणार आहे ? मी पुन्हा मंत्रिमंडळापुढे जाईन अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी देऊ नये. सभापती महोदय, याबाबतीत आपण काही निर्देश द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.7558...

**सभापती** : एखाद्या विषयी अंतिम निर्णय घ्यावयाचा असेल तर तो विषय मंत्रिमंडळासोर मांडणे आणि त्याचा पाठपुरावा करणे हे त्या विभागाच्या मंत्र्यांचे काम आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रश्न मंत्रिमंडळाला कसा पटेल आणि सुटेल यादृष्टीने मंत्री महोदयांनी पाठपुरावा करावा.

श्री. विक्रम काळे :एकदा हा प्रश्न मंत्रिमंडळापुढे गेलेला होता. नेमके त्या दिवशी शिक्षणमंत्री उपस्थित नव्हते. मी त्यावेळी उपस्थित होतो. बैठक क्षणात संपली आणि लगेच "शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ" अशी बातमी दूरदर्शन वाहिन्यांवरुन प्रसारित झाली होती. तेव्हा या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून लवकरात लवकर मंत्रिमंडळापुढे जाऊन हा प्रश्न सोडविला जाईल काय ? सभापती महोदय, शिक्षण सेवकाला वेठबिगा-यासारखे राबविले जात आहे. शेतामध्ये काम करणा-या महिलेला सुध्दा दिवसाला 150 रुपये रोजगार मिळतो आणि शिक्षण सेवकाला दिवसाला 100 रुपये मिळतात, याचा विचार शिक्षण मंत्री करणार आहेत की नाही ? तेव्हा या प्रश्नाच्या बाबतीत निश्चित किती दिवसात निर्णय घेण्यात येईल ?

श्री. बाळासाहेब थोरात : कमीत कमी दिवसात या बाबतीत निर्णय करुन घेतला जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**----**

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>औचित्याचे मुद्दे</u>

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. बाभळी बंधा-याच्या बाबतीत या सदनामध्ये अनेक वेळा चर्चा झाल्‌ेली आहे. मराठवाड्यात जे सिंचनाचे बंधारे व्हायचे आहेत त्यापैकी हा बाभळी बंधारा आहे.

....नंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 12:20

श्री.दिवाकर रावते........

बाभळी बंधारा महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये बांधला जात आहे. दीड टीएमसी क्षमतेचा हा बंधारा आहे. हा विषय घेऊन आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री व सध्याचे आमदार श्री.चंद्राबाबू नायडू यांनी महाराष्ट्राच्या सिंचनाबाबत आलाप प्रताप निर्माण केला आहे. स्वत:चे राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी आज त्यांनी जे पाऊल उचलले आहे ते अत्यंत गंभीर आहे. आंध्रप्रदेशमधील सहकारी आमदारांना घेऊन ते बाभळी परिसरात या बंधाऱ्याला विरोध दर्शविण्यासाठी येणार आहेत. ही त्यांची कृती कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे हे शासन सांगू शकेल. परंतु बाभळी बंधाऱ्याबाबत हरकत घेण्यात आली आहे. त्याचवेळेला मराठवाड्यातील सर्वपक्षीय नेते एकत्र येऊन बाभळी बंधाऱ्याच्या परिसरात त्यांना प्रतिकार करण्यासाठी जात आहेत. यामुळे बाभळी बंधाऱ्याच्या परिसरामध्ये युध्दभूमी निर्माण होणार आहे. सिंचनाच्या दृष्टीने दीड टीएमसीचा छोटा बंधारा बांधण्यात येत असताना जणूकाही 200 ते 300 टीएमसी पाणी पळविण्यात येत आहे असा अविर्भाव निर्माण करुन युध्द पेटविण्याचा प्रयत्न होत आहे. याचा परिणाम मराठवाड्यात गोदावरी खोऱ्यामध्ये जे सहा बंधारे बांधण्यात येणार आहेत त्या बंधाऱ्यांच्या बांधकामाबाबत अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे तो अत्यंत अयोग्य आहे. तेथे युध्दभूमी निर्माण होणार आहे, त्याबाबत राज्य शासनाने कोणती दखल घेतली आहे? शासन कोणती उपाययोजना करणार आहे? श्री.चंद्राबाबू नायडू हे एका पक्षाचे अध्यक्ष व आमदार आहेत. ते आपल्या सहकारी आमदारांसमवेत त्याठिकाणी विरोध दर्शविण्यासाठी येत आहेत. त्यांना प्रतिबंध करण्यासाठी शासन काय करणार आहे? ही बाब सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे शेजारच्या राज्याकडून राजकीयदृष्टया मराठवाड्याच्या सिंचनाबाबत अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न होत असेल तो मोडून काढला पाहिजे. शासनाने या संदर्भात आजच या सदनाच्या माध्यमातून मराठवाड्यातील जनतेच्या दृष्टीने नांदेड जिल्हयातील बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात भूमिका विशद केली पाहिजे, अशी मी विनंती करतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा मराठवाड्याच्या अस्मितेचा प्रश्न आहे. मराठवाडयामध्ये दरवर्षी अतिशय कमी पाऊस पडतो. म्हणून महाराष्ट्र शासनाने बाभळी बंधाऱ्याचे काम सुरु केले. हे काम प्रगतीपथावर आहे. असे असताना लोकांच्या मनामध्ये वेगळ्या प्रकारची भावना निर्माण करण्याचा आणि तेथील वातावरण दूषित करण्याचा हेतू मनामध्ये ठेवून आंध्रप्रदेशचे

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.........

माजी मुख्यमंत्री श्री.चंद्राबाबू नायडू आणि त्यांचे सहकारी आमदार त्याठिकाणी विरोध दर्शविण्यासाठी येणार आहेत, अशा प्रकारची बातमी सकाळ या वृत्तपत्रामध्ये आज प्रसिध्द झाली आहे. त्यामुळे कदाचित त्या भागात हिंसक वातावरण निर्माण होऊ शकते. याबाबत शासन तातडीने कोणती उपाययोजना करणार आहे? हा मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा आणि विशेषत: नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. याबाबत शासनाने ठोस भूमिका घेतली पाहिजे. जे कोणी त्याठिकाणी विरोध दर्शविण्यासाठी येणार असतील त्यांना रोखून बाभळी बंधाऱ्याला कोणतीही हानी पोहोचणार नाही यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे?

**सभापती** : या अतिशय महत्वाच्या औचित्याच्या प्रश्नाबाबत सन्माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे या प्रश्नाबाबत शासनाने अतिशय गंभीरपणे दखल घेतली आहे. विशेषत: नांदेड जिल्हयातील 58 गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा आणि साधारणपणे 8 हजार हेक्टर शेतजमिनीला पाणी मिळावे म्हणून 2.74 टीएमसी क्षमतेच्या बाभळी बंधाऱ्याचे काम राज्य सरकारने सुरु केले. आंध्रप्रदेश राज्याने या कामाला हरकत घेऊन सुप्रीम कोर्टात धाव घेतली. 2006 साली आंध्रप्रदेश राज्याने सुप्रीम कोर्टात खटला दाखल केला. दिनांक 25 व 26.4.2007 रोजी सुप्रीम कोर्टात या खटल्याची सुनावणी झाली. सुप्रीम कोर्टाने बाभळी बंधाऱ्याच्या बांधकामाला स्थगिती दिलेली नाही. कोर्टाच्या अंतिम निर्णयानंतर पाणी अडविता येणार असले तरी बंधाऱ्याचे काम करण्यास निर्बंध घातलेले नाहीत. त्यामुळे राज्य सरकारने काम पूर्णत्वास नेले आहे. 170 कोटी रुपयाच्या कामावर आतापर्यंत 165 कोटी रुपये खर्च झालेला आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार राज्य सरकारने पाणी अडविण्यासाठी बंधाऱ्याचे दरवाजे बसविलेले नाहीत. ही बाब सुप्रीम कोर्टात प्रलंबित असताना आज श्री.चंद्राबाबू नायडू आणि त्यांचे सर्व सहकारी ज्या पध्दतीने महाराष्ट्रामध्ये आणि त्या बंधाऱ्याच्या ठिकाणी विरोध दर्शविण्यासाठी येऊ इच्छितात ही बाब अतिशय बेकायदेशीर आहे.

नंतर श्री.खर्चे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.........

आलमपट्टी धरणाकडे पाणी सोडले त्यावेळेस आपल्या पाटबंधारे विभागाचे सचिव तेथे गेले असता कर्नाटक सरकारने त्यावर बंदी घातली होती आणि त्यांना सीमेवरुनच परत पाठविले. तेव्हा कर्नाटक सरकारचे हे कृत्य बेकायदेशीर असल्याचे आम्ही सांगण्याचा प्रयत्न केला. बाभळी बंधाऱ्याच्या परिसरात राज्य शासनाने जमावबंदी घोषित केलेली आहे आणि आपल्यासारख्या ज्येष्ठ व्यक्तिला अशा प्रकारे बाभळी बंधाऱ्यावर येणे योग्य नाही असेही त्यांना आपण सांगितले. वास्तविक पाहता आंध्र प्रदेश राज्य हे एक चांगल्या प्रकारचे शेजारी राज्य आहे. त्या राज्याच्या प्रत्येक प्रोजेक्टला आपल्या राज्याने नेहमीच पाठिंबा देण्याची भूमिका घेतली आहे. याच बाभळी बंधाऱ्याच्या खाली पोचमपाड श्रीरामसागरसारखे जे 113 टीएमसीचे मोठे डॅम आहे त्या 112 टीएमसी पाण्यापैकी 65 टीएमसी पाणी आपल्या राज्याच्या हद्दीत साचत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात क्षेत्र देण्यासाठी राज्यशासन सहकार्य करीत आहे म्हणूनच हे क्षेत्र आपण त्यांना दिलेले आहे. 65 टीएमसी पाणी आपल्या राज्याच्या हद्दीत साठविण्याइतपत जमीन उपलब्ध करुन दिली म्हणूनच एवढे मोठे डॅम आंध्र प्रदेश घेऊ शकले. एवढी सहकार्याची भूमिका घेऊन सुध्दा केवळ राजकारणाने प्रेरित होऊन ते अशा प्रकारे प्रवेश करु इच्छित असतील तर शासनाने त्या भागात 144 कलम घोषित केलेले आहे, याचेही भान त्यांनी ठेवावे. या निमित्ताने मी असे आवाहन करतो की, 144 कलम घोषित केलेले असताना आंध्र प्रदेशातील राजकारण्यांनी त्या भागात येऊ नये आणि तरीही येण्याचा प्रयत्न केला तर कायद्याप्रमाणे राज्यशासन निश्चितपणे कारवाई करील. वेळप्रसंगी त्यांना अटक करण्याची भूमिका सुध्दा पोलिसांकडून पार पाडली जाईल. पण आंध्र प्रदेशाबरोबर आपल्या राज्याचे नेहमीच चांगले संबंध राहिले आहेत. प्रत्येक प्रकल्पाला आपण त्यांना पाठिंबा दिलेला आहे. एवढा चांगला शेजारी असूनही चांगले संबंध बिघडविण्याचे पाप आंध्र प्रदेशातील माननीय चंद्राबाबू नायडू यांनी करु नये, एवढेच आवाहन करु इच्छितो. तरी देखील त्यांनी कायदा हातात घेतला तर राज्यसरकार सुध्दा झोपलेले नाही, ही जाणीव करुन देऊ इच्छितो.

------

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, आरोग्य सेवेशी संबंधित जे वैद्यकीय अधिकारी राज्यात कार्यरत आहेत, त्यात वर्ग-1 व वर्ग-2 चे अधिकारी अंतर्भूत आहेत, त्या अनुषंगाने मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. खरे म्हणजे अधिवेशन काळात आणि अधिवेशन नसताना देखील आरोग्य सेवेच्या बाबतीत असंख्य तक्रारी ऐकायला मिळत असतात, रिक्त पदांच्या बाबतीत सुध्दा अनेक वेळा आश्वासने मिळतात, तक्रारींची चर्चा होत असते. शासनाच्या नियमाप्रमाणे उच्च व्यावसायिक अधिकारी 58 व्या वर्षी निवृत्त होतात. त्यानंतर देखील ते 8-10 वर्षे प्रॅक्टीस करतात. पण त्यांची रिक्त पदे भरण्यासाठी तेवढेच अर्हताप्राप्त उमेदवार मिळत नसल्यामुळे ती पदे कायमच रिक्त राहतात. शासनाने सन फेब्रुवारी, 2010 मध्ये शासन निर्णय निर्गमित करुन वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालननालय आणि आयुर्वेद संचालनालयातील संचालक, उपसंचालक व महाविद्यालयातील अधिष्ठाता व अध्यापक यांची निवृत्तीची वयोमर्यादा 58 वरुन 65 केलेली आहे. त्याप्रमाणे ते कार्यरत झाले. आजच्या परिस्थितीत आपल्या राज्यामध्ये एकूण 1812 प्राथमिक आरोग्य केंद्रे, 350 ग्रामीण रुग्णालये, 33 जिल्हा रुग्णालये आहेत. त्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची निवृत्तीची वयोमर्यादा उपरोक्त निर्णयाच्या आधारे वाढवून मिळावी म्हणून आरोग्य संचालनालयामार्फत सन 2006 व 2007 मध्ये शासनाकडे पत्र पाठविलेली आहेत. अशा प्रकारे विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता ज्या पध्दतीने ही वयोमर्यादा वाढली आणि त्यांना सामावून घेतले त्याच पध्दतीने रुग्ण सेवा हा केंद्रबिंदू मानून वैद्यकीय अधिकारी वर्ग-1 व वर्ग-2 व इतर पदावरील अधिकारी, तसेच अधिष्ठाता यांचीही वर्यामर्यादा 65 वर्षे करावी. तसेच शासनाने वेळोवेळी निर्णय घेतले आहेत त्याला अनुसरुन आरोग्य सेवा संचालनालयाने पत्र पाठविलेलेली आहेत, त्याचा विचार करावा. म्हणून आरोग्य सेवा ढासळता कामा नये आणि पुढील काळात जे अधिकारी निवृत्त होणार आहेत त्यापूर्वी हा निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करतो.

------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

नगर भूमापन क्रमांक 170 मौजे, आकुर्ली ही जागा मुळत: कांदिवली मधील औद्योगिक जागा होती. या जागेवर पारस मेहता, पार्टनर, ग्लोमोर कन्स्ट्रक्शन यांनी औद्योगिक आयुक्तांची परवानगी न घेता ही औद्योगिक जागा नाही असे दाखवून व निवासी जागा आहे असे दाखवलेले आहे. या औद्योगिक वसाहतीमध्ये 100 कामगार काम करीत होते तसेच त्यांचे पगार सुध्दा बाकी असतांना कामगार आयुक्तांची परवानगी घेऊन, कामगारांचे कोणतेही पेमेंट बाकी नाही असे सर्टीफिकेट घेऊनच परवानगी द्यावयास पाहिजे होती परंतु तशी परवानगी घेतलेली नाही. माझ्याकडे संबंधित प्लॅनची कॉपी आहे. माहितीच्या अधिकाराखाली मी माहिती काढली असून त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, "या ठिकाणी औद्योगिक वसाहती होत्या." असे असतांनाही औद्योगिक वसाहती नाहीत असे दाखवून महानगरपालिकेच्या अधिका-यांनी परवानगी दिलेली आहे ती तात्काळ रद्द करावी व ज्या अधिका-यांनी चुकीची परवानगी दिली त्यांच्यावर त्वरीत कारवाई करण्यात यावी. या विषयाच्या संदर्भात मी माननीय मंत्रीमहोदयाशी देखील पत्रव्यवहार केलेला आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

मौजे हिवरा (ता.परळी, जि.बीड) गोदाकाठी असलेल्या या गावात गोवर्धन मार्गे जाण्यास दूरचा प्रवास करावा लागणे, हिवरा ते पिंपरी हा या गावचा मूळ रस्ता असणे, तथापि पंधरा वर्षापूर्वी या रस्त्यांची दुरुस्ती केल्यानंतर त्यांची अद्याप दखल न घेतल्याने रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था होणे, पर्यायाने नागरिकांना प्रवास करण्यास मोठया प्रमाणात अडथळे येणे, याबाबत स्थानिक नागरिकांकडून सदर रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

धन्यवाद.

----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष 13 जून पासून सुरु झाले आहे, राज्यातील हजारो शिक्षकांनी पहिल्या टप्प्यातील राष्ट्रीय जणगणनेचे राष्ट्रीय काम केले आहे.

राज्यात बालकांसाठी राज्य शासनाने शिक्षण हक्क विधेयक लागू केलेले आहे व त्यामुळे शिक्षकांच्या कामामध्ये साहजिकपणे वाढ झालेली आहे तसेच त्यांच्या जबाबदा-या देखील वाढलेल्या आहेत. अशा परिस्थितीत पुन्हा एकदा शाळा सुरु झाल्याबरोबर आमच्या शाळेतील अनेक शिक्षकांना म्हणजे 10 पैकी 5 शिक्षकांना 20 पैकी 12 शिक्षकांना पुन्हा एकदा विधानसभेची किंवा लोकसभेची निवडणूक नसतांना बीएलओचे काम करण्याची जबाबदारी दिलेली आहे. बीएलओमध्ये शिक्षकांना घरोघरी जाऊन याद्यांची पडताळणी करणे, फोटोपास वाटणे असे कारकुनी काम दिलेले आहे. शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या शिक्षण हिताकडे नुकसान करुन हजारो शिक्षकांना या कामासाठी घेतलेले आहे. राज्यातील काही जिल्हाधिका-यांनी यासंदर्भात दखल घेऊन बीएलओचे काम शिक्षकांना देऊ नये अशा प्रकारचे आदेश काढलेले आहेत परंतु अशा प्रकारचे आदेश अनेक जिल्हयामध्ये काढण्यात आलेले नाहीत. बीएलओचे काम करण्यासाठी महसूल विभागाचे अधिकारी आमच्या शिक्षकांवर जबरदस्ती करीत आहेत. या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत त्यामुळे मी पुन्हा सांगू इच्छितो की, बीएलओच्या कामातून, फाटोपास वाटण्यातून, घरोघरी फिरण्यातून आमच्या शिक्षकांना वगळण्यात यावे. बीएलओच्या कामामुळे विद्यार्थ्यांच्या हितापासून त्यांना वंचित ठेवण्याचे काम केले जात आहे ते तातडीने बंद करण्यात यावे. त्यामुळे यासंदर्भात शिक्षण विभागाने दखल घेऊन शिक्षकांना बीएलओचे काम देण्यात येऊ नये अशा प्रकारचे तातडीने आदेश काढावे अशी विनंती करतो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

आमगाव तालुक्यातील महाल्ली या गावातील श्री. ताराचंद लक्ष्मण शेंडे, श्री. नरेंद्र सोमा शेंडे आणि श्री. जितेंद्र बाळकृष्ण शेंडे हे तीनही शेतकरी एका परिवारातील होते. दिनांक 15 जुलै, 2010 रोजी आपल्या विहिरीतील पाण्याचा वीज पंप दुरुस्त करण्यासाठी विहिरीत उतरले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

त्या विहिरीमध्ये विषारी वायू तयार झाला. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. ते तीन शेतकरी दारिद्रय रेषेखालील होते. एकाच कुटुंबातील शेतकऱ्यांचा विषारी वायुमुळे मृत्यू झालेला आहे. गरीब शेतकऱ्यांचा कुठलेही कारण नसताना नैसर्गिकरित्या तयार झालेल्या विषारी वायूमुळे मृत्यू झालेला आहे. त्यांच्या कुटुंबियांना शासनाने मदत करावी एवढीच प्रार्थना मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना मी स्वत: विनंती करीन आणि शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याचा प्रयत्न करू.

.............

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची अनुमती मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयंत प्र पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामी आंदोलनाच्या लढ्याचे प्रमुख लढवय्ये, विधान सभेचे माजी विरोधी पक्ष नेते तसेच माजी खासदार, मराठवाड्यातील शेतकरी व श्रमजीवी वर्गाचे कैवारी कै.भाई उद्धवराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे औरंगाबाद येथील हिमायत बागेत दिनांक 6 जून 2008 रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्या शुभहस्ते अनावरण झाले.

या समारंभ प्रसंगी महाराष्ट्र सरकार भाई उद्धवराव पाटील यांची विधी मंडळातील भाषणे संग्रहीत करून ती पुस्तकरुपाने प्रसिद्ध करील अशी जाहीर घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी त्यावेळी केली होती.

महाराष्ट्राचे हे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. तरी या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून कै.भाई उद्धवराव पाटील यांची विधी मंडळातील भाषणे पुस्तकरुपाने प्रसिद्ध करून मराठवाड्यातील रहिवासी व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी केलेली घोषणा मराठवाड्यातीलच रहिवासी असलेले विद्यमान मुख्यमंत्री माननीय श्री.अशोकराव चव्हाण यांनी पूर्ण करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

.............

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्राला अभिमान वाटावा, मराठी माणसाविषयी अभिमान वाटावा अशी घटना घडली आहे. जगभरातील 175 विश्वयात्री दर्यावर्दींच्या पंक्तीत प्रथमच एका भारतीय नौदल अधिकाऱ्याने आपले नाव कोरले आहे. शिडाच्या नौकेवर एकट्याने 21 हजार 600 सागरी मैलांची विश्व परिक्रमा पूर्ण करणारे कमांडर दिलीप दोंदे हे पहिले भारतीय असून त्यांची भारत सरकारने दखल घेऊन माननीय उप राष्ट्रपती श्री.हमीद अन्सारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात येऊन यथोचित सन्मान देखील केला. परंतु, महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र रत्न पुरस्कारामध्येसुद्धा कमांडर दिलीप दोंदे यांची दखल घेतलेली नाही, हे अत्यंत खेदजनक आहे. साडेपाच हजार किलोमीटरचा सागरी किनारा व दर्यावर्दी साहसाची प्राचीन परंपरा, बलाढ्य नौदल आणि असंख्य बुद्धिमान शूरतरूण एवढी अनुकूलता असतानाही आजवर एकही भारतीय सागरी विश्वपरिक्रमा करू शकला नसताना कमांडर दोंदेनी तो मान मिळविला असल्याने या शूर दर्यावर्दीचा यथोचित सन्मान, गौरव राज्य सरकारने करावा अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

.............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सनमाननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी त्यांचे दोन औचित्याचे मुद्दे मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपले औचित्याचे मुद्दे मांडावेत.

श्री.परशुराम उपरकर : अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग या जगप्रसिद्ध किल्ल्याचे नूतनीकरणाचे व मजबूतीकरणाचे काम सुरू आहे. या किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे एकमेव मंदिर असून त्यांच्या डागडुजीकरिता 1 कोटी रूपयांचा निधी देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सदर निधी उपलब्ध झाला नाही तर तो सी.एफ.फंडातून उपलब्ध करून देण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन माननीय वित्त मंत्र्यांनी दिनांक 23 डिसेंबर 2009 रोजी दिले आहे. आतापर्यंत या निधीतील एक रूपयाही देण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे किल्ल्याची डागडुजी आणि दुरूस्ती करण्यात आलेली नाही. पुरातून खात्याकडून किल्ल्याच्या डागडुजीसाठी बाहेरून दगड आणले जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दगड आणून किल्ला बांधला होता. पण कंत्राटदारांना जास्त पैसे मिळावेत म्हणून बाहेरून दगड आणून समुद्रात टाकले आहेत. शिवाजी महाराजांच्या काळातील जिल्ह्यातील गड दुरूस्तीसाठी दगड वापरणे आवश्यक असताना बाहेरच्या जिल्ह्यातील दगड आणून दुरूस्तीचा खर्च वाढविण्यात येत आहे. त्यामुळे याची चौकशी करून किल्ल्याची तसेच मंदिराची दर्जेदार डागडुजी करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा असा आहे की, श्री.मच्छिंद्र कांबळी यांचे निधन झाले आहे. त्यांनी कोकणातील मालवणी भाषा सातासमुद्रापलीकडे पोहचविली आहे. अशा या मालवणी सम्राटाच्या नावाने एखादी कला अकादमी सुरू करावी असा प्रश्न मी सातत्याने मांडत आलेलो आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर..

राज्य मंत्रिमंडळाची बैठक कोकणात झाली असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी मच्छिंद्र कांबळी कला अकादमीसाठी एक कोटी रुपये जाहीर केले, परंतु या रकमेची अर्थसंकल्पात तरतूद न केल्यामुळे ही रक्कम मिळू शकली नाही. तेव्हा कोकणातील मच्छिंद्र कांबळी अकादमीसाठी शासनाने एक कोटी मंजूर करावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या नंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा औचित्याचा मुद्दा आहे, त्यांनी तो मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, दोन दिवसांपूर्वी मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये क्लोरिनची वायू गळती झाली. या वायू गळतीमुळे अग्निशमन दलाचे जवळपास सात जवान बाधित झाले. या सभागृहात अग्निशमन संदर्भातील विधेयक चर्चेसाठी आले होते त्यावेळी त्या अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत या विषयी चर्चा झाली होती. मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये वायू गळती थांबविण्यासाठी गेलेल्या अग्निशमन कर्मचाऱ्यांकडे मास्क नसल्यामुळे सात कर्मचारी बाधित झाले. क्लोरिनची गळती न्यूट्रलाईज करण्यासाठी हायपोक्लोराईड केमिकल्सची आवश्यकता आहे. ते केमिकल्स आपल्याकडे उपलब्ध नसल्यामुळे आपण पाण्याचे फवारे मारुन ही गळती थांबविण्याचा प्रयत्न केला. या निमित्ताने एक प्रश्न निर्माण होतो की, आपली आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा काय करीत आहे ? वायू गळतीच्या संदर्भात कोणती उपाययोजना केली आहे या संदर्भातील निवेदन शासनाने करावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा औचित्याचा मुद्दा आहे.त्यांनी तो मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझे दोन औचित्याचे मुद्दे आहेत. महाराष्ट्रात अनेक शिवकालीन किल्ले आहेत. यातील काही किल्ले पुरातत्व विभागाच्या अखत्यारित आहेत तर काही किल्ले राज्य पुरातत्व विभागाच्या अखत्यारित आहेत. हे सर्व किल्ले पर्यटनस्थळ म्हणून प्रसिध्द आहेत. त्याठिक्‍ाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात. परंतु गेल्या 30-40 वर्षांपासून या ऐतिहासिक किल्ल्यांची पडझड झाली आहे. परंतु या किल्ल्यांची डागडुजी पुरातत्व विभागाकडून करण्यात येत नाही. मागील वर्षी रायगडावर शिवराज्याभिषेक समारंभास प्रंचड तणाव निर्माण झाला म्हणून पुरातत्व विभागाने अशा सोहळ्यावर बंदी आणली होती. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा तऱ्हेची बंदी घालता येणार नाही असे सांगितले. परंतु आजही या संदर्भातील चित्र स्पष्ट झालेले नाही. राज्यातील शिवप्रेमींना अशाप्रकारचे सण किंवा सोहळे साजरे करण्यासाठी परवानगी मिळणार आहे की नाही ? केंद्रातील पुरातत्व विभागाकडे कोणते किल्ले आहेत आणि राज्यातील पुरातत्व विभागाकडे कोणते किल्ले आहे याची यादी सरकारने जाहीर करावी. दुसरे म्हणजे राज्याचा पुरातत्व विभाग पुरातत्वात गेला आहे असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. कारण राज्याचा पुरातत्व विभाग कोठे आहे हे शोधूनही सापडत नाही. शिवसेना कार्याध्यक्ष माननीय उध्दवजी ठाकरे यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा उत्सव साजरा करण्यासाठी संघर्ष करावा लागला होता. तसेच प्रतापगडावरील अझफल खानाच्या थडग्याजवळ उरुसासाठी आंदोलन करावे लागले होते ही वस्तुस्थिती आहे. या सर्वांमागचे कारण असे की, ब्रिटीश काळामध्ये जे नियम घालून देण्यात आले होते त्याच आधारावर पुरातत्व विभाग काम करीत आहे. त्या नियमांमध्ये कोणत्याही प्रकारची दुरुस्ती वा सुधारणा केलेली नाही. पुरातत्व विभागाकडून कोणकोणत्या उत्सवांना परवानगी दिलेली आहे याची माहिती जाहीर करावी. तसेच राज्यातील ऐतिहासिक किल्ल्यांचे सौंदर्य जतन करण्यासाठी एक आराखडा तयार करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी अशी मी या औचित्याच्य मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा असा आहे की,..

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** :मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांना एकाचवेळी एक औचित्याचा मुद्दा मांडता येईल.

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी त्यांच्या औचित्याच्या मुद्याबाबत माझ्या दालनात चर्चा करावी.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला आषाढी एकादशीच्या संदर्भात एक औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे.

**उपसभापती** : हा औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी माननीय सभापतींनी मान्यता दिलेली नाही.

डॉ.नीलम गो-हे: सभापती महोदय, 21 तारखेला आषाढी एकादशी असल्यामुळे हा औचित्याचा मुद्दा मला मांडू द्यावा.

**उपसभापती** : या बाबतीत जो नियम आहे तो सर्वानाच लागू आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा मांडता येणार नाही. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विशेष हक्क भंगाची सूचना मांडावी.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. महाराष्ट्र कर्नाटक सीमा भाग केन्द्रशासित करण्याची मागणी माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांना दिलेल्या निवेदनात न करणे

मु.शी.:महाराष्ट्र कर्नाटक सीमा भाग केन्द्रशासित करण्याची मागणी माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांना दिलेल्या निवेदनात न केल्यामुळ माननीय मुख्यमंत्र्यांच्याविरुध्द दिलेली विशेष हक्क भंगाची सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी महाराष्ट्र कर्नाटक सीमा भाग केन्द्रशासित करण्याची मागणी माननीय पंतप्रधानांना दिलेल्या निवेदनात न करणे या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांविरुध्द विशेष हक्क भंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, माननीय श्री.अशोकराव चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या विरोधात महाराष्ट्र विधान परिषद नियम 240 अन्वये मी पुढील प्रमाणे विशेष हक्क भंगाची सूचना देत आहे.:-

"महाराष्ट्र कर्नाटक सीमा वादा बाबतच्या महाराष्ट्र सरकारच्या याचिकेवर केन्द्रीय गृहखात्याने बेळगाव, कारवार,बिदर,गुलबर्गा, निपाणी या जिल्हयातील 865 गावातून व शहरातून मराठी भाषा, संस्कृती जाणणा-याची संख्या मोठी असली तरी केवळ तेवढया कारणास्तव हा भाग महाराष्ट्राला देता येणार नाही अशी भूमिका प्रतिज्ञापत्राव्दारे माननीय सर्वोच्च न्यायालयात मांडण्यात आल्यावर त्याचे पडसाद महाराष्ट्र विधीमंडळाच्या सभागृहात उमटले . या विषयी सध्या चालू असलेल्या पावसाळी अधिवेशनात विरोधकानी केलेल्या मागणीनुसार दिनांक 13 जुलै 2010 रोजी चर्चा झाली.

या विषयावर चर्चेच्या वेळी सभागृहाचे नेते म्हणून महाराष्ट्र राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देतांना " राजकीय दृष्टीकोनातून तेथील जनतेचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. म्हणून तूर्तास तेथील सर्व प्रदेश हा केन्द्रशासित केल्याशिवाय आपल्याला मार्ग दिसत नाही या प्रश्नाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयामध्ये लवकर लागावा असा आमचा निश्चितपणे प्रयत्न आहे तोपर्यत तेथील लोकांना सुखाने रहाता यावे याकरिता उद्या माननीय पंतप्रधानांना भेटण्यासाठी आपण सर्वजण जाऊ या " असे वक्तव्य करण्यात येणे,



VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 12.45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु प्रत्यक्षात दिनांक 14 जुलै 2010 रोजी सर्व पक्षीय शिष्टमंडळाने नवी दिल्ली येथे भारताचे पंतप्रधान यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी विधी मंडळातील सभागृहात आश्वासित केल्याप्रमाणे तेथील सर्व प्रदेश केन्द्रशासित करण्याच्या मागणीचा उल्लेख करण्यात आला नाही.

महाराष्ट्राच्या विधीमंडळाच्या सभागृहात या मराठी भाषिकांची सहानुभूती मिळवून नवी दिल्ली येथे जाऊन माननीय मुख्यमंत्री यांनी आपली भूमिका बदलून बेळगाव,कारवार, बिदर, निपाणी आणि गुलबर्गा या जिल्हयातील 865 गावातील मराठी भाषिकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे.

विधीमंडळाच्या सभागृहात विधीमंडळाच्या सदस्यांना या प्रकरणी हा भाग केन्द्रशासित करण्याची मागणी करण्यात येईल असे आश्वासित करुन नवी दिल्ली येथे जाऊन आपली भूमिका बदलल्यामुळे या सर्व पक्षीय शिष्टमंडळाची तसेच विधीमंडळातील सदस्यांची दिशाभूल करण्यात आली आहे.

शिवसेनाप्रमुख माननीय श्री बाळासाहेब ठाकरे तसेच कार्यकारी प्रमुख श्री. उध्दवजी ठाकरे यांनी व सीमावासीय बांधवांनी या प्रदेशातील मराठी भाषिकांवर होणारा अन्याय व अत्याचार दूर करण्याकरिता सध्या हा प्रदेश केन्द्रशासित करण्याची भूमिका घेतली आहे. जेणेकरुन तेथील मराठी भाषिकांचे जीवन सुसहय होईल. याकरिता सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागण्यापूर्वी हा प्रदेश केद्रशासित करणे आवश्यक असतांना अशा प्रकारची मागणी माननीय मुख्यमंत्री यांनी माननीय पंतप्रधान यांना दिलेल्या निवेदनात केलेली नसणे. माननीय मुख्यमंत्री यांनी सभागृहात दिलेले आश्वासन न पाळल्यामुळे विधीमंडळ सदस्यांचा अधिकाराचा अवमान करण्यात आला आहे.

तरी हे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी विशेष हक्क समितीकडे सुपूर्द करण्यात यावे ही विनंती.

**उपसभापती** :ठीक आहे. यानंतर नियम 93 अन्वयेच्या सूचना घेण्यात येतील.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी. मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी,परशुराम उपरकर,गोपीकिसन बाजोरिया यांनी " राज्यात आदिवासी विभागात औद्योगिक प्रशिक्षण (आयटीआय) शिकविण्याकरिता सुरु केलेल्या प्रशिक्षण केन्द्रामध्ये 146 शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर,परशुराम उपरकर यांनी " मालाड,कांदिवली, बोरिवली,मार्वे,चारकोप,गोराई,खाडी येथील 14 किलोमिटर किनारपट्टीलगतच्या खारफुटीच्या जंगलाची कत्तल केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी " सिंधुदुर्ग जिल्हयातील सातार्डा येथील उत्तम स्टील कंपनीचे अधिकारी श्री. एम.धरणपती,श्री.ए.एन.बाबुराव यांनी बोगस दस्तऐवज तयार करुन जमीन हडप केल्याची तक्रार जमीन मालक श्री.भगवान पेडणेकर यांनी दिनांक 10.6.2010 रोजी स्थानिक पोलीस ठाण्यात करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

यानंतर, सन्माननीय सदस्य श्री गोपिकिशन बाजोरिया यांनी "वाशिम (जि.वाशिम) नगरपालिका हद्दीचा विकास आराखडा 30 वर्षापूर्वी मंजूर झाला असताही त्यापैकी काही भाग तातडीने सुधारित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 162 अन्वये आराखडा तयार करण्यासाठी अधिकारी नेमून कामास सुरुवात केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "ठाणे शहराची भौगोलिक वाढ झपाटयाने होत असल्याने शहर विकास विस्ताराच्या प्रक्रियेत शहराच्या गावठाण क्षेत्रात वाढ करुन महाराष्ट्र जमीन महसूल 1966 च्या कलम 133 मधील तरतुदीनुसार नागरिकांना अकृषिक साऱ्यामधून सूट देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "राज्य परिवहन महामंडळ हे प्रवासी जनतेच्या सेवेसाठी असल्याने सर्वोच्च न्यायालयाने राज्य परिवहन महामंडळाला आयकर कायद्यातील कलम 11 नुसार आयकर मुक्त केले असताही महामंडळाला पथकराच्या रुपाने खाजगी कंपन्यांना मोठी रक्कम द्यावी लागत असल्याने त्याचा प्रवासी जनतेला भुर्दंड सोसावा लागत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, व्ही. यू. डायगव्हाणे यांनी "उरण परिसरातील जेएनपीटी बंदरात गोदामातून निर्यातीकरिता आलेली औषधांची विल्हेवाट वेळीच न लावल्याने तसेच ती उघडयावर टाकल्याने मुदतबाह्य झाल्यामुळे या परिसरातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

**उपसभापती** ....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, व्ही. यू. डायगव्हाणे, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. दिवाकर रावते यांनी "दि.15.7.2010 रोजी वा त्या सुमारास कराड-चिपळूण हायवेवरील वुरुल घाटात पोटॅशियम ग्रोमाईड हे विषारी रसायन वाहतूक करणारा टँकर दरीत कोसळल्याने त्यातील विषारी रसायन ओढयात मिसळून हजारो मासे मृत्युमुखी पडल्याने या परिसरातील ग्रामस्थांमध्ये असंतोषाचे व भीतीचे वातावरण निर्माण झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, पाशा पटेल, संजय केळकर यांनी "महावितरणने राज्यातील संशयास्पद विद्युत मीटर शोधून काढण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत 2 लाख मीटर सदोष असल्याचे तसेच अनधिकृतरित्या मीटर वापराची 9 हजार 515 प्रकरणे उघडकीस आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी "मौजे आणिक (वडाळा, मुंबई) गावातील एम विभागाच्या पुनर्रचित विकास आराखडयानुसार भूखंड क्र. 1, ए/1,2,3 व 1-ए/6,7,8,11,12 व 13 बी या भूखंडाचे फेर बदल करतांना झालेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर नियम 93 अन्वये सूचनांना मी दालनामध्ये अनुमती नाकारली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदनासंबंधी</u>**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अधिवेशन सुरु झाल्यापासून आज पाच दिवस झाले. आम्ही प्रत्येक दिवशी नियम 93 अन्वये सूचना सभागृहापुढे मांडीत असतांना शासनाकडून आतापर्यंत एकाही सूचनेवर निवेदन करण्यात आलेले नाही. तर मग आम्ही नियम 93 अन्वये सूचना देणे बंद करावयाचे काय?

**उपसभापती** : माझ्याकडे नियम 93 अन्वये सूचनेवरील एक निवेदन आले असून ते सोमवारी घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हे सरकार कामचुकार आहे. आतापर्यंत शासनाकडून एकही निवेदन न येणे हे बरोबर नाही.

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये उभे राहून आम्ही निवेदनाची मागणी केल्यानंतर उद्या निवेदन करण्यात येईल असे सांगितले जाते. परंतु दुसऱ्या दिवशी निवेदन होत नाही. हे प्रकार रोज सुरु आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सरकारला जर हे काम झेपत नसेल तर नियम 93 अन्वये सूचना देऊ नका असे त्यांनी आम्हाला सांगावे, आम्ही त्या सूचना देणार नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता आतापर्यंत माननीय सदस्यांकडून एकूण 40 नियम 93 अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्यापैकी एकाही सूचनेवर निवेदन करण्यात आलेले नाही. या सरकारला ही संवय लागली आहे. निवेदन दिले काय किंवा नाही दिले काय? शेवटच्या दिवशी ती सर्व निवेदन आपण पटलावर ठेवू असे सरकारला वाटत आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

असे असेल तर नियम 93 हे आयुधच बंद करण्यात यावे म्हणजे शासनाला उत्तर देण्याची गरज रहाणार नाही.

**उपसभापती** : अद्यापपर्यंत शासनाने निवेदन करावे असे आदेश ज्या ज्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांच्या संदर्भात दिलेले होते ती सगळीच्या सगळी निवेदने सोमवारच्या सभागृहाच्या कामकाजात आली पाहिजेत असे निर्देश मी आज या ठिकाणी देत आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मला आपण दिलेल्या निर्देशाबद्दल बोलावयाचे नाही पण या अनुषंगाने ...

**उपसभापती** : सोमवारी सभागृहाच्या कामकाजात ही निवेदने चर्चेला घेण्यात येतील असे आपण सांगावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपले आदेश मानले जातीलच परंतु त्या अनुषंगाने मला एक विषय मांडावयाचा होता. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य असे म्हणतात की, शासनाच्या वतीने नियम 93 च्या सूचनांची निवेदने वेळेवर येत नाहीत. सभापती महोदय, मागच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतीत खूप चांगल्या प्रकारची सुधारणा केली होती. बरीचशी निवेदने अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापूर्वी आली होती. सभापती महोदय, नियम 93 अनव्येच्या सूचनामध्ये वर्षा-दीड वर्षापूर्वी विधानपरिषदेमध्ये लागलेल्या तारांकित प्रश्नावर, लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात, चार-पाच वर्षापूर्वी घडलेल्या घटनेच्या संदर्भात या नियम 93 अन्वयेच्या सूचना विचारण्यात येतात. चालू अधिवेशनात चालू असतानाचे जे करंट इश्यू असतात त्यावर नियम 93 ची सूचना असली पाहिजे, एवढेच मला या अनुषंगाने सांगावयाचे आहे.

**उपसभापती** : माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये तसे पाहिले तर माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आदेशाचा उपमर्द केला आहे. नियम 93 अन्वयेच्या सूचना जेव्हा सन्माननीय सदस्य पीठासीन अधिकाऱ्यांकडे देतात तेव्हा स्वत: सभापती महोदय, कोणत्या नियम 93 अन्वयेच्या सूचना स्वीकारावयाच्या, कोणत्या स्वीकारावयाच्या नाहीत याबाबतचा निर्णय घेऊन मगच कोणत्या सूचनेवर शासनाने निवेदन करावे याबाबतचा निर्णय घेतात. त्यामुळे माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी घेतलेला निर्णय हा निश्चितपणे मागच्या कामकाजाचा आढावा घेऊन घेण्यात

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**....

आलेला असतो. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांचे बोलणे मला तितकेसे बरोबर वाटले नाही. म्हणून मी याठिकाणी बोललो. मी या ठिकाणी शासनाला सूचित केल्याप्रमाणे आतापर्यंत शासनाने निवेदन करावे असे निदेश ज्या ज्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांच्या संदर्भात दिलेले होते त्याप्रमाणे सोमवारच्या कामकाजात ती निवेदने आली पाहिजेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जे वक्तव्य केलेले आहे त्याबाबतीत त्यांनी माफी मागितली पाहिजे.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही कुठलेही अपशब्द न उच्चारता आम्हाला शिक्षा करण्यात येते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे सभागृहाचा वेळ घेऊ नये.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी काहीही म्हटले तर आम्ही ते ऐकायचे काय? यामुळे काळ सोकावतो.

**उपसभापती** : मी स्पष्टपणे ज्या सूचना दिल्या आहेत त्या माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केलेल्या आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे आलेले आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे सभागृहाचा वेळ घेऊ नये.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शासनाच्या बाजूने माननीय मंत्रिमहोदयांना याठिकाणी झुकते माप देता येणार नाही. या सदनामध्ये मी घटनात्मक मुद्दा उपस्थित केला होता. घटना हातात घेऊन बोलत होतो. माझ्या बोलण्यात एकही इकडचा-तिकडचा शब्द नव्हता. मी या ठिकाणी फक्त वाचून दाखवित होतो. असे असताना मला माननीय सभापतींनी सांगितले की, माननीय सभापतींच्या निर्णयाच्या विरोधामध्ये तुम्हाला एक शब्दही बोलता येणार नाही,मी ते सभागृहाच्या रेकॉर्डवरुन काढून टाकतो. सभापती महोदय, आम्हाला एक न्याय दिला जातो आणि दुसऱ्यांना एक न्याय दिला जातो. माननीय मंत्रिमहोदय श्री. भास्करराव जाधव या ठिकाणी जे बोलले आहेत ते शब्द त्यांनी मागे घेऊन माफी मागितली पाहिजेत, अन्यथा आम्ही सदनाचे कामकाज चालू देणार नाही.

यानंतर श्री. बरवड...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : मी आपला कोणताही निदेश नाकारलेला नाही किंवा त्याबद्दल भाष्य केलेले नाही. मी असे म्हणालो की, आपल्या निदेशावर मला बोलावयाचे नाही. शेवटी नियम 93 अन्वये द्यावयाच्या सूचनेचा स्कोप किती असावा याबद्दल मी भाष्य केलेले आहे. त्यानंतर आपण ही बाब माझ्या लक्षात आणून दिली की, याबाबतीत माननीय सभापती निर्णय घेतात. त्यानंतर मी काहीच बोललो नाही.

श्री. विनोद तावडे : माननीय सभापती निर्णय घेतात हे माहीत नव्हते काय ?

श्री. भास्कर जाधव : एखादी गोष्ट माहीत नसेल. ती समजून घेण्याचा माझा अधिकार आहे. मी कोणताही असंसदीय शब्द वापरलेला नाही. त्यामुळे यासंदर्भात दिलगिरी व्यक्त करण्याचा प्रश्नच येत नाही.

**उपसभापती** : यानंतर पहिली लक्षवेधी सूचना घेण्यात येईल्.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य टाळ्या वाजवत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यावेळी आम्ही काही चूक केली होती काय ? त्यावेळी आपण का उभे राहिला नाहीत ? त्या दिवशी आम्ही माननीय सभापतींचा अवमान केला होता काय ? प्रत्येक वेळी आमच्यावर अन्याय होतो. आता माननीय सभापतींचा अवमान केला नाही काय ? माननीय सभापती निर्णय घेतात हे त्यांना माहीत नसेल तर त्यांचे संसदीय कार्य राज्यमंत्रीपद काढून घ्या.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशाचे तंतोतंत पालन करु. परंतु शासन म्हणून काही भूमिका मांडावयाची असेल तर त्यांना तो अधिकार आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती निर्णय घेतात हे माहीत नाही हे त्यांनी मान्य केले. आपण रेकॉर्ड काढून बघा.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. यानंतर पहिली लक्षवेधी सूचना घेण्यात येईल्.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT

**पृ. शी.** : पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियमावली राज्य शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्तावित असणे

**मु. शी.** : पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियमावली राज्य शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्तावित असणे यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी, जयप्रकाश छाजेड, श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियमावली राज्य शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्तावित असणे, या योजनेचे नियम ठराविक बांधकाम व्यावसायीकांना हितकारक ठरणार असल्याची खळबळजनक चर्चा जून-2010 च्या सुमारास पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रातील नागरिकांमध्ये होत असणे, पुणे शहरातील सध्याच्या मूलभूत नागरी सोयी-सुविधा आताच अपुऱ्या असताना त्यामध्ये या योजनेतून निर्माण होणाऱ्या (टी.डी.आर) हस्तांतरीत विकास हक्कामुळे आणखी दहा कोटी चौरस फुट जागेवर होणारे बांधकाम, सदर इमारतींमध्ये राहण्यास येणाऱ्या सुमारे दहा लाख नागरिकांना पुरवाव्या लागणाऱ्या सर्व नागरी सुविधा, शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमावलीस मान्यता देण्यापूर्वी सदर बाबींवर सखोल विचार करण्याची गरज, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...3...

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना देत असताना पुणे शहराच्या दृष्टीने महत्वाच्या असलेले विषय दिलेले होते परंतु त्याबाबत निवेदन करताना शासनाच्या वतीने या ठिकाणी तीन पानी निबंध सादर केला गेला आहे. मी पुणे शहराच्या लोकसंख्येचा महत्वाचा मुद्दा मांडलेला होता. राज्यात सर्वात जास्त म्हणजे 43 ते 44 टक्के जनता पुणे शहरामध्ये झोपडपट्टयंमध्ये राहते. त्या झोपडपट्टयांच्या पुनर्वसनासाठी जे प्राधिकरण स्थापन केले गेले त्या प्रधिकरणाने नियमावली तयार करण्याचे काम केलेले होते. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 11 डिसेंबर, 2008 रोजी विशेष नियमावली अंमलात आणलेली आहे. विशेष नियमावली अंमलात आणल्यानंतर त्याला नियम 37(1) प्रमाणे कार्यवाही करुन ती शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावी लागते. गेल्या दोन वर्षापासून आजपर्यंत ती कार्यवाही पूर्ण झालेली नाही. एकतर लोकांच्या हरकती मागविणे जरुरीचे होते पण त्या मागविण्यात आल्या नाहीत. नियमानुसार तीन महिन्यात ही कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक असताना शासनाने शासनाने त्याची अंमलबजावणी केलेली नाही. उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, 22 झोपडपट्टयांच्या पुनर्वसन योजनांच्या बांधकामाला परवानगी दिलेली आहे. नियमावली तयार नसताना, लोकांच्या हरकती मागविल्या नसताना शासनाने 22 योजनांना मान्यता दिलेली आहे. पुण्याचे क्षेत्रफळ 252 चौरस किलोमीटर आहे. त्यामुळे पुणे शहराचा विकास आडव्या पध्दतीने होतो. मुंबईची परिस्थिती वेगळी आहे. मुंबईचे क्षेत्रफळ कमी असल्यामुळे मुंबईमध्ये उंच-उंच इमारती उभ्या राहतात आणि त्यासाठी मोठा टीडीआर दिला जातो. मुंबईची परिस्थिती वेगळी आहे आणि पुण्याची परिस्थिती वेगळी आहे. औरंगाबादची परिस्थिती वेगळी आहे. नांदेडची परिस्थिती वेगळी आहे. असे असताना ज्यावेळी नियमावली तयार करतो तेव्हा शासनाने सुध्दा काही गोष्टींवर लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यावेळी 10 हजार कोटी चौरस फूट एवढा टीडीआर उत्पन्न होईल त्यावेळी तेथील नागरिकीकरण वाढेल आणि त्यांना रस्ते, पाणी, वीज आणि इतर सर्व सोयीसुविधा देण्यासाठी लागणाऱ्या निधीबाबत तसेच या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून शासनाने ज्या पध्दतीने पावले उचलावयास पाहिजे ते पुणे शहराच्या बाबतीत आजपर्यंत होत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

श्री.मोहन जोशी....

म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, ही नियमावलीवर लोकांच्या हरकती मागवून घेणार काय ? या उत्तरामध्ये म्हटले आहे की, प्राधिकरणाची नियमावली अंमलात आणण्याच्या वेळी जानेवारी, 2000 पर्यंतच्या झोपडपट्टीवासियांना संरक्षण देण्यात येऊन त्यांना पात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे कोर्टात ॲफिडेव्हिट दाखल करण्याचा निर्णय घेतला, त्यानंतर मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता. आज मात्र जानेवारी, 1995 पर्यंतच्या झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्यात येते असे नमूद केले आहे. कोर्टामध्ये 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयांबाबत शासनाने ॲफिडेव्हिट दाखल केले आहे. असे असताना या निवेदनात 1.1.1995 चा उल्लेख करण्यात आला आहे. राज्यातील सर्वसामान्य व गरीब झोपडपट्टीवासियांचा प्रश्न आहे. म्हणून आजच्या आज 2000 पर्यंतच्या झोपडपट्टीवासियांना एसआरए योजनेत सामावून घेऊन त्यांना न्याय देणार आहे का ?

श्री.भास्कर जाधव : शासनाने जे नवीन प्राधिकरण सुरु केले त्याच्या कलम 1954 अंतर्गत जी नियमावली तयार करण्यात आली त्या नियमावलीच्या अनुषंगाने कायदा केला होता. परंतु हा कायदा केल्यानंतर एसआरएच्या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत नव्हता, तो आता मिळू लागला आहे. या शहरामध्ये 10 लाख लोक वाढल्यामुळे नागरी सुविधांवर ताण येईल असे त्यांचे म्हणणे आहे. 1994 ते 2008 पर्यंत किंवा 2004 पर्यंत यापूर्वी या सगळया झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाचे अधिकार विभागीय आयुक्तांना होते. 1994 ते 2004 या कालावधीत केवळ 17 झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाचे प्रस्ताव महापालिकेकडे आले होते. परंतु हे प्राधिकरण स्थापन करण्यापूर्वी काय परिस्थिती होती ते सन्माननीय राज्यमंत्री श्री.रमेश बागवे, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी व सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना माहीत आहे. कारण ते तेथील रहिवासी आहेत. सन 2008 पर्यंत अनेक वेळा, अनेक नेत्यांनी, अनेक लोकप्रतिनिधींचा समावेश असलेल्या समित्या स्थापन झाल्या होत्या, प्राधिकरण झाले. सन 2004 साली पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत झाली होती, नंतर ती रद्द करण्यात आली. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली, नंतर पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सहसमिती स्थापन झाली, म्हणजे या प्रश्नाबाबत एकमत होत नव्हते. पुणे शहरामध्ये 43 टक्के लोक झोपडपट्टीत राहतात,

2...

NTK/ SBT/ KTG/

श्री.भास्कर जाधव....

त्यांना चांगल्याप्रकारचे जीवनमान व राहणीमान देणे हे शासनाचे कर्तव्य आहे म्हणून या प्रश्नातून शासनाला मार्ग काढणे आवश्यक होते. तेथे 2 लाख 10 हजार कुटुंबे झोपडपट्टीत राहतात. जवळजवळ 43 टक्के लोक झोपडपट्टीत राहतात. अशी आज पुण्याची अवस्था आहे. म्हणून एसआरएची योजना लागू होत नव्हती. म्हणून सन 2008 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना 154 या कलमाचा वापर करुन नवीन योजना आणावी लागली. ती आणल्यामुळे एसआरएकडे पूर्वीचे 22 प्रस्ताव सोडून 97 प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी 22 प्रस्ताव मंजूर झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे रास्त आहे. कलम 154 नुसार कार्यवाही केली जाते. परंतु 37(1) प्रमाणे जनतेचे म्हणणे मागवावयाचे होते. ते मागविले नाही. सभापती महोदय, हा विस्ताराने सांगण्यासारखा विषय आहे. याबाबतची कार्यवाही केव्हा पूर्ण होणार आहे असे त्यांनी विचारले आहे. मी आपल्यामार्फत सभागृहाला सांगतो की पुढील एक महिन्याच्या आत यासंबंधीची कायदेशीर कार्यवाही शासनाकडून, माननीय मुख्यमंत्र्यांकडून पूर्ण केली जाईल. दि.1.1.2000 पर्यंतच्या झ ोपडपट्टीवासियांचा यामध्ये अंतर्भाव करणार का असेही त्यांनी विचारले आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव ....

ते कोर्टात देखील गेले होते. या संदर्भात झालेला निर्णय सन्माननीय सदस्यांना माहीत नाही असे नाही. मुंबईतील झोपडपट्टीबाबत देखील निर्णय झालेला नाही. त्यामुळे आताच्या घडीला या स्कीममध्ये त्यांना सामावून घेणे अवघड बाब आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : या प्राधिकरणाचे चेअरमन आणि सदस्य हे सर्व एक्स-ऑफिशिओ आहेत. या प्राधिकरणामध्ये माननीय मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री, गृहनिर्माण राज्यमंत्री, नगरविकास राज्यमंत्री आणि संबंधित विभागाचे सचिव आहेत. या मंडळीना त्यांच्याकडे असलेल्या कामाच्या बोजामुळे बैठकासाठी वेळ जुळत नसल्याने प्राधिकरणाच्या बैठका होत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. तेव्हा या प्राधिकरणामध्ये या विषयाचे ज्ञान असलेल्या आणि काम करु इच्छिणा-या अशासकीय सदस्याला घेण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : मी यापूर्वीच सभागृहाला अवगत केले आहे की, यापूर्वी अनेक वेळा वेगवेगळया सन्माननीय व्यक्तींच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन झाल्या होत्या. परंतु त्यांचा पूर्वेतिहास पाहता माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली हे प्राधिकरण स्थापन करण्यात आले. या प्राधिकरणावर अशासकीय सदस्य घ्यावेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. ही बाब कायदेशीरदृष्टया शक्य आहे काय हे तपासून घेतले जाईल.

डॉ. नीलम गो-हे: पुणे महानगरपालिकेच्या आमसभेमध्ये एफएसआयचे जे प्रमाण दिलेले आहे त्याबाबतीत प्रचंड नाराजी आहे. एफएसआय वाढवून दिल्यामुळे पुणे महानगरपालिकेमध्ये अनेक विकासक पुढे येत आहेत ही चांगली गोष्ट आहे. आमचे शिवसेनेचे गटनेते श्री. श्याम देशपांडे यांनी अशी माहिती दिली की मोकळया असलेल्या भूखंडाला 1 एफएसआय मिळतो. जास्त एफएसआय मिळावा म्हणून बोगस प्रकरणे दिली जात आहेत. लोकांच्या हरकती मागविण्याच्या बाबतीत विलंब झालेला असल्यामुळे काही लोकांना गैरफायदा घेण्याची संधी प्राप्त झालेली आहे. तेव्हा ज्यांनी ज्यांनी गैरफायदा घेतलेला आहे त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. दुसरे असे की, या प्राधिकरणामध्ये विधानसभेच्या सदस्यांना बोलावले जाते. विधानपरिषद सदस्यांचा त्यामध्ये सहभाग नाही. परंतु दर तीन महिन्यानी बैठक घेऊन त्यामध्ये विधानसभा आणि विधानपरिषदेतील सदस्यांना बोलावून घेतलेल्या निर्णयाबाबत माहिती दिली तर बरे होईल. तेव्हा

(डॉ. नीलम गो-हे...

चांगला आणि पारदर्शक कारभार करण्याच्या दृष्टीने असा निर्णय माननीय मंत्री महोदय घेतील काय ?

श्री. भास्कर जाधव : इतर भागापेक्षा पुण्याला एफएसआय का वाढवून दिला असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. मुंबई आणि पुण्याला एफएसआय वाढवून देण्याचे कारण हे आहे की, 1994पासून या योजनेला प्रतिसाद मिळत नव्हता. तसेच कुणी बोगस स्कीम करीत असेल तर त्याची तपासणी केली जाईल आणि तशी माहिती समोर आली तर सन्माननीय सदस्यांना देखील अवगत केले जाईल. विधानपरिषद सदस्य प्राधिकरणावर घ्यावेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून गेलेल्या विधानपरिषद सदस्यांना यामध्ये घेता येईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : 22 झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. यापैकी किती योजनांचे काम प्रत्यक्षात सुरु झालेले आहे. घरे वाजवी किंमतीत उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. ही वाजवी किंमत किती आहे ? ईएसडब्ल्यूएस झोन असलेल्या ठिकाणी एसआरएच्या किती स्कीम झालेल्या आहेत ? अशा प्रकारे एसआरएच्या स्कीम होऊ शकतात काय ?

....नंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1........

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, वाजवी किंमत म्हणजे काय? शासनाने झोपडपट्टीधारकाला 25 चौ.मिटरची सदनिका मोफत द्यायचा निर्णय घेतलेला आहे.

श्री.मोहन जोशी : जो सेलेबल एफएसआय उपलब्ध होणार आहे तो वाजवी किंमतीत दिला जाईल काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, झोपडपट्टीधारकांना सदनिका दिल्यानंतर जो सेलेबल एफएसआय उरतो, त्या संदर्भात अवास्तव किंमत वाढवू नये असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. या संदर्भात सरासरी माहिती घेतली तर मुंबईमध्ये साधारणपणे 20 हजार रुपये प्रती चौ.फूट या दराने आकारणी होते किंवा या दराने किंमत द्यावी लागते. पुणेसारख्या शहरात हा दर 6 हजार रुपये प्रती चौ.फूट आहे. म्हणजे या दराप्रमाणे किंमत मोजावी लागते. याचा विचार करुन तेथे एफएसआय वाढवून देण्यात आला आहे. साधारणपणे पुणे शहरामध्ये तीन झोन तयार करण्यात आले आहेत. या तीन झोनमध्ये वेगवेगळ्या प्रकारे एफएसआय निश्चित केला आहे. सर्व झोनसाठी एकसारखा एफएसआय दिलेला नाही. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्या भागामध्ये योजना झाली की नाही ही माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. याबाबत सन्माननीय सदस्यांना अवगत केले जाईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात किती ऊंच इमारतींच्या बांधकामाला परवानगी देण्यात आली आहे? डी.सी.रुल्समध्ये काही बदल केले आहेत का? टीडीआर मान्य झाला आहे का? विकासकांना टीडीआर वापरण्याची परवानगी दिली आहे का? असल्यास पुणे महानगरपालिका ती परवानगी देत आहे का? बांधकाम होत असताना सामान्य जनतेसाठी त्याची किंमत निश्चित केली आहे हे मान्य आहे. परंतु पुणे महापालिका क्षेत्रामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष, चांगल्या रस्त्यांची वानवा, ड्रेनेजची अपुरी व्यवस्था लक्षात घेता या धोरणामध्ये याबाबतची तरतूद केली जाईल का?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या ज्या सूचना आहेत, त्या सूचनांचा आदर केला जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले आहे. एक प्रश्न अनिर्णित राहिलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून निवडून आलेल्या विधानपरिषद सदस्यांना प्राधिकरणाच्या बैठकीला बोलावण्यात येईल असे म्हटले. परंतु तसे होत नाही. तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीसाठी पालकमंत्री, मुख्यमंत्री यांच्यासह सर्व आमदारांना म्हणजे विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांसहित सर्वांना निमंत्रित केले जावे अशा प्रकारचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. तो निर्णय अंमलात आणला जावा.

(उत्तर आले नाही)

ॲड.वंदना चव्हाण : सभापती महोदय, झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करताना प्रत्येक शहराच्या दृष्टीने एफएसआय वाढवून देणे ही आवश्यक बाब झालेली आहे. परंतु हे करीत असताना शहरातील नागरी सुविधांवर ताण पडू नये यादृष्टीने समतोल साधणे आवश्यक आहे. योजना करीत असताना काही झोनमध्ये दहापट टीडीआर दिला जाणार आहे हे खरे आहे काय? प्रत्येक ठिकाणी वेगवेगळा एफएसआय दिला जाणार आहे, त्या अनुषंगाने जो टीडीआर जनरेट होणार आहे तो दहापट वाढणार आहे हे खरे आहे काय? 70 टक्के झोपडपट्टीधारकांची एनओसी प्राप्त करणे सक्तीचे केले त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. हे करीत असताना झोपडपट्टीवासियांना करारपत्रावर सही करताना आपली इमारत कुठे बांधली जाणार आहे? कशा प्रकारची इमारत असणार आहे? अलॉटमेंट कशी होणार आहे? तोपर्यंत संक्रमण शिबीरामध्ये जागा दिली जाणार आहे का? याबद्दल काहीही माहिती नसते. याबद्दल कोणतीही पारदर्शकता नसते. म्हणून नियमावली तयार करीत असताना या संदर्भात स्पेसिफिक तरतुदी केल्या जातील काय? जेणेकरुन पारदर्शकता निर्माण होऊन झोपडपट्टीधारकांना योजनेसंबंधी माहिती मिळू शकेल.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : मघाशी मी म्हटल्याप्रमाणे जो एफएसआय दिला जातो तो मुंबईत सुध्दा तीन झोनमध्ये वेगवेगळा दिला जातो. ज्या भागात प्रॉपर मुंबई आहे त्या सायन भागापर्यंत 1 एवढा एफएसआय असेल तर त्याला 0.75 एवढा दिला जातो. मुंबई उपनगरामध्ये तो 1:1 एवढा दिला जातो. आणि तिसऱ्या भागात 1 एवढा एफएसआय असेल तर त्याला 1:33 एवढा दिला जातो. त्याच पध्दतीने पुण्याचेही तीन झोन्स करण्यात आले असून पहिल्या झोनमध्ये 1:2 एफएसआय, दुसऱ्या झोनमध्ये 1:2.5 आणि तिसऱ्या झोनमध्ये 1:3 असा एफएसआय दिला जातो. याचा अर्थ असा नव्हे की कुठेतरी 10 पट वगैरे एफएसआय दिला जातो. सन्माननीय सदस्यांनी अशीही शंका व्यक्त केली की या भागातील नागरी सुविधांवर ताण पडणार. पण आजही आपण एसआरए भागातील लोकांना पायाभूत सुविधा मग त्यात पाणी, रस्ते, वीज पुरवठा तसेच कचरा व साफसफाई या सुविधा देतच आहोत. पण अशा भागात जेव्हा सोसायट्या होतील तेव्हा एक चांगल्या प्रकारचे शहर सुध्दा वसेल. पुण्याच्या एसआरएचा प्रश्न हा नाजूक विषय आहे म्हणून त्यादृष्टीने आपल्याला नियोजन करावे लागेल. तसेच यामध्ये ट्रान्सपरन्सी असावी अशीही सूचना सन्माननीय सदस्या श्रीमती वंदनाजी चव्हाण यांनी केली. त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, याबाबत योग्य त्या सूचना दिल्या जातील आणि ज्या झोपडपट्टी भागातही अशा योजना होणार आहेत त्यातील सर्वांना एकत्रित करुन त्या योजनेचे स्वरुपही सांगण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी जो मुद्दा उपस्थित केला की पिंपरी-चिंचवड प्राधिकरणावर फक्त स्थानिक प्राधिकारी संस्थांमधून आलेल्या सदस्यांनाच का घेण्यात येणार आहे ? त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, पुणे, पिंपरी-चिंचवड प्राधिकरण हे फक्त चिंचवडपुरतेच मर्यादित आहे, संपूर्ण राज्यासाठी नाही म्हणून अशा प्राधिकरणावर फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्याच सदस्यांना घेण्यात येईल. तरी देखील सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार यापूर्वीच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी तसे सांगितले असल्यास ते प्रोसिडींग तपासून घेण्यात येईल व त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

श्री. विनोद तावडे : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर व पूर्ण उत्तर दिले आहे. त्यांनी ज्या दोन-चार गोष्टी सांगितल्या. त्यात वारंवार वेगवेगळ्या समित्या बनविणे आणि त्या बदलणे अशा प्रकारे समित्या देणे आणि बदलण्याचे कारण तांत्रिक स्वरुपाचे नसून

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

पुण्यातील राजकारण आहे, त्यात मी जाणार नाही. कारण पुण्याची एसआरए योजना एकदाची होऊन जाऊ दे हा आमचा हेतू आहे. या निमित्ताने दोन तीन गोष्टी मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी मागणी केल्याप्रमाणे पुणे-पिंपरी-चिंचवड प्राधिकरणावर स्थानिक स्वराज्य संस्थांमधून आलेल्या सदस्यांनाच घेतले जाते. माझे असे म्हणणे आहे की, यातून लोकप्रतिनिधींना बाजूला का टाकलेले आहे ? असा निर्णय घेतल्यामुळे लोकप्रतिनिधींवर अन्याय होतो. लोकप्रतिनिधींचा सन्मान करणारे आपल्यासारखे मंत्री असे चूकत असतील यावर विश्वास नाही. या प्राधिकरणामध्ये आपण महापौरांना सुध्दा घेत नाही त्यामुळे महापालिकेचा आयुक्त हा महापौराच्या डोक्यावर येऊन बसणार आहे. या अनुषंगाने माझे दोन तीन प्रश्न आहेत. त्यात एक म्हणजे महापौरांना या प्राधिकरणाचा सदस्य घेणार काय ? दुसरे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, पायाभूत सुविधा आपण त्यांना आजही देत आहोत. पण 1:3 एवढा टीडीआर आपण त्यांना देणार व त्या माध्यमातून जी नवीन घरे निर्माण होणार आहेत त्यात मग प्रत्येकाची 500 चौरस फुटाची जागा व गाड्या येणार. अशा वेळेस पायाभूत सुविधांवर ताण येणार नाही काय ? त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांनी म्हटल्यानुसार या पायाभूत सुविधांवर जो खर्च होणार आहे त्यासाठी आपण वेगळा निधी काढतो. परंतु तो खर्च ट्रेझरीत जाणार आणि तो निधी वापरावयाचा म्हटले तर तो कोणत्या बाजूने वापरला जाईल ? तसेच तिसरा प्रश्न म्हणजे मुंबई आणि ठाण्यातील एससआरए स्कीम्स आपण केल्या. बांद्रा, वरळी, चर्चगेट आणि नरिमन पॉईंटमधील बिल्डरांनी या योजना ताबडतोब उचलल्या.....

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

पुण्याच्या एसआरए योजना चालविण्यास कोणीही पुढे येत नाही. 1:3 मधील एक एसआरए योजना घेतली तर 1.33 ची दुसरी एसआरए योजना त्याला दिली पाहिजे. 500 टक्के नफा एकाने कमवायचा व 50 टक्के नफा असलेली योजना कोणीही घ्यावयाची नाही असा जो काही प्रकार चालला आहे तो प्रथम बंद करा. 22 बिल्डर्सना मान्यता मिळालेली आहे त्याची यादी मागितली तर कोणाकोणाचे यांच्याशी राजकीय संबंध आहेत हे कोणीही सांगू शकेल. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, चांगल्या प्रॉफिटेबल एसआरए झोन मध्ये योजना घेणा-याला तुम्ही कमी प्रॉफीट असाणा-या एसआरए झोनचे कम्पलशन केले तरच पुण्यातील झोपडपट्टीवासियांना न्याय मिळेल नाही तर चांगल्या एरियातीलच एसआरएचे काम होईल बाकीच्या एरियातील एसआरएचे कामच होणार नाही.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला की, या समितीमध्ये महापौरांचा समावेश का करण्यात आला नाही ? मी मघाशी सांगितल्या प्रमाणे यामध्ये दोन समित्या आहेत. पहिली समिती माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली असून दुसरी सहाय्यक समिती ही मा.पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आहे. प्राधिकरणाला एक समिती आणि दोन उप समित्या आहेत. माननीय पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती आहे त्या समितीमध्ये महापौरांचा समावेश आहे. परंतु तरी देखील सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय महत्वाची आहे. या समितीमध्ये सुध्दा मा. महापौरांना सामावून घेतले पाहिजे या मताचा मी सुध्दा आहे. त्यामुळे यासंदर्भात निश्चितपणे योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला आहे की, आपण त्यांना दोन एफएसआय वाढवून देतो व त्यावर जो प्रिमिअम घेतो तो प्रिमिअम कोणाच्या तिजोरीत जातो ? यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, साधारणपणे प्रती चौरस मिटर 560 रुपये विकासकाकडून घेण्याचा यामध्ये क्लॉज आहे. त्याच बरोबर पार्कींग करिता प्रत्येक फ्लॅटमागे 20 हजार रुपये घेण्याचे बंधन घातलेले आहे. यातून जी काही रक्कम जमा होईल त्यातील 90 टक्के रक्कम तेथील महानगरपालिकेकडे राहील व 10 टक्के रक्कम एसआरए कडे राहील.

...2..

श्री. विनोद तावडे : महानगरपालिकेला त्यांच्या कर्मचा-यांचे पगार व इतर विकासाचे कामे करावे लागत असतात त्यामुळे महानगरपालिकेला जास्तीत जास्त निधी मिळाला पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे आपल्याला बंधन घालता येईल त्यास काही हरकत नाही.

तसेच सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न विचारला आहे की, एकाला 1:3 आणि दुस-यास 1:33 अशा प्रकारचे काम देऊ नये. मी आपणास सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये ज्या ठिकाणी एसआरएच्या नफ्याच्या योजना होत्या त्याच उचलल्या गेल्या व बाकीच्या उचलल्या गेल्या नाहीत. या प्रकारची पुनरावृत्ती पुणे येथे होऊ नये अशी जी सूचना केलेली आहे त्यानुसार त्यावर बंधन घालण्याच्या दृष्टीने ही बाब तपासून बघण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी पुन्हा खुलासा केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी या विषयाला पुन्हा एकदा वाचा फोडलेली आहे. या ठिकाणी उत्तर देतांना सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, विधानसभेच्या सदस्यांशी विधान परिषदेच्या सदस्यांशी तुलना करु शकणार नाही. त्या ठिकाणावरुन ते आमदार स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेले आहेत. अशा प्राधिकरणामध्ये विधानपरिषदेच्या सदस्यांना घ्यावे की, न घ्यावे याबाबत माननीय मंत्रीमहोदयांच्या मनातच शंका आहे. विधान परिषदेच्या एकूण 78 सदस्यांपैकी 66 सदस्य हे डायरेक्ट निवडून येत असतात. विधान परिषदेच्या सदस्यांचा कालावधी हा सहा वर्षाचा असतो त्यामध्ये दर तीन वर्षामध्ये किंवा दोन वर्षामध्ये विधानसभेच्या सदस्यांमधून 10-10 सदस्य निवडून येत असतात. शिक्षक मतदारसंघ किंवा स्थानिक प्राधिकारी संस्थामधून येणारे विधान परिषदेचे सदस्य हे निवडून आलेले असतात. त्यांची येथे कोणी नेमणूक करीत नाही. विधानसभेमध्ये जसे सन्माननीय सदस्य निवडून येतात तसेच विधान परिषदेमधून सुध्दा सन्माननीय सदस्य निवडून येत असतात त्यामुळे विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्यांमध्ये आपल्याला भेदभाव करता येणार नाही. विकास निधी हा विधानसभा आणि विधानपरिषदेच्या दोन्ही सदस्यांना सारखाच मिळत असतो. विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांमध्ये आपण तुलना करु शकत नाही. यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी...

विधान सभेचे सदस्य आणि विधान परिषदेचे सदस्य यात आपण फरक करू नये. हे वरिष्ठ सभागृह आहे. सार्वभौम सभागृह आहे. विधान सभेच्या सदस्यांना जे अधिकार दिले जातात, मान दिला जातो तो विधान परिषदेच्या सदस्यांना देखील मिळाला पहिजे अशी आमची भूमिका आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी जी भूमिका मांडली ती त्यांनी लगेच दुरूस्त देखील केली. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. विधान सभेचा सदस्य आणि विधान परिषदेचा सदस्य असा फरक असता कामा नये. दोन्ही सभागृहाचे सदस्य एकच आहेत असा ॲप्रोच असला पाहिजे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, शासकीय कार्यक्रम पत्रिकेमध्ये त्या त्या शहरातील आमदारांचे नाव निमंत्रण पत्रिकेमध्ये छापले जात नाही. यासंबंधातील मी अनेक पुरावे आपल्याला देईन. तेव्हा यासंबंधी आपण आदेश द्यावेत ही विनंती.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी लगेच म्हणालो की, मला असे म्हणावयाचे नाही. मी देखील या सदनाचा सदस्य राहिलो आहे. तशा प्रकारचा माझा हेतू नाही. विधान परिषदेचा सदस्य समितीवर घेण्याच्या दृष्टीने निश्चितपणे विचार केला जाईल.

...........

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मिरा-भाईंदर शहराला होणारा अपुरा पाणी पुरवठा.

**मु. शी.**: मिरा-भाईंदर शहराला होणारा अपुरा पाणी पुरवठा यासंबंधी श्री रमेश शेंडगे,श्रीमती उषा दराडे, श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे,श्री.अरूण गुजराथी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मिरा-भाईंदर महानगरपालिका (जि. ठाणे) शहराला होणारा अपुरा पाणीपुरवठा लक्षात घेऊन जून, २०१० पासून नवीन नळ जोडण्या देण्याचे काम बंद करण्याचे आदेश महापालिकाद्वारे देण्यात येणे, परंतु हा आदेश डावलून बनावट कागदपत्राच्या आधारे अनधिकृत असलेल्या बांधकामांना नळ जोडण्या देण्याचे काम सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, याच महानगरपालिकेचा पाणी पुरवठ्यासाठी पाईपलाईन खरेदी करणे व मलनिस्सारण केंद्र चालविणे, यामध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी, समाजसेवक व महापौर यांनी शासनाकडे करुन सुध्दा याकडे होत असलेले दुर्लक्ष, या संदर्भात आयुक्त, मिरा-भाईंदर महापालिका यांनी चौकशी समिती नियुक्त करुन दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची शिफारस करुन सुध्दा त्यावर अद्यापही अंमलबजावणी न होणे, त्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

श्री.भास्कर जाधव (पाणी पुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई शहर व उपनगरावर लोकसंख्येचा ताण पडत आहे. त्यामुळे नवी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर येथील महानगरपालिकेच्या क्षेत्रात लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. सर्व महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहणाऱ्या लोकांना सर्व सोयी-सुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात 10 लाख लोक राहतात. तेथे राहणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावित आहे. त्यांना 2-3 दिवस पिण्याचे पाणीच मिळत नाही. त्यामुळे तिथल्या लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वेगवेगळ्या रोगाचा प्रसार होत आहे. पाण्याची कमतरता असल्यामुळे दूषित पाण्यामुळे रोगराई पसरत आहे. प्राधिकरणामार्फत 8 एमएलडी पाणी आणि एमआयडीसीमार्फ 10 एमएलडी पाणी दर दिवशी मिरा-भाईंदर महानगरपालिकेला पुरविण्यात येते. असे जरी असले तरी सर्व जनतेला दर दिवशी समान पाणी वाटप होत नाही. काही ठिकाणी 1-2 दिवसांनी पाणी पुरवठा होतो, तर काह ठिकाणी 2-3 दिवस पाणी येत नाही. तसेच येथे बेकायदेशीर नळजोडण्या असल्याचे देखील निदर्शनास आले आहे. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक, समाजसेवक यांनी या विरूद्ध आंदोलन देखील केले आहे. यासंबंधी प्रशासन कुठलीही कारवाई करीत नाही. तेव्हा तेथे राहणाऱ्या सर्व जनतेला आवश्यक असलेले पिण्याचे पाणी मिळण्यासाठी शासन उपाययोजना करणार आहे काय ? तसेच बेकायदेशीर नळ जोडणीला प्रतिबंध करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ? तसेच कर भरणाऱ्या जनतेला सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारलेले आहेत. मीरा-भाईंदरमध्ये पाण्याची किती वानवा आहे हे आपणास माहीत आहे. या शहराला महानगरपालिका आणि शासनाकडून पाणी देण्याचा प्रयत्न होत आहे. शहाड-टेमघर धरणातून 86 एम.एल.डी. तर एम.आय.डी.सी.कडून 19 एम.एल.डी.पाण्याचा पुरवठा केला जातो. यापूर्वी एम.आय.डी.सी.कडून 12 एम.एल.डी.पाणी पुरवठा होत होता. या प्रश्नाच्या संदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील चर्चा झालेली आहे. त्याठिकाणी असलेल्या पाईप गळतीबाबत चर्चा झालेली आहे. यापूर्वी आपण त्या शहरांना 40-40 तास पाणी पुरवू शकत नव्हतो. परंतु आता आपण 17 तासांवर आलो आहोत. या शहराची पाण्याची गरज दिवसाला 150 एम.एल.डी. आहे. आपण त्यांना 98 ते 100 एम.एल.डी.पाणी पुरवितो. या शहरांना पाणी पुरवठा कमी आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, शासनाने आणि मीरा-भाईंदर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम अंतर्गत 200 एम.एल.डी.ची योजना तयार केली होती. या योजनेस अगोदर मान्यता मिळाली नाही,परंतु मागील 15-20 दिवसांपूर्वी मान्यता मिळाल्यामुळे सदरहू योजना केंद्र सरकारकडे पाठविण्यात आली आहे.

सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न अनधिकृत जलजोडणी संदर्भातील आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, महानगरपालिकेच्या आयुक्तांनी ग्रुप कनेक्शन देण्याची योजना आखून त्यावर वॉटर मीटर बसविले आहेत. ग्रुप कनेक्शनशिवाय कोणालाही कनेक्शन द्यायचे नाही असे त्यांनी धोरण निश्चित केले आहे. स्वत: आयुक्तांनी प्रशासकीय पातळीवर एप्रिल 2010 पासून कोणतीही खाजगी नळजोडणी स्वीकारावयाची नाही अशी नोटीस काढली आहे. आजमितीस तेथे 31 हजार 269 जलजोडण्या आहेत. अनधिकृत जलजोडण्या नाहीत. सन्माननीय सदस्यांनी अनधिकृत जलजोडण्यांची माहिती दिल्यास त्यांची कनेक्शन्स लगेच तोडण्यात येतील आणि ज्या अधिकाऱ्यांनी अशी कनेक्शन्स दिली त्यांचा शोध घेऊन त्यांचेवर कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, निवेदनात नमूद केलेले आहे की, "मीरा-भाईंदर महानगरपालिका शहरास होणारा अपुरा पाणी पुरवठा लक्षात घेऊन महानगरपालिकेने एप्रिल 2010 पासून नवीन जलजोडण्या देणे बंद करण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यानुसार एप्रिल, 2010 पासून कोणतीही नवीन जलजोडणी मंजूर करण्यात आलेली नाही. मंजूर करण्यात आलेल्या जलजोडण्या बांधकाम परवानगी असलेल्या इमारतींनाच मंजूर करण्यात आलेल्या आहेत." ठाणे जिल्ह्यामध्ये जवळपास पाच लाख अनधिकृत बांधकामे आहेत. ज्याला आर्किटेक्चरचे नॉलेज नाही अशी व्यक्ती सुध्दा तेथील इमारती कलल्या असून त्या 10-15 वर्षात पडतील असे सांगेल. माझा प्रश्न आहे की, महानगरपालिकेने हे आदेश एप्रिल 2010 पासून कशासाठी काढले ? त्याठिकाणी आताच पाणी पुरवठा कमी झालेला आहे काय ? गेल्या 15 वर्षापासून तेथे पाण्याची बोंब आहे. तेथील अनेक इमारतींना सी.सी.मिळाली नसताना पाणी पुरवठा केलेला आहे त्याबाबत काय कारवाई करणार आहात ? गेल्या पाच वर्षात तेथे अनधिकृतपणे जलजोडण्या दिलेल्या आहेत हे मी दाव्यानिशी सांगतो, त्याबाबत शासन चौकशी करणार आहे काय ? ज्या अधिकाऱ्यांनी अनधिकृतपणे जलजोडण्या दिल्या त्यांच्यावर कारवाई करणार काय ? तसेच शासनाने जानेवारी 2008 मध्ये एक परिपत्रक काढले,

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

त्या प्रमाणे अंमलबजावणी झालेली नाही. त्याचबरोबर त्या ठिकाणी दक्षता पथके नेमण्याचीसुध्दा प्रोव्हिजन करण्यात आलेली आहे. परंतु त्याप्रमाणे देखील घडलेले नाही. तेव्हा या सर्व बाबीची चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये असे म्हटलेले आहे की, "मिरा -भाईंदर महानगरपालिकेला होणा-या अपुरा पाणीपुरवठयाच्या संदर्भात लोकप्रतिनिधींनी तक्रारी केल्या होत्या." त्याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अशा प्रकारे लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार केलेली नाही. त्या ठिकाणच्या आयुक्तांनीच तशा स्वरुपाचे पत्र काढले होते. या संदर्भात सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, आयुक्तांनी हे पत्रक एप्रिल महिन्यातच का काढले होते ? तेथील आयुक्तांनी आपल्या विभागाला असे आदेश दिले होते की, नळाचे कनेक्शन मिळण्यासबंधीचे अर्जच स्वीकारण्यात येऊ नयेत. जर अर्जच स्वीकारले नाहीत तर नळाचे कनेक्शन देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सभापती महोदय, आपल्याला हे माहीत असेल की मध्यंतरी शासनाने अशा प्रकारचे आदेश दिले होते की, आजपर्यंत जेवढी कनेक्शन्स दिली होती तेवढीच कायम करण्यात यावीत. त्या व्यतिरिक्त इतर कोणृतीही कनेक्शन्स कायम करण्यात येऊ नयेत. अशा प्रकारे त्यावेळची 31 हजार 269 कनेक्शन्स कायम करण्यात आलेली आहेत. त्याला ग्रुप कनेक्शन म्हणून पाणी दिले जाते. त्याचबरोबर 35 ते 37 कमर्शिअल कनेक्शन्स अशी आहेत की त्याच्या बाबतीत कायदेशीर कारवाई करावयाची आहे. परंतु या व्यतिरिक्त इतर कोणालाही कनेक्शन्स देण्यात आलेली नाहीत.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सूर्या धरणातून पाणी घेण्याचा एक प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याची किंमत 1100 कोटी रुपये आहे. हा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए.कडे होता. परंतु त्यांच्याकडून हा प्रस्ताव काढून घेऊन महानगरपालिकेने ते काम स्वत: करण्याचे ठरविले आहे. त्याचे कारण काय आहे ? यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मागील दहा वर्षापासून नळाचे पाईप एकाच कंत्राटदाराकडून घेण्याचे कारण काय आहे ?

**उपसभापती** : वसई विरार महानगरपालिकेशी सबंधित ती योजना असल्यामुळे, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न गैर लागू आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय मिरा - भाईदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात राहणा-या लोकांना अपुरा पाणीपुरवठा होतो. यासंबंधी शासनाचे लक्ष वेधण्यात आलेले आहे. मिरा भाईंदर शहराने मुंबई शहरावर उपकार केलेले आहेत. मध्यमवर्गीयाना वा कनिष्ठ वर्गीयांना मुंबई मध्ये घर घेणे परवडत नाही. त्यामुळे ही मंडळी मुंबई् शहरामध्ये घर घेऊन राहू शकत नाहीत. मुंबई्च्या जवळ ठाणे आणि कल्याण ही शहरे ज्याप्रमाणे वसलेली आहेत त्याच प्रमाणे मिरा भाईदर ही शहरे देखील वसली आहेत. त्या ठिकाणी 10 ते 15 लाख लोक राहत आहेत. त्या शंहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत ज्वलंत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने त्या भागात राहणा-या लोकांना पाणीपुरवठा करण्यासाठी स्वत: धरण बांधलेले आहे. त्यामुळे त्या भागात 15 वर्षे पाण्याची टंचाई राहणार नाही. असे नवी मुंबई महानगर पालिकेकडून सांगितले जात आहे. इतकेच नव्हे तर त्यासाठी जादा टॅक्ससुध्दा वसूल करण्यात येणार आहे. ठाणे महानगरपालिकेमध्ये देखील अशाच प्रकारे योजना राबविण्याचे ठरविले जात आहे. मिरा भाईदर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली आहे. त्यामुळे या महानगरपालिकेने पाणी पुरवठा करण्यासाठी स्वत:च्या पैशातून प्रकल्प बांधला तर अधिक बरे होईल. त्यामुळे पुढील दहा - पंधरा वर्षात तेथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. तेव्हा मिरा भाईंदर महानगरपालिका स्वत:च्या निधीतून पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्रपणे धरण बांधणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. आपल्या सर्वांना हे माहीत आहे की मिरा - भाईंदर हे शहर मुंबईच्या दृष्टीने महत्वाचे असून या शहराने स्वत: काही अडचणी सहन करुन सहकार्य केलेले आहे. एम.एम.आर.डी.ए.च्या मार्फत विविध प्रकल्प घेतले जातात. त्या प्रकल्पामुळे जे विस्थापित होत असतात त्यांचे पुढच्या काळात मिरा भाईंदरमध्ये पुनर्वसन करण्याचे काम मोठया प्रमाणावर केले जाणार आहे. त्यामुळे त्या शहरात राहणा-या लोकांना रस्ते, वीज,पाणी, आरोग्य इत्यादी सोयी सुविधा दिल्या पाहिजेत. सध्या मिरा - भाईंदर शहराला पुरेसे पाणी दिले जात नसल्यामुळे सूर्या धरणातून एम.एम.आर.डी.ए.ला 302 एम.एल.डी.पाणी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे त्यातील 100 एम.एल.डी.पाणी मिरा -भाईदर महानगरपालिकेला देण्याचा निर्णय

..3..



VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 13.40

श्री भास्कर जाधव ......

एम.एम.आर.डी.ए.ने घेतला असून त्याकरिता फॉरेस्ट डिपार्टमेन्टची जागा घेतली जाणार असून त्या जागेसाठी एम.एम.आर.डी.ए.ने 96 कोटी रुपयांचा भरणा केलेला आहे. त्या संदर्भातील योजना केन्द्र सरकारकडे पाठविण्यात आली असून तिला मंजुरी मिळाल्यानंतर कायम स्वरुपी हा प्रश्न सुटेल.

--------

नंतर श्री.सरफरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कळंबोली येथील सेंट जोसेफ शाळेतील विद्यार्थीनीवर शिक्षकाने केलेला बलात्कार

**मु. शी.** : कळंबोली येथील सेंट जोसेफ शाळेतील विद्यार्थीनीवर शिक्षकाने केलेला बलात्कार यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे सर्वश्री राजन तेली, अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कळंबोली ता.पनवेल जि. रायगड येथील सेंट जोसेफ शाळेत तिसरीच्या वर्गात शिकत असलेल्या एका विद्यार्थीनीवर शिक्षकाने बलात्कार केल्याची भयंकर घटना माहे जून, 2010 च्या दरम्यान उघडकीस येणे, विद्यार्थ्यांना शिक्षण देणारे शिक्षकच राक्षस बनत असल्यामुळे विद्यार्थीनींना आता शाळेतच असुरक्षितता वाटू लागणे, तसेच त्यांच्या पालकांमध्ये सुध्दा चिंतेचे वातावरण निर्माण होत असल्याचे आढळून येणे, सदर शिक्षकाबाबत संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार करुनही या शिक्षकाचा एक साक्षीदार अद्याप मोकाटच बाहेर फिरत असणे, याबाबत पीडीत मुलीचे आईवडील पोलीस ठाणे येथे न्याय मागण्यासाठी गेले असता शाळेतील सुपरवायझरचे नातेवाईक यांनी या मुलीच्या आईवडिलांना बेदम मारहाण करणे, तसेच त्यांना ठार मारण्याची धमकीही देण्यात येणे, यामुळे या मुलीच्या आई वडिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, सध्या शाळेतील शिक्षकच अल्पवयीन मुलीवर करीत असलेल्या बलात्काराच्या वाढत असलेल्या घटना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्याचे कारण असे की, 21 जूनला ही घटना घडल्यानंतर 30 जून रोजी मी स्वत: कळंबोली पोलीस स्टेशनला भेट दिली. आणि 1 जून रोजी शीख समुदायाने त्याठिकाणी एक बैठक घेतली. याठिकाणी 7 वर्षाची एक लहान मुलगी आणि साडे पाच वर्षाचा एक आणि पावणे चार वर्षाचा दुसरा अशी दोन भावंडे मिळून सर्वजण एकाच शाळेमध्ये शिकत होते. या प्रकरणी फिरोज इब्राहीम या आरोपीला अटक करण्यात आली आहे. याबाबत त्या मुलीच्या कुटुंबियांशी बोलल्यानंतर या लहान मुलीने गेल्या वर्षी 7 ते 8 वेळा फिरोज इब्राहीम तिला त्रास देत असल्याची तक्रार शाळेच्या प्राचार्या मीरा कुंटे आणि सुपरवायझर प्रीती गिल यांच्याकडे केली असल्याची माहिती समोर आली आहे. तिला कशाप्रकारे त्रास तिला दिला जात होता हे तिने बोबडया भाषेमध्ये सांगितलेले मी या सभागृहामध्ये सांगू शकत नाही. तिचे आई-वडील यापूर्वी तिला डॉक्टरकडे घेऊन गेले होते. त्यावेळी डॉक्टरने या मुलीवर फार अत्याचार होत असल्याचे तिच्या आई-वडिलांना सांगितले. त्यामुळे प्राचार्या मीरा कुंटे व प्रीती गिल यांच्याकडे त्या मुलीच्या आई-वडिलांनी तक्रार करुन देखील फिरोज इब्राहीमला कोणताही अटकाव करण्यात आला नाही. म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, मीरा कुंटे आणि प्रीती गिल यांना फिरोज इब्राहीमच्या दुष्कृत्याची माहिती असून सुध्दा त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. म्हणून या दोघींना या प्रकरणामध्ये जबाबदार धरुन या खटल्यामध्ये सहआरोपी करण्यात यावे अशी माझी मागणी आहे. या विषयावर कळंबोलीमध्ये बंद पाळण्यात आला होता. आता त्याठिकाणी हिंसाचार होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या मुलीच्या आई-वडिलांनी सांगितले आहे की, आम्हाला न्याय मिळत नसल्यामुळे आम्ही आता गुरुव्दारामध्ये जाऊन तलवारीने स्वत:ला मारुन घेतो. म्हणून या प्रकरणामध्ये शाळेच्या प्राचार्या आणि सुपरवायझर यांना सहआरोपी केले गेले पाहिजे ते आपण करणार काय? ही लक्षवेधी सूचना दिल्यानंतर सात वर्षाच्या एकटया लहान मुलीला पोलीस कुठल्यातरी तपासाकरिता घेऊन जातात. त्या लहान बालिकेचे वय लक्षात घेतल्यानंतर तिच्यासोबत तिच्या आई-वडिलांना नेण्याची परवानगी असलीच पाहिजे. परंतु त्या मुलीला एकटीला आम्ही मुंबईला घेऊन जाणार आहोत असे पोलीस अधिकाऱ्यांनी तिच्या वडिलांना सांगितले होते हे त्या मुलीच्या वडिलांनी मला सांगितले. सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी वारंवार सांगितले की, आम्ही ओळख परेडची कार्यपध्दती बदलू. परवाच्या दिवशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे....

घेतलेल्या ओळख परेडमध्ये सात वर्षाच्या मुलीला 15 लोकांसमोर उभे केले गेले. त्यावेळी ती मुलगी त्या लोकांना बघू शकेल, ते लोक हातवारे करुन तिला बघू शकणार नाहीत अशापध्दतीने ओळखपरेडची कार्यपध्दती आम्ही बदलू असे माननीय गृह राज्यमंत्र्यांनी सांगितले होते. परंतु कार्यपध्दत अजून बदलली गेली नाही. यावर वरताण अशी की, अजूनपर्यंत दुसरा आरोपी पकडला गेला नाही. त्या मुलीला बेसिनवर बसवून एकाने तिचे तोंड दाबून दोन लोकांनी तिच्याशी दुष्कृत्य केले आहे. अशाप्रकारे थोडक्यात याठिकाणी काय काय सांगावयाचे? या प्रकरणी तपास करण्याकरिता महिला पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती केली पाहिजे. तसेच, प्राचार्या व सुपरवायझरला सहआरोपी केले गेले पाहिजे. या प्रश्नाच्या बाबतीत सकारात्मक उत्तर देणार काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेला मुद्दा निश्चितपणे गंभीर स्वरुपाचा आहे. मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, ज्या आरोपींनी हा गुन्हा केला आहे, त्यामध्ये त्या शाळेचे शिक्षक आणि शाळेचे सुपरवायझर यांना निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे श्रीमती कुंटे नावाच्या प्राचार्यांना यामध्ये सहआरोपी करावे असे माननीय सदस्यांनी सांगितले आहे. या प्रकरणी चौकशी करुन जर निष्पन्न झाले तर त्यांना देखील सहआरोपी करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, चौकशीमध्ये निष्पन्न झाल्यानंतर आपण सहआरोपी करणार आहात. वास्तविक पहातां मुलीच्या पालकांनी शाळेच्या मुख्याध्यापकांकडे तक्रार केली होती. सुपरवायझर काहीही कारण नसतांना त्या मुलीच्या आईवडिलांना व तिच्या लोकांना मारझोड करतात.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

शिवीगाळ करतात आणि त्यांना दाबण्याचा प्रयत्न करतात पर्यायाने ते सह आरोपी आहेत हे सिध्द होते. सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, स्त्रियांची चौकशी करावयाची असेल तर स्त्री पोलीस अधिकारी असले पाहिजे. तरी सुध्दा त्या सात वर्षाच्या मुलीला पुरुष ऑफिसर चौकशीसाठी घेऊन जातो हा गुन्हा आहे म्हणून त्या पोलीस ऑफिसरवर कारवाई करणार काय?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, वेळोवेळी संपूर्ण महाराष्ट्रात अशा प्रकारच्या प्रचंड तक्रारी येत आहेत. शाळेतील शिक्षकांचे अल्पवयीन मुलींवर बलात्कार करण्याचे, त्यांना त्रास देण्याचे आणि त्यांचे लैंगिक शोषण करण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना वारंवार या सभागृहात ऐकावयास मिळतात. माझी सूचना अशी आहे की, कायद्यात दुरुस्ती करुन ज्या शाळांमध्ये अशा घटना घडतात त्या ठिकाणच्या मुख्याध्यापकाला आणि सुपरवायझरला परस्पर गुन्हेगारीच्या कायद्यान्वये नोंद करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल होईल आणि त्या मुलींच्या पुढील आयुष्याची सगळी जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्याच्या दृष्टीने कडक कायदा तयार करुन त्यांनाही यामध्ये गुन्हेगार म्हणून गृहीत धरण्याचा नवीन कायदा करण्यात येईल काय? जेणे करुन अशा गुन्हयांना आळा बसेल.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याप्रमाणे हा गुन्हा नक्कीच महिला पोलीस अधिकाऱ्यांकडे तपासासाठी दिला जाईल. वेळोवेळी महिलांवर व मुलींवर अत्याचार होतात याची शासनाने गंभीर दखल घेऊन माजी न्यायमूर्ती धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केलेली आहे. अशा प्रकारच्या गुन्हयातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. त्यांच्यावर जरब बसली पाहिजे यादृष्टिकोनातून कायद्यामध्ये काही बदल करता येईल काय? जेणे करुन भविष्यात अशा प्रकारचे गुन्हे घडणार नाहीत. यासाठी माननीय निवृत्त न्यायाधीश घर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्या समितीमध्ये महिला आयोगाच्या अध्यक्षा आहेत. विधानपरिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड. उषा दराडे, विधानसभा सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे....

प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, श्रीमती मरा बोरवणकर, विशेष महानिरीक्षक, श्रीमती राणी बंग, श्रीमती प्रतिमा जोशी,पत्रकार अशा महत्वाच्या व्यक्तिंची समिती गठीत केली आहे. जेणे करुन गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्यासाठी कायद्याचा अभ्यास करुन भविष्यकाळात असे गुन्हे होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल. शासन याबाबतीत गंभीर असून अशा प्रकारच्या गुन्हयांचा निकाल लावण्यासाठी 35 जिल्हयामध्ये फास्टट्रॅक कोर्टची योजना असावी अशी विशेष पोलीस महिला अत्याचार कक्षाने शिफारस केली असून ती नस्ती विधी व न्याय विभागाकडे प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याचा निर्णय लवकरच लागेल. अशा प्रकारचे संपूर्ण खटले महिला न्यायाधीशांच्या अधिकारामध्येच चालवावेत यासाठी शासनाने महाराष्ट्रातील अहमदनगर, अकोला, अमरावती,औरंगाबाद, बुलढाणा, बीड, जळगाव,नागपूर या नऊ जिल्हयामध्ये तसेच ठाणे, पुणे आणि कोल्हापूर या तीन जिल्हयांमध्ये विशेष न्यायालयाची स्थापना केली आहे. त्यामुळे महिलांवर होणाऱ्या अत्याचाराकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे असे म्हणता येणार नाही. याबाबतची गंभीर दखल घेऊन भविष्य काळामध्ये अशा प्रकारच्या गुन्हयामध्ये गुन्हेगाराला कठोर शासन कसे होईल यादृष्टीने शासनाचा 100 टक्के यशस्वी प्रयत्न रहाणार आहे.सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे तपासणी अधिकारी पुरुष असेल तर त्यांना काढून त्या ठिकाणी महिला तपासणी अधिकारी नेमण्यात येतील.शासनाने हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस :सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, वारंवार मुलींचे पालक प्रत्येक ठिकाणी तक्रार करतात पण मुख्याध्यापक जाणूनबुजून दुर्लक्ष करतात, असे प्रत्येक वेळी निदर्शनास आले आहे. म्हणून अशा प्रकारच्या गुन्हयांमध्ये मुख्याध्यापकाला जबाबदार धरुन त्यांच्यावर प्रथम कारवाई करणार काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, अशी वस्तुस्थिती असेल तर नक्कीच कारवाई करण्यात येईल. अशा गंभीर गुन्हयामध्ये प्राचार्य असोत वा कोणीही असोत त्यांची शासन गय करणार नाही. त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

...3..



SMT/ MMP/ KGS/ 13:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सेंट जॉसेफ या शाळेत जी तीन मुले शिकत होती त्या तिन्ही मुलांना ताबडतोब काढून टाकण्यात आलेले आहे. शिक्षण मंत्री सभागृहात असल्यामुळे मला याठिकाणी उल्लेख करावयाचा आहे की, रायगडचे शिक्षणाधिकारी श्री. जाधव यांनी खूप सहकार्याची भूमिका घेऊन या मुलांना दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळवून दिला आहे. दुसऱ्या शाळेने असे सांगितले की, तुम्हाला 40 ते 45 हजार रुपये डोनेशन भरावे लागेल. सभापती महोदय, ही सेंट जोसेफ शाळा सांगते की, आम्ही मुलांना काढून टाकले असले तरी या मुलांनी आधी भरलेली फी आम्ही देणार नाही.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सेंट जोसेफ शाळेने या मुलांना स्वत:हून काढून टाकले आहे. खरे तर त्या अत्याचार पीडित मुलीला त्या शाळेत जगणे शक्य नाही म्हणून शाळा बदलावी लागलेली आहे. अशा वेळेला सेंट जोसेफ शाळेकडून त्यांचे मिळालेले पैसे कोणत्याही परिस्थितीमध्ये दुसऱ्या शाळेकडे वर्ग करण्याचा निर्णय शासन करील काय ? दुसरी बाब अशी की, ज्यावेळी माननीय गृहमंत्र्यांकडे त्या मुलीला घेऊन गेले त्यावेळी दुर्दैवाने असे झाले की, माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांच्याकडे त्यांचा विचारण्याचा हेतू चांगला होता पण त्या ठिकाणी संपूर्ण मिडियाचे लोक बसलेले होते. अशा वेळेला तिला बाजूला बोलवून तिच्याशी न बोलल्यामुळे त्यांच्या पाठीमागे चॅनेल्स आणि मिडियाचे जे 30-40 लोक होते ते विचारत होते की, हीच बलात्कारित मुलगी आहे काय ? अशी चर्चा मिडियासमोर झाल्यामुळे अक्षरश: थरथर कापत तिचे वडील ढसाढसा रडत होते. माझी शासनाला हात जोडून विनंती आहे की, कोणत्याही पक्षाचे कार्यकर्ते असो, ते जेव्हा बलात्कारपीडित महिलेला किंवा छोट्या मुलीला घेऊन येतात तेव्हा मिडियाच्यासमोर त्यांच्याशी बोलण्याचे टाळले गेले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, याची नक्कीच नोंद घेतली जाईल आणि त्या पीडित मुलीला दुसऱ्या शाळेमध्ये जावयाचे असेल तर त्याबाबत शासन संपूर्णपणे लक्ष देऊन तिला दुसऱ्या शाळेत प्रवेश देण्यासाठी देखील प्रयत्न करील.

**उपसभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांना सांगू इच्छितो की, त्या विद्यार्थ्यांचे पैसे त्या शाळेला परत करण्याच्या संदर्भात आपण लक्ष द्यावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याबाबतीत लक्ष देण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी विभागाच्या नाशिक जिल्ह्यातील नोकर भरतीला देण्यात आलेली स्थगिती

**मु. शी.** : आदिवासी विभागाच्या नाशिक जिल्ह्यातील नोकर भरतीला देण्यात आलेली स्थगिती यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, धनंजय मुंडे,सय्यद पाशा पटेल, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जून 2010 च्या शेवटच्या आठवडयात आदिवासी विभागाच्या नाशिकच्या जिल्हयातील नोकर भरतीला एक वर्षाची देण्यात आलेली स्थगिती, ऑगस्ट, 2009 मध्ये 680 पदांसाठी आदिवासी विकास विभागाने मागवलेले अर्ज, अर्ज विक्रीतून 46 लाख रुपयांचा मिळालेला महसूल, अर्ज विक्रीपासून मुलाखतींपर्यंत विविध टप्प्यांवर पार पाडण्यात आलेली परीक्षा प्रक्रिया, मुलाखतींना सुरुवात झाल्यानंतर नोकर भरतीत गैरव्यवहार होत असल्याच्या तक्रारीमुळे आदिवासी विकास मंत्री यांनी भरती प्रक्रियेला दिलेली स्थगिती, एकूण 23 हजार उमेदवारांनी लेखी परीक्षा देणे, त्यापैकी अडीच ते तीन हजार उमेदवार मुलाखतीस पात्र असणे, या सर्वांच्या मनात भवितव्याविषयी निर्माण झालेली चिंता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

श्री. पद्माकर वळवी (आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, नाशिक जिल्ह्याच्या आदिवासी विकास विभागाने 680 जागांसाठी गेल्या वर्षी जाहिरात दिली. एकूण 23 हजार उमेदवारांनी परीक्षा दिली. 200 रुपये प्रमाणे प्रत्येकाला फॉर्मची फी भरावी लागली. यातून 46 लाख रुपयांचा रेव्हेन्यू शासनाला मिळाला. एक वर्षानंतर लेखी परीक्षा घेतली. त्या लेखी परीक्षेमध्ये जे वस्तुनिष्ठ प्रश्न होते ते पेन्सिलने लिहिण्याची परवानगी देण्यात आली. खरे म्हणजे त्याच ठिकाणी जास्त संशय आला. असे असताना सुध्दा त्या लेखी परीक्षेचा निकाल लावला गेला. ती प्रक्रिया तिथेच थांबवावयास पाहिजे होती. लेखी परीक्षेचा निकाल लागल्यानंतर तोंडी परीक्षेच्या वेळेला शासनाने स्थगिती दिलेली आहे. शासनाने मान्य केले आहे की, या नोकर भरतीमध्ये पेन्सिलने उत्तरे चिन्हांकित करण्याच्या सूचना देण्यात आल्या, त्या संशयास्पद होत्या. आणखीही भरपूर तक्रारी आलेल्या होत्या. जर शासन हे मान्य करते की अशा प्रकारे पेन्सिलने वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहितानाच संशय आला होता तर ती प्रक्रिया त्याच ठिकाणी का थांबविली नाही ? दुसरा प्रश्न असा की, आणखी काही तक्रारी आल्या असे म्हटले आहे. त्या तक्रारी कोणत्या ? आता जर ही परीक्षा रद्द होणार असेल तर मुलांचे हे 46 लाख रुपये परत मिळणार काय ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक अंतर्गत वर्ग 3 च्या 680 पदांसाठी 1 ऑगस्ट, 2009 रोजी जाहिरात देण्यात आली. त्यामध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी इन्स्टिटयूट ऑफ बँकींग पर्सनल सिलेक्शन या संस्थेमार्फत लेखी परीक्षा घेण्यात आली. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एकूण 20 हजार 623 उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी 18 हजार 243 उमेदवारांना पात्र ठरविण्यात आले आणि 2129 उमेदवारांना मुलाखतपत्रे पाठविण्यात आली. हे खरे आहे की, यासंदर्भामध्ये तक्रारी आलेल्या होत्या. ही जी परीक्षा घेण्यात आली त्यामध्ये पेन्सिलचा वापर केला. उत्तरे लिहिण्यासाठी पेन्सिलचा वापर करावा अशा प्रकारची जी प्रक्रिया करण्यात आली त्याबाबत हरकत घेण्यात आली. त्यासंदर्भात चौकशी करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने या भरतीच्या मुलाखतीला स्थगिती दिलेली आहे. यामध्ये दुसरी तक्रार श्री. घन:श्याम चौधरी आणि श्री. आर.एन.पाटील या नाशिक जिल्ह्यातील रहिवाशांनी केली होती की, यामध्ये काही गैरव्यवहार झाला आहे, त्याची चौकशी

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

श्री. पद्माकर वळवी ....

करावी. यासंदर्भात आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी चौकशी केलेली आहे. त्यामध्ये या दोन्ही व्यक्तींनी जो पत्ता दिला होता त्या पत्त्यावर ते राहात नाही असे आढळून आले. म्हणून त्या अर्जामध्ये काही तथ्य आढळून आले नाही. परंतु पेन्सिलचा जो वापर करण्यात आला त्या अनुषंगाने ही स्थगिती देण्यात आली आहे. या प्रकरणी विभाग चौकशी करीत आहे. चौकशीनंतर पुढील निर्णय घेता येईल्. तोपर्यंत स्थगिती आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, जे 46 लाख रुपये जमा झाले त्याबाबत सांगावे.

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, यामध्ये हेतू चांगला होता. जी संस्था यामध्ये घेण्यात आली ती एक प्रसिध्द संस्था होती. इन्स्टिटट्यूट ऑफ बँकींग पर्सनल सिलेक्शन या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनमोहन सिंग होते. आता ते आपले सन्माननीय पंतप्रधान आहेत. या संस्थेने विविध बँकांच्या परीक्षा घेतलेल्या होत्या. वेगवेगळ्या डिपार्टमेंटच्या परीक्षा घेतल्या होत्या.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी....

त्याच अनुषंगाने यांनाही संधी देण्यात आलेली होती. पेन्सिलने परीक्षा लिहिण्याची ही प्रक्रिया होती. या संस्थेने यापूर्वी सुध्दा केंद्र व राज्य सरकारच्या परीक्षांची उत्तरे पेन्सिलने लिहावीत असे नमूद केले होते. म्हणून त्याला स्थगिती दिलेली आहे. ही परीक्षा तांत्रिकदृष्टया सदोष आहे अशी तक्रार होती. ते गृहित धरुनच स्थगिती दिलेली आहे. ही स्थगिती पुढील आदेश होईपर्यंत दिलेली आहे. चौकशीअंती जर चांगला निर्णय लागला तर पुढील निर्णय घेण्यात येईल. कोणत्याही उमेदवारावर अन्याय होणार नाही याची पूर्ण खबरदारी घेण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पेन्सिलने उत्तर देण्याची परवानगी दिली होती असे मंत्री महोदय वारंवार सांगत आहेत. या परीक्षेच्या पध्दतीनुसार संगणकीकृत उत्तर पत्रिका असतात. त्यामध्ये उत्तर लिहायचे नसते तर प्रश्नासमोर चिन्ह लिहावयाचे असते. बरोबर की चूक या ऑप्शनचा वापर करावयाचा असतो. पुढील प्रोसेसिंग करण्यासाठी पेन्सिलचा वापर उपयुक्त असतो. म्हणून पेन्सिलची योजना केलेली असते. त्यामध्ये दीर्घ उत्तरे लिहावयाची नसतात. या ऑब्जेटिव्ह टेस्ट असते. त्यामधून वेगळा संदेश जाऊ शकत नाही. यंत्रणा सदोष नसेल पण ती वापरण्यामध्ये काही दोष झालेला असेल तर याबाबतीत ज्या संस्थेने ही परीक्षा घेतली आहे त्या संस्थेचे म्हणणे काय आहे ? संस्थेने लावलेला निकाल पाहता ही जी पेन्सिलने चिन्ह लिहिण्याची पध्दत आहे त्यामध्ये काही घोटाळा झालेला आहे अशी शासनाला शंका वाटत असेल तर त्याची तपशीलवार चौकशी शासनाने केलेली आहे का ?

श्री.पद्माकर वळवी : तपशीलवार माहिती घेण्यासाठीच स्थगिती दिलेली आहे. यामध्ये गैरव्यवहाराची तक्रार करण्यात आली होती. परंतु यात कोणताही गैरव्यवहार आढळून आलेला नाही. जे उमेदवार परीक्षेसाठी हजर झाले होते त्यापैकी कोणत्याही उमेदवाराने लेखी वा तोंडी स्वरुपामध्ये शासनाकडे तक्रार केलेली नाही. परंतु सदोष उत्तरे चिन्हांकित लिहिण्याच्या पध्दतीबाबत तक्रार केली होती त्यामुळे ही स्थगिती दिलेली आहे. भविष्यात उमेदवारांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही. ही प्रक्रिया योग्य आहे असे सिध्द झाले तर निश्चितपणे उमेदवारांना संधी दिली जाईल आणि सदोष आढळले तर शासन योग्य तो निदेश देईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, 680 पदांसाठी 23000 अर्ज आहे त्यापैकी 3000 उमेदवार मुलाखतीसाठी आले होते. यासंबंधी कोणाच्या तक्रारी होत्या ? शासनाने एक वर्षासाठी भरती प्रक्रियाच रद्द केली आहे. यातून 46 लाख रुपये जमा झाले आहेत. शासनाचे असे म्हणणे आहे की, तक्रारकर्ते त्या पत्त्यावर सापडत नाहीत. असे अनेक ठिकाणी घडते. भरती प्रक्रिया सुरु होते, मध्येच ती थांबविली जाते. त्यामुळे एका बाजूला रिक्त पदे राहतात. आश्रमशाळांची रिक्त पदे असतील किंवा इतर ठिकाणची असतील. म्हणून ही भरती प्रक्रिया शासन केव्हा सुरु करणार आहे ? यातील पैसेही अडकून पडले आहेत. त्याचाही निर्णय होत नाही. या 46 लाख रुपयांबाबत शासन केव्हा निर्णय घेणार आहे. यासाठी शास्त्रशुध्द पध्दत अवलंबण्याचा शासनाचा विचार आहे का ?

श्री.पद्माकर वळवी : यासंदर्भातील तांत्रिक दोष तपासण्यासाठीच स्थगिती दिलेली आहे. तपासामध्ये जो निष्कर्ष येईल त्याप्रमाणे शासन निर्णय घेईल. जर संपूर्ण भरती प्रक्रिया व्यवस्थित व लोकांना न्याय देणारी आहे असे सिध्द झाले तर त्यामध्ये उमेदवारांना निवड प्रक्रियेमध्ये सहभागी करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल. तांत्रिकदृष्टया ही पध्दती अवलंबिली असेल तर एक महिन्याच्या आत भरती प्रक्रिया सुरु करु. शासनाचा निकाल तयार आहे. शासनाकडे आर्थिक गैरव्यवहाराची तक्रार आलेली नाही असे खात्रीपूर्वक सांगतो. लेखी परीक्षेतून 2 हजार उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यांना मुलाखत पत्र सुध्दा दिले होते. परंतु तांत्रिक बाबीसंबंधी तक्रार आल्यामुळे ती तपासत आहोत.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.चंद्रकांत पाटील )**

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. पद्माकर वळवी...

ज्यांनी तक्रार केली तेच लोक चौकशीसाठी पुढे येत नाहीत. 680 पदे 5-6 वर्षापासून रिक्त आहेत. आमची सर्व तयारी झालेली आहे. ही तक्रार आली नसती तर ही भरती एवढ्यात झाली असती. आता या परीक्षा पध्दतीमध्ये कोणताही दोष आढळून आला नाही तर ही भरती प्रक्रिया एक महिन्यामध्ये पूर्ण करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : ही भरती एक महिन्यात करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आदिवासींच्या प्रश्नाची जाणीव माननीय मंत्री महोदयांना असणे स्वाभाविक आहे. या परीक्षा पध्दतीमध्ये दोष आढळून आला तर ज्या उमेदवारांनी परीक्षा फी भरलेली आहे त्यांच्याकडून पुन्हा परीक्षा फी घेण्यात येईल काय ?

श्री. पद्माकर वळवी : नाही. यामध्ये उमदवारांचा कोणताही दोष नाही. त्यामुळे उमेदवारांवर अन्याय केला जाणार नाही. आतापर्यन्त जी काही चौकशी झालेली आहे त्यामध्ये दोष आढळून आलेला नाही. आयुक्त, आदिवासी विकास विभागात 5-6 वर्षापासून पदे रिक्त आहेत. शिक्षक रोजंदारीवर काम करीत आहेत. सन्माननीय सदस्यांनी ही बाब निदर्शनास आणली त्याबद्दल मी शासनातर्फे त्यांना धन्यवाद देतो.

श्री. हुसेन दलवाई : आयबीपीएस ही नामांकित संस्था आहे. संगणकीय आवश्यकतेमुळे उमेदवारांना पेन्सिलने चिन्हांकन करण्यास सांगितले होते. यामध्ये घोटाळा झालेला आहे असे वाटत नाही. जर यामध्ये काही घोटाळा नसेल तर झालेल्या परीक्षा ग्राह्य मानून त्यासंबंधातील निर्णय 1 महिन्याच्या आता घेण्यात येईल काय ?

श्री. पद्माकर वळवी : ज्युनिअर कॉलेजमधील 127 पदे भरावयाची आहेत. परीक्षा पास झालेल्या उमेदवारांच्या मुलाखतीही झालेल्या आहेत. ज्युनिअर कॉलेज आणि अन्य शिक्षकांच्या जागा भरण्यास आम्ही सक्षम आहोत. परंतु शिक्षकेतर जागा भरण्यास सामान्य प्रशासन विभागाने स्थगिती दिलेली आहे. प्राथमिक शिक्षक, प्राथमिक शिक्षक-इंग्रजी माध्यम, ज्युनिअर कॉलेजमधील पदे अशी 246 पदे भरण्यास कोणतीही अडचण नाही.

श्री. रामनाथ मोते : आदिवासी विभागातील 680 पदे भरण्यात येणार आहेत. त्यामध्ये प्राथमिक शिक्षक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची पदेही आहेत. शासनाच्या धोरणानुसार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...

शिक्षक पदांच्या भरतीसाठी कोणतीही लेखी परीक्षा घेण्याची तरतूद नाही. जर प्राथमिक शिक्षकाचे पद भरावयाचे असेल तर डीएड झालेला उमेदवार, माध्यमिक शिक्षकाचे पद भरावयाचे असेल तर बीएड झालेल्या उमेदवाराची मेरीटवर भरती केली जाते. त्यामुळे या शिक्षक संवर्गाला परीक्षा पध्दतीमध्ये आणून आपण त्यांच्यावर अन्याय करीत आहात. तेव्हा 680 पदांच्या भरती प्रक्रियेमधून शिक्षक संवर्गाला वगळण्यात येणार आहे काय ?

श्री. पद्माकर वळवी : शिक्षक पदाच्या भरती प्रक्रियेमध्ये शालेय शिक्षण विभागाने घेतलेले निर्णय आदिवासी विकास विभागाला मान्य आहेत. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अंतर्गत असलेल्या शिक्षकांच्या, गृहपालाच्या ज्या जागा भरावयाच्या होत्या त्यामध्ये पारदर्शकता असावी म्हणून लेखी परीक्षा घेण्यात आली. आपण जास्तीत जास्त उमेदवारांना संधी दिलेली आहे. लेखी परीक्षा पास झालेल्या उमेदवारांच्या मुलाखतीही झालेल्या आहे. या भरती प्रक्रियेमधून आदिवासी विकास विभागाला हुशार उमेदवार मिळणार आहेत.

श्री. रामनाथ मोते : पारदर्शकता येण्यासाठी परीक्षा घेतली असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. मी पुन्हा पुनरुच्चार करतो की मेरीट नुसार उमेदवाराची निवड करणे यापेक्षा वेगळी पारदर्शकता काय असू शकेल. डीएड, बीएड या परीक्षांचे मेरीट हे पारदर्शक आहे. या शिक्षकांना कारण नसताना स्पर्धा परीक्षामध्ये का उतरवता ? शिक्षकांची पदे भरताना लेखी परीक्षा घेण्याची कोणतीही तरतूद नाही. मुंबई उच्च न्यायालयाने या संदर्भात निर्णय दिलेला आहे....

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........

तुम्ही त्यांना लेखी परीक्षेच्या प्रक्रियेमध्ये का आणता? लेखी परीक्षा आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता हे वेगळे विषय आहेत.

श्री.पद्माकर वळवी : तपासून घेऊ.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अधिनस्थ परीक्षा आणि मुलाखतीची प्रक्रिया होणार आहे. अप्पर आयुक्तांची बदली झाल्यामुळे त्या रिक्त पदावर नवीन अप्पर आयुक्तांची नियुक्ती झाली आहे का? नियुक्ती झाली असल्यास ते या प्रक्रियेशी अवगत आहेत का? नियुक्त्ी झाली नसल्यास अप्पर आयुक्त पद रिक्त असल्यामुळे मुलाखतीच्या प्रक्रियेला विलंब होता कामा नये. लवकरात लवकर ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल काय?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, तत्कालीन अप्पर आयुक्त श्री.प्रकाश महाजन यांच्याविरुध्द लोकप्रतिनिधींच्या तक्रारी आल्यामुळे शासनाने त्यांची बदली केली. महाराष्ट्राच्या आदिवासी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक हे आय.ए.एस.दर्जाचे अधिकारी असून त्यांच्याकडे अप्पर आयुक्त पदाचा तात्पुरता चार्ज देण्यात आला आहे. अप्पर आयुक्तांसह इतर अधिकाऱ्यांची एक समिती आहे. त्यामध्ये सहआयुक्त देखील आहेत. मुलाखतीची प्रक्रिया लवकर पूर्ण करुन घेण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांवर आरोप झाले त्यामुळे त्यांची चौकशी करण्यात आली. त्यांच्या अधिपत्याखाली मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असेल तर पुन्हा आरोप झाल्यास पर्यायाने आरोपाच्या अनुषंगाने त्यांची चौकशी करावी लागेल. त्यामुळे अप्पर आयुक्तांचे पद तातडीने भरले जाईल काय?

श्री.पद्माकर वळवी : लेखी परीक्षा झालेल्या आहेत. फक्त मुलाखती घ्यावयाच्या आहेत. मुलाखतीची प्रक्रिया पारदर्शी होण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंगसारखे उपक्रम राबविता येतील. आदिवासी विकास महामंडळाचे एम.डी. इतरत्र कार्यरत असताना त्यांच्याविरुध्द आरोप झाले, चौकशी झाली हा वेगळा भाग असू शकतो. परंतु ही भरती प्रक्रिया पारदर्शीपणे व्हावयास पाहिजे, त्यादृष्टीने शासन बांधिल आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : ज्यांच्यावर आरोप झाले, ज्यांची चौकशी झाली त्यांच्याच अधिपत्याखाली मुलाखतीची प्रक्रिया कशी होऊ शकते?

श्री.पद्माकर वळवी : आम्ही एका महिन्यात प्रक्रिया पूर्ण करु. अप्पर आयुक्त हे स्वतंत्र अधिकारी आहेत. या पदावर स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे आदेश दिले असून त्यांच्या अध्यक्षतेखाली पदे भरली जातील.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सध्याच्या अप्पर आयुक्तांकडे तीन पदांचा चार्ज आहे. त्यांच्याच अधिनस्थ मुलाखती घेण्याची प्रक्रिया कशी पार पाडता येईल? स्वतंत्र अप्पर आयुक्त नेमून त्यानंतर भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल काय?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, आदिवासी विकास महामंडळाचे एम.डी.श्री.बागुल यांच्याकडे तीन पदांचा चार्ज आहे. स्वतंत्र अप्पर आयुक्त नेमणार आहोत. ही भरती प्रक्रिया पारदर्शीपणे करण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: 'एड्स'संबंधी विधानमंडळ सदस्य-चर्चापीठ (लेजिस्लेटर्स् फोरम ऑन एड्स) च्या उद्‌घाटन सोहळ्याबाबत माननीय सभापतींची घोषणा

**तालिका सभापती** (श्री.चंद्रकांत पाटील) : जागतिक पातळीवर "एड्स" या रोगाला प्रभावीपणे आळा घालण्याचे प्रयत्न सर्व स्तरावर सुरु आहेत. राष्ट्रीय स्तरावर संसद सदस्यांचा समावेश असलेले एक चर्चापीठ संसदेमध्ये स्थापन करण्यात आलेले आहे. एकूण 14 राज्यांमध्ये देखील अशाप्रकारे विधानमंडळ सदस्यांचा अंतर्भाव असलेल्या चर्चापीठांची स्थापना करण्यात आलेली आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात देखील एड्स या रोगाला प्रभावीपणे आळा घालण्याच्या दृष्टीने या संदर्भात जागरुकता निर्माण करुन एक परिणामकारक कार्यक्रम आखण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र विधानमंडळात दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा समावेश असलेले एक चर्चापीठ (FORUM) दिनांक 29 जानेवारी, 2010 रोजी स्थापन करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या "एड्स"संबंधी विधानमंडळ सदस्यांचे चर्चापीठ (लेजिस्लेटर्स फोरम ऑन एड्स) याचा उद्‌घाटन सोहळा श्री.पवनकुमार बन्सल, मा.संसदीय कार्य व जलस्त्रोत मंत्री, भारत सरकार व श्री.ऑस्कर फर्नांडिस, संसद सदस्य तथा राष्ट्रीय निमंत्रक, संसदीय चर्चापीठ एड्स, मा.सभापती, मा.अध्यक्ष, मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, दोन्ही सभागृहाचे मा.विरोधी पक्षनेते व मा.मंत्री महोदय तसेच दोन्ही सभागृहाचे सन्माननीय सदस्य यांच्या उपस्थितीत सोमवार, दिनांक 19 जुलै, 2010 रोजी सकाळी 11.00 वाजता मध्यवर्ती सभागृह, 5 वा मजला, विधानभवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका सर्वांना पाठविण्यात आलेली आहे. तरी सर्व मान्यवरांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, अशी विनंती करण्यात येत आहे.

-------------------

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग या ऐतिहासिक किल्ल्याची झालेली दुरवस्था

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग या ऐतिहासिक किल्ल्याची झालेली दुरवस्था याबाबत श्री. राजन तेली, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. चंद्रकांत पाटील)** : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो :--

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग या ऐतिहासिक असलेल्या किल्ल्याची तटबंदी दि. 12.7.2010 रोजी वा त्यादरम्यान वरच्या बाजूने पूर्णपणे कोसळली असून शिल्लक राहिलेला काही भाग आज ना उद्या कोसळण्याच्या स्थितीत आहे. या महत्वाच्या व ऐतिहासिक विजयदुर्ग किल्ल्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यक आहे. त्याबाबत शासनाने उपाययोजना करावी अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी करीत आहे.

-------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शिरुर (जि.बीड) मधील 165 अंगणवाड्यांना इमारती व इतर सुविधा नसणे

**मु.शी.**: शिरुर (जि.बीड) मधील 165 अंगणवाड्यांना इमारती व इतर सुविधा नसणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते :--

महोदय, बीड जिल्ह्यातील शिरुर तालुका हा तालुक्यांची पुनर्रचना झाल्यापासून आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेला आहे. या तालुक्यात कार्यालये नसल्यापासूनचे अनेक प्रश्न आहेत. त्यात अत्यंत महत्वाचा प्रश्न असा आहे की, 65 अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती नाहीत. त्यामुळे मुलांना झ ाडाखाली तसेच उघडयावर बसवावे लागते. एकीकडे राईट-टू-एज्युकेशन देण्याचा आपण प्रयत्न करतो पण दुसरीकडे मात्र अशा प्रकारे उघड्यावर चालणाऱ्या अंगणवाड्या आपल्या राज्यात आहेत हे कॉन्ट्रॅडिक्शन आहे. यासंदर्भात तातडीने उपाययोजना करावी. तसेच 35 अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती उपलब्ध करुन द्याव्यात. त्याचबरोबर त्यात पिण्याच्या पाण्याची सोय आहे किंवा कसे याबाबतची पाहणी करुन अंगणवाडी इमारतीची, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्याची गरज आहे. याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व करण्यात येत असलेली कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया.

---------

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पालकमंत्र्यांनी तालुका पातळीवर समित्यांची नेमणूक करणे

**मु.शी.**: पालकमंत्र्यांनी तालुका पातळीवर समित्यांची नेमणूक करणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो :--

महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासनाच्या संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून लाभार्थी निवडण्यासाठी जिल्हा व तालुका समित्या अस्तित्वात होत्या. तालुका समित्यांवरील नियुक्त्या माननीय पालकमंत्र्यांनी न केल्यामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. परिणामी गरीब, विधवा, अपंग तसेच वृध्द लाभार्थ्यांना अनुदानापासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. याबाबत शासनाने तातडीने या समित्यांवर अध्यक्ष नियुक्त करण्याबाबत तातडीने निवेदन करावे, अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी करीत आहे.

------

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरणे

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाळ्यात विविध साथीचे आजार पसरत असताना जिल्ह्यातील ग्रामीण तथा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवकांची 47 पदे, प्रयोगशाळा तंत्रज्ञांची 38 पदे, क्लार्कची 5 तसेच जिल्हा हिवताप अधिकारी हे पद रिक्त असून आरोग्य संचालनालयाकडून दि. 5 जून, 2010 रोजी शासन निर्णय काढून एक वर्षाकरिता या भरतीला स्थगिती देण्यात आली आहे. या विभागात सध्या एकूण 97 पदे रिक्त आहेत. सध्या जिल्ह्यात विविध साथीचे आजार पसरले असता अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्याची गरज लक्षात घेऊन ही भरतीवरील स्थगिती रद्द करावी आणि तातडीने ही रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी करीत आहे.

-------

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: धर्मादाय रुग्णालयांवरील नियंत्रणासाठी आमदारांची समिती गठित करणे

**मु.शी.**: धर्मादाय रुग्णालयांवरील नियंत्रणासाठी आमदारांची समिती गठित करणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, राज्यात सुमारे 423 धर्मादाय रुग्णालये आहेत. त्यापैकी बऱ्याच रुग्णालयांमध्ये रुग्णसेवेत हेळसांड व व्यवस्थापनातील वारंवार तक्रारी येत आहेत. प्रशासनाच्या हस्तक्षेपामुळे अशा रुग्णालयांवर नियंत्रण राहत नाही. अशा धर्मादाय रुग्णालयावर नियंत्रणासाठी आमदारांची एक स्वतंत्र समिती गठित करण्यात यावी व याबाबत आवश्यकता वाटल्यास नवा कायदा करण्याचे आश्वासन माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी विधानसभेत घोषणा करुनही अमलबजावणी झालेली नाही. जे.जे. हॉस्पिटलच्या संदर्भात अशाच प्रकारची समिती गठित करण्यात आलेली आहे. तरी याबाबत त्वरित राज्यशासनाने धर्मादाय रुग्णालयावर नियंत्रण राहण्यासाठी आमदारांची एक स्वतंत्र समिती गठित करावी, अशी विनंती या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (विधि व न्याय मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित केली आहे त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, गेल्या अधिवेशनात आपण हे मान्य केले होते. त्याप्रमाणे तशी समिती गठित झालेली आहे. हे अधिकार शासनानेच दिलेले असल्यामुळे दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांची नावे घेण्याबाबत गट नेत्यांशी चर्चा करुन ती घ्यावी लागतील. अशा प्रकारे ही प्रक्रिया सुरु झालेली आहे, हे सभागृहाला या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

-------

(**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर**)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :विदर्भातील चंद्रपूर व भंडारा जिल्हयात चंडिपूरा रोगाचा प्रादुर्भाव होणे

**मु. शी.** :विदर्भातील चंद्रपूर व भंडारा जिल्हयात चंडिपूरा रोगाचा प्रादुर्भाव होणे याबाबत श्री.जैनुद्दीन जव्हेरी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"विदर्भातील चंद्रपूर व भंडारा जिल्हयात चंडिपूरा या भयंकर रोगाचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव होऊन आजपर्यंत जवळपास 20 बालकांचा मृत्यू होऊन अनेक बालकांना या रोगाची लागण झाली आहे. व ही लागण झालेल्या मुलांची प्रकृती अतिशय गंभीर आहे. यामुळे या दोन्ही जिल्हयात सर्वत्र चिंतेचे व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. सबब या भयंकर साथीच्या रोगाला त्वरित आळा घालण्याबाबत शासनाने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. अशा या अतिशय गंभीर व अति महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेख सूचना देत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावा ही विनंती.

सभापती महोदय, विदर्भात चंद्रपूर व भंडारा जिल्हयात चंडिपूरा या भयंकर रोगाचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव होऊन आजपर्यंत जवळपास 20 बालकांना या रोगाची लागण होऊन ते मृत्यूशी झुंज देत आहेत. या परिसरामध्ये या रोगामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. शासनाने या रोगाचे औषध या ठिकाणी उपलब्ध करुन द्यावे तसेच या ठिकाणी जे चिंतेचे आणि दहशतीचे वातावरण आहे ते दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी विनंती करीत आहे.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :मौजे कुटेरे बदिकोंड, ता. चिपळूण येथे जयगड पॉवर ट्रान्स लिमिटेड कंपनीने केलेल्या अतिउच्च दाबाच्या पारेषण वाहिन्याच्या कामामुळे शेतक-यांचे झालेले नुकसान

**मु. शी.** :मौजे कुटेरे बदिकोंड, ता. चिपळूण येथे जयगड पॉवर ट्रान्स लिमिटेड कंपनीने केलेल्या अतिउच्च दाबाच्या पारेषण वाहिन्याच्या कामामुळे शेतक-यांचे झालेले नुकसान याबाबत श्री.हुसेन दलवाई,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. हुसेन दलवाई ( विधानसभेन निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मौजे कुटेरे बदिकोंड, ता. चिपळूण येथे जयगड पॉवर ट्रान्स लिमिटेड या वीज कंपनीने जयगड ते कराड या अतिउच्च दाबाच्या पारेषण वाहिन्याचें काम सुरु केले आहे. सदर वाहिनी काही शेतक-यांच्या शेतातून जाते त्या भागात कंपनीकडून टॉवरचे बांधकाम करण्यासाठी तेथे खडक असल्याने खोदाई करतांना फार मोठया प्रमाणात खडक निघाला आहे व तो बाजूच्या शेतजमिनीत इतरत्र पसरला आहे. या संदर्भात उपविभागीय दंडधिकारी चिपळून यांचेकडे तक्रार केली असता त्यांचेकडून कंपनीला मेमो देण्यात येऊनही कंपनीकडून अरेरावीची भूमिका घेण्यात येत आहे. परिणामी येथील गरीब शेतक-यांच्या यदांच्या पीकास हानी पोहचत आहे व तसेच गुरांचा चाराही नष्ट झाला आहे व शेतक-यांवर उपासमारीची वेळ आली आहे. यास्तव शेतक-यांना संरक्षण मिळावे व त्यांच्या शेतात टाकलेला खडकाचा भाग त्वरित हटविण्याची गरज असल्यामुळे सदरहू या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या या पश्नाबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे ती स्वीकृत करावी, ही विनंती.

-----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : एचआयव्ही रुग्णांना एआरटी औषध मोफत मिळण्याबाबत
**मु.शी.** : एचआयव्ही रुग्णांना एआरटी औषध मोफत मिळण्याबाबत याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. चंद्रकांत पाटील, यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, एआरटी (एचआयव्ही एड्स विरोधी औषधोपचार ) ही एड्स रुग्णांचे आयुष्य वाढविणारी औषधोपचार पध्दती आहे. या औषधामुळे एड्स रुग्णांचे आयुष्य 20 वर्षाने वाढू शकते. हा औषधोपचार 3 टप्प्यात दिला जातो. पहिल्या टप्प्याचा औषधोपचार जेव्हा एखाद्या रुग्णाच्या बाबतीत निरुपयोगी ठरतो तेव्हा त्याला दुस-या टप्प्यावरील किंवा तिस-या टप्प्यावरील औषधोपचार दिला जातो. हा औषधोपचार खर्चिक असून पहिल्या टप्प्याला 2200, दुस-या टप्प्याला 5500 व तिस-या टप्प्याला 8000 रुपये खर्च येतो. पहिल्या टप्प्याचा खर्च मोफत दिला जातो. पुढच्या दोन टप्प्याचा खर्च जास्त असून सुध्दा तो मिळत नसल्यामुळे आता जी समाजामध्ये एड्स स्थिती आहे ती लक्षात घेऊन पुढील दोन्ही टप्प्याचा औषधोपचार मोफत मिळावा असा मी विशेष उल्लेखाद्वारे उल्लेख करीत आहे.

----

...4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :पंढरपूर येथील अन्नछत्र एकादशीच्या दिवशी सुरु ठेवण्याबाबत
**मु. शी.** :पंढरपूर येथील अन्नछत्र एकादशीच्या दिवशी सुरु ठेवण्याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य डॉ. नीलम गो-हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, 21 जुलै, 2010 रोजी आषाढी एकादशी आहे. त्यामुळे पंढरपूर येथे लाखो विठ्ठल भक्त पायी चालत चालत पंढरपूर येथे येत असतात. महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील वारकरी ज्या मार्गावरुन जातात त्या मार्गाचे चौपदरीकरण करण्याची आवश्यकता आहे. वारीच्या मार्गाचे चौपदरीकरण करण्याच्या वारंवार घोषणा झाल्या असल्या तरी देखील अतिशय अरुंद मार्गावरुन पालख्यांना प्रवास करावा लागत असतो.

सभापती महोदय, शासनाने पंढरपूर विकास आराखडा तयार केला परंतु या विकास आराखडयासाठी अजूनही निधी मिळालेली नाही. पंढरपूरला पोहचल्यावर चंद्रभागेच्या तिरी स्नान करण्याची प्रथा-परंपरा आहे परंतु या ठिकाणच्या घाट बांधणीला वेग मिळाला नाही. एमआयटी शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांनी याबाबत शासनाला सूचना केल्या होत्या.

तसेच देहू आणि आळंदी येथे आराखडयाच्या संदर्भात सूचना केल्या होत्या परंतु प्रत्यक्षात त्यास काहीही निधी प्राप्त झालेला नाही. महत्वाचा भाग असा आहे की, पंढरपूर येथे अन्नछत्र मंदिर समिती तर्फे चालू असते परंतु यात्रा कालावधीमध्ये बंद आहे. व अन्नछत्र यात्रा काळात सुरु राहिले पाहिजे. गोंदवलेकर महाराज असो किंवा अक्कलकोट येथील स्वामींच्या यात्रेच्या वेळेस अन्नछत्र सुरु असते. शिर्डीला गुरु पौर्णिमेच्या दिवशी अन्नछत्र बंद ठेवले तर चालणार नाही हे आपण मान्य कराल तशाच पध्दतीने पंढरपूर येथे एकादशीच्या वेळेस अन्न छत्र सुरु ठेवले गेले पाहिजे. आता आषाढी एकादशीला केवळ चार दिवस उरलेले आहेत त्यामुळे एकादशीच्या दिवशी अन्नछत्र सुरु करण्यासाठी शासनाने निर्णय घ्यावा. पंढरपूर येथील विठ्ठलाच्या मुर्तीची होत असलेली झीज हा देखील चिंतेचा विषय आहे त्यामुळे या विषयाबाबतही शासनाने लक्ष घालावे या बाबीकडे मी या विशेष उल्लेखा द्वारे लक्ष वेधत आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंबंधी मी असे सांगू इच्छितो की, 3 जिल्ह्यांचा प्रश्न होता. आपण पंढरपूर बरोबर आळंदी,भंडारा डोंगर यासंबंधी विकास आराखडा तयार आहे. आपण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. त्यासाठी संपूर्ण निधी वितरित करण्यात आलेला आहे. प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट नेमण्याची प्रक्रिया देखील आता झालेली आहे. आता प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्याचे पाऊल उचलले जात आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही सुरू झालेली आहे. येथे पंढरपूर येथील अन्नछत्र सुरू राहण्यासंबंधीचा मुद्दा देखील उपस्थित करण्यात आला आहे. ही सूचना अतिशय चांगली आहे. सदर सूचना तेथील संस्थानच्या व्यवस्थापनाला देण्याची आम्ही कार्यवाही करू. पंढरपूर संबंधी अन्य काही मुद्दे आहेत. आता विकास आराखडा तयार करण्यात आला असून पंढरपूरसाठी स्वतंत्र प्राधिकरण तयार करण्यात आले असून स्वतंत्रपणे तीर्थक्षेत्राचा विकास करण्याची कार्यवाही सुरू आहे.

..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींवर होणाऱ्या हल्ल्यांना प्रतिबंध करण्यासाठी कायदा करणे

**मु. शी.** : प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींवर होणाऱ्या हल्ल्यांना प्रतिबंध करण्यासाठी कायदा करणे याबाबत श्री.किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□□य सदस्य श्री.किरण पावसकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

हा विशेष उल्लेख पत्रकारासंबंधी आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनासंबंधी देखील आहे. कुर्ला पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुली बेपत्ता होत होत्या. त्यांच्या हत्या होत होत्या. त्यासाठी प्रेस फोटोग्राफर तेथे गेले होते. त्यावेळी त्यांनी जी काही वागणूक मिळाली ती अतिशय निंदनीय होती. गेल्या पाच वर्षात पत्रकार, वृत्तपत्र वाहिन्या, कार्यालय आणि वैयक्तिक असे जवळ जवळ 145 हल्ले करण्यात आले आहेत. त्यापैकी 109 हे दखलपात्र गुन्हे आहेत, तर 36 हे अदखलपात्र गुन्हे आहेत. हिवाळी अधिवेशनामध्ये सर्व पत्रकारांनी माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. तेव्हा त्यांना आश्वासन दिले होते की, डॉक्टरांवर व त्यांच्या क्लिनिकवर झालेल्या हल्ल्यासंबंधी शासन करण्यासाठी कायदा बनविण्यात आला तसा पत्रकार हल्ला प्रतिबंधात्मक अजामीनपात्र कायदा आणून त्याची अंमलबजावणी करू. पण माननीय मुख्यमंत्र्यांकडून फक्त आश्वासन मिळाले. पण त्याची अंमलबजावणी झालेली नाही. पत्रकारांवरील हल्ले ह्या महत्त्वपूर्ण घटना असून त्यात सातत्याने वाढ होत आहे. डॉक्टरांवरील हल्ले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

रोखण्यासाठी शासनाने कार्यवाही करून कायद्याची अंमलबजावणी केली. मात्र, पत्रकारांच्या बाबतीत आजही आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. बाहेरील व्यक्तींकडूनच नव्हे तर पोलिसांकडून देखील कॅमेरा हिसकावून घेण्याचे प्रकार होतात. एवढेच नव्हे तर त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते. त्यासंदर्भात मी शासनाचे लक्ष वेधित आहे. यासंबंधी शासनाने कार्यवाही करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



BGO/ KGS/ KTG/ SBT/ MMP/ श्री.जुन्नरे... 14:25

**पृ. शी.** : धर्मादाय आयुक्त कार्यालयात प्रलंबित असलेली प्रकरणे

**मु. शी.**: धर्मादाय आयुक्त कार्यालयात प्रलंबित असलेली प्रकरणे
याबाबत श्री.विक्रम काळे वि. प. स. यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग-शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सामाजिक न्यास कार्यालय आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांची कार्यालये आहेत. त्यांच्या मार्फत सामाजिक संस्थांची नोंदणी केली जाते. त्यांच्यामध्ये काही वाद निर्माण झाले तर ते वाद निकाली काढण्याची कारवाई धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या मार्फत होते. या खात्याचे मंत्रिमहोदय आता सभागृहात उपस्थित आहेत. ते पूर्वी शिक्षण मंत्री होते. त्यांना सगळा अनुभव आहे. शिक्षण संस्थांमध्ये काही वाद निर्माण झाले किंवा निवडणूक झाली व त्यांनी त्यांचा चेंज रिपोर्ट दाखल केला तर तो 4-4, 5-5 वर्षे सुद्धा निकाली लागत नाही. दुसऱ्या बॉडीने अर्ज दिला तर त्यामध्ये देखील लवकर निर्णय होत नाही. याची झळ संबंधित संस्थेतील शिक्षकांना आणि कर्मचाऱ्यांना बसते. म्हणून मी येथे अशी मागणी करतो की, यापूर्वीसुद्धा या प्रश्नासंबंधी या सभागृहात चर्चा झाली होती. त्यास सन्माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उत्तर दिले होते की, आम्ही सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन जलद गतीने प्रकरणे मार्गी लावण्यासाठी जरूर ती कार्यवाही करू. हे पद न्यायाधीशांच्या दर्जाचे असून त्यात कुणालाही हस्तक्षेप करता येत नाही. मी माहिती घेतल्यानंतर मला असे कळले की, अपुऱ्या कर्मचारीवृंदामुळे असे होत आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.अजित.....

श्री.विक्रम काळे...

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये हा प्रश्न निर्माण झालेला आहे त्यामुळे या संदर्भात शासनाने गांभीर्याने निर्णय घेऊन अशी प्रकरणे जलद गतीने मार्गी लागतील यादृष्टीने कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखद्वारे विनंती करीत आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये चॅरिटेबल ट्रस्ट आणि शिक्षण संस्थांच्या संदर्भातील चेंज रिपोर्टबाबत लवकर निर्णय होत नाही या बाबत वारंवार तक्रारी येत आहेत. या संदर्भात सरकारने धर्मादाय आयुक्तांना विभागीय स्तरावर कॅम्प घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. दोन-दोन वर्षे चेंज रिपोर्ट मान्य होत नाही. त्यामुळे संस्थांच्या स्तरावरील आर्थिक गैरव्यवहार वाढले आहेत अशाही तक्रारी प्राप्त होत आहेत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, धर्मादाय आयुक्तांना प्रो-ॲक्टीव्ह होऊन काम करावे अशाप्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. तेव्हा दोन-तीन महिन्यात निश्चित सुधारणा झाल्याचे दिसून येईल.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वांद्रे येथील शासकीय वसाहतील अधिकारी कर्मचाऱ्यांना माफक दरात मालकी हक्काने घरे मिळणे

**मु. शी.** : वांद्रे येथील शासकीय वसाहतील अधिकारी कर्मचाऱ्यांना माफक दरात मालकी हक्काची घरे मिळणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.परशुराम उपरकर )**: माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाद्वारे शासकीय निवासस्थानातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या व्यथा येथे मांडत आहे.

मुंबईतील वांद्रे पूर्व शासकीय वसाहतीत राहणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना सदर वसाहतीचा पुनर्विकास करुन माफक दरात मालकी हक्काने घरे मिळावीत किंवा या वसाहतीमधील भूखंडापैकी एक भूखंड मिळावा या मागणीसाठी अधिकारी कर्मचारी यांनी यापूर्वी वारंवार निवेदन देवून मार्चे, धरणे, उपोषण इत्यादी मार्गाने आंदोलने करुन शासनाचे लक्ष वेधले आहे. भारतीय घटनेने सर्व नागरिकांना निवाऱ्याचा हक्क दिलेला आहे परंतु समाजातील ह्या घटकांना मात्र हा हक्क रास्त मागणी असूनही अद्यापही दिलेला नाही. शासनाची 30-35 वर्षे इमानेइतबारे सेवा करुन निवृत्तीनंतर रस्त्यांवर येऊन त्यांना बेघर व्हावे लागते. यापूर्वी विधानपरिषदेमध्ये हा प्रश्न उपस्थित करण्यात येऊन या विषयावर सभागृहाचे कामकाज तीनवेळा तहकूब देखील करण्यात आले होते. मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर परप्रांतियांचे लोंढे येत असून ते अनधिकृतपणे झोपड्या बांधून राहत आहेत. शासन त्यांना मोफत घरे देत आहे. अगदी 15 दिवसांपूर्वी बांधलेल्या झोपड्या विकासामध्ये येतात म्हणून एम.एम.आर.डी.ए.मार्फत त्यांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. परंतु ज्यांनी शासनाची 30-35 वर्षे इमानीइतबारे सेवा केली त्यांना मात्र शासन घर उपलब्ध करुन देत नाही. शासकीय निवासस्थानाच्या बाजूला असलेला भूखंड न्यायाधीशांना दिलेला आहे. शिवाय तेथील सरकारी जमिनीवर असलेल्या अनधिकृत झोपड्यांना शासनाने एसआरए योजनेंतर्गत मोफत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

घरे बांधून दिलेली आहेत. शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांची मोफत घरांची मागणी नाही तर ज्या विकासकाला हा भूखंड विकसित करायला दिलेला आहे त्यास 0.4 एफ.एस.आय.वाढवून दिल्यास शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना घरे मिळू शकतील. आपण विकासकाला जो मूळ नियम लावलेला आहे त्यामध्ये कोणताही फरक पडणार नाही. तेव्हा हक्क म्हणून नव्हे तर सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी विनंती आहे. हे सर्व अधिकारी कर्मचारी महाराष्ट्राचे मूळ रहिवाशी आहेत. महाराष्ट्रात परप्रांतियांना घरांची बेगमी होत असताना आपल्या मातीतील लोकांवर बेघर होण्याची परिस्थिती येऊ नये याचा विचार करावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 2.34 ते 3.00 मध्यंतर )

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरा नंतर**

**(सभापती स्थानी माननीय उपसभापती)**

**<u>अशासकीय कामकाज - विधेयके</u>**

**उपसभापती** : आता अशासकीय विधेयके घेण्यात येतील. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेले वि.प.वि.क्र. 2 थोडया वेळा नंतर घेण्यात यावे अशी विनंती करणारे पत्र माननीय मत्रिमहोदयांनी पाठविले असल्यामुळे ते विधेयक नंतर घेण्यात येईल आणि आता वि.प.वि.क्रं 4 प्रथम चर्चेला घेण्यात येईल.

पृ.शी. : खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक 2009

L.C. BILL NO. IV OF 2009.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977.)

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 4 - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) विनियमन,अधिनियम, 1977 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय,महाराष्ट्रामध्ये ज्या शाळा सुरु आहेत त्यामध्ये राज्य सरकारने परवानगी दिलेल्या शाळा आणि परवानगी न दिलेल्या परंतु राज्य सरकारने ना हरकत प्रमाणपत्र घेऊन सुरु झालेल्या शाळा आहेत. या राज्यातील खाजगी शाळा मग त्या अनुदानित असो अथवा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

विनाअनुदानित असो त्या सर्व शाळांवर नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम 1977 सभागृहाने मंजूर केला होता व त्या अनुषंगाने 1981 मध्ये नियमावली सुध्दा तयार करण्यात आली होती.अशा प्रकारे 1977 सालचा कायदा राज्यातील प्राथमिक शाळांना व माध्यमिक शाळांना, उच्च माध्यमिक शाळांना लागू करण्यात आला आहे त्या कायद्यातील सर्व तरतुदींची अंमलबजावणी करणे हे त्या संस्था चालकांवर व सबंधितावर बंधनकारक करण्यासबंधीचा प्रश्न सातत्याने शासनासमोर आणि आपल्यासमोर निर्माण होत आहे. न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात त्यासबंधीची प्रकरणे गेलेली आहेत. आय.सी.एस.ई., सी.बी.एस.ई., आय.जी.सी.एस.ई आणि आय.बी.इत्यादी केन्द्रीय बोर्डाच्या शाळांना राज्य सरकारने परवानगी दिली नाही परंतु राज्यामध्ये या शाळा सुरु करण्यासाठी त्यांना ना हरकत प्रमाणपत्र दिले आहेत . त्यानुसार या राज्यामधील सर्व शाळा सुरु आहेत. सभापती महोदय, 1977 च्या कायद्यातील कलम 8,20 आणि 21 ......................

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

यामध्ये खाजगी शाळा म्हणजे काय? मान्यताप्राप्त शाळा म्हणजे काय? विद्यमान खाजगी शाळा म्हणजे काय? याची व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये ज्या शाळांना राज्य सरकारने परवानगी दिली आहे किंवा ज्या शाळा राज्य शालांत परिक्षा मंडळाशी जोडलेल्या आहेत किंवा त्यांना परवानगी दिलेली आहे अशा शाळांना कायद्यातील संबंधित कलम लागू होते किंवा हा कायदा लागू होतो. परिणामत: या केंद्रीय मंडळाला जोडलेल्या शाळांना हा कायदा लागू होत नसल्यामुळे राज्य सरकारचे या शाळांवर, त्यांच्या संपूर्ण कारभारावर, त्यांच्या प्रशासन यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. आपण याबाबत विचार केला तर या शाळांतील शिक्षकांच्या सेवा-शतीच्या संदर्भात काही नियम असतील, किंवा या शाळांच्या फीच्या संदर्भात विषय असेल किंवा या शाळांचा अभ्यासक्रम असेल, त्यांची परिक्षा पध्दत असेल, मूल्यांकन पध्दत असेल, भाषा सूत्र असेल त्या संदर्भात केंद्रीय मंडळाला जोडलेल्या शाळा आणि राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शाळांमध्ये प्रचंड तफावत आहे. यामुळे अशाप्रकारची समस्या निर्माण होत आहे, अडचण निर्माण होत आहे, संघर्ष निर्माण होत आहे.

याबाबतीत मला एकच उपाय सुचवावासा वाटतो की, या राज्यामध्ये शिक्षक आणि शिक्षणासंदर्भात काही कायदे मंजूर केले आहेत ते कायदे या राज्यातील शाळांना लागू आहेत. त्या कायद्याच्या कक्षेत केंद्रीय मंडळाच्या शाळांना आणणे अत्यंत गरजेचे आहे. या संदर्भात सातत्याने या सभागृहामध्ये चर्चा करण्यात येऊन या शाळांना कायद्याच्या कक्षेमध्ये आणण्याची अनेक माननीय सदस्यांनी विनंती केली आहे. आणि तशाप्रकारचा कायदा करण्याचे आश्वासन सुध्दा संबंधित मंत्रिमहोदयांकडून आम्हाला मिळाले आहे. परंतु त्याबाबत फक्त आश्वासन मिळाले आहे. परंतु केंद्रीय मंडळाला जोडलेल्या या शाळांकडून राज्य सरकारला सर्वोच्च न्यायालयामध्ये खेचण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुध्दा या शासनाने त्यांच्या संदर्भात कोणताही कायदा केला नाही, किंवा या शाळांना राज्याच्या कायद्याच्या कक्षेमध्ये आणले नाही. म्हणून या शाळांना कायद्याच्या कक्षेमध्ये आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे. याबाबत आपण थोडासा विचार केला तर आपल्या राज्याचा कायदा लागू असलेल्या शाळामधील शिक्षकांचे वेतन, त्यांची शैक्षणिक पात्रता, त्यांचे कामाचे तास यापैकी कोणतेही नियम या शिक्षकांना लागू नाहीत. त्यामुळे केंद्रीय मंडळाला जोडलेल्या या शाळा

DGS/ SBT/ KTG/

श्री. रामनाथ मोते....

फार मोठया प्रमाणावर पालकांकडून फी घेत असतात. शासकीय नियमाप्रमाणे आपल्या शिक्षकांना जे वेतन मिळते त्या पध्दतीने त्यांना वेतन दिले जात नाही. त्यासाठी कायद्यामध्ये कोणतीही तरतूद नसल्यामुळे त्यांना हा कायदा लागू होत नाही. त्यामुळे त्या शिक्षकांच्या सेवा-शर्ती व वेतनामध्ये तफावत आहे. एवढेच नव्हेतर राज्य सरकारने घेतलेले निर्णय असतील, राज्य सरकारने काढलेले परिपत्रक असेल, शासनाने जी.आर. काढला असेल तर त्याचे पालन करणे 1977 च्या कायद्यानुसार या राज्यातील शाळांना बंधनकारक आहे. परंतु हे जी.आर. किंवा शासन निर्णय केंद्रीय मंडळांना जोडलेल्या शाळांना बंधनकारक नाहीत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांची या शाळांकडून फार मोठया प्रमाणावर हॅरॅसमेंट, छळ होतो. या संदर्भात याठिकाणी अनेक उदाहरणे सांगता येतील. आपण या राज्याची परंपरा, सांस्कृतिक वारसा जपला आहे. हा सांस्कृतिक वारसा जपत असतांना केंद्रीय मंडळांना जोडलेल्या शाळांमध्ये मराठी भाषिक विद्यार्थी, शिक्षक असतील त्यांची संस्कृती व परंपरा जपण्यासाठी फार मोठी बंधने त्यांच्यावर लादली जातात. कपाळावर टिकली लावण्याची आपली परंपरा आहे. परंतु या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना टिकली लावण्यास मनाई आहे, कानामध्ये ईअरींग घालण्यास, वेणी घालण्यास परवानगी नाही, त्यांना हातामध्ये बांगडया घालण्यासाठी परवानगी नाही. अशाप्रकारच्या गोष्टी क्षुल्लक वाटत असल्या तरी अत्यंत महत्वाच्या सांस्कृतिक परंपराचे पालन करण्यास त्यांना मनाई आहे. अशाप्रकारे विद्यार्थी व पालकांना त्या शाळांकडून अन्यायकारक वागणूक मिळत आहे. या शाळांवर शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे आपल्या मर्जीप्रमाणे, आपल्या मनाप्रमाणे किंवा आपल्या मस्तीप्रमाणे वागण्याची या शाळांची हिंमत होत आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

त्यांच्या मनाप्रमाणे, त्यांच्या मर्जीप्रमाणे त्यांच्या मस्तीमध्ये त्यांना वागता येते कारण त्यांच्यावर राज्य शासनाचे नियंत्रण नाही. या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. दिनांक 25 जुलै,2008 ला या शाळांच्या प्रशासनाच्या संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी या सदनामध्ये भावना व्यक्त केली की, या शाळा शासनाचे नियम पाळत नाहीत. या शाळांमध्ये राष्ट्रगीत म्हटले जात नाही. या शाळांमध्ये वंदे मातरम् म्हटले जात नाही. त्यांना हे बंधनकारक करण्यात येईल. त्यांनी राष्ट्रगीत म्हटले पाहिजे. त्यांनी वंदे मातरम् म्हटले पाहिजे. त्यांनी 15 ऑगस्ट साजरा केला पाहिजे. 26 जानेवारी साजरी केली पाहिजे. पण खरेच हे राष्ट्रीय सण या शाळांमध्ये साजरे होतात काय? माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबतची माहिती घेतली तर त्यांना याचे उत्तर नकारात्मक मिळेल. त्या ठिकाणी अशा प्रकारचे कोणतेही राष्ट्रीय सण साजरे केले जात नाहीत. वंदे मातरम् म्हटले जात नाही. जनगणमन म्हटले जात नाही. त्यावेळचे शिक्षण मंत्री माननीय श्री.पुरके यांनी याठिकाणी आश्वासन दिले होते की, शासन यासंदर्भात त्यांच्यावर बंधन टाकील तसेच यासंदर्भात त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. हे रेकॉर्डवर आलेले आहे. पण त्यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. कोणत्याही प्रकारचे बंधन त्यांच्यावर टाकले नाही. या शाळा शासनाच्या कोणत्याही पत्राला जुमानत नाहीत. कारण राज्य शासन या शाळांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण टाकू शकणार नाही अशी त्यांची भावना आहे.

सभापती महोदय, शाळांच्या सुट्टयांच्या बाबतीत माध्यमिक शाळा संहितेमधील नियम क्रमांक 53(2) मध्ये राज्य शासनाने ज्या सुट्टया जाहीर केलेल्या आहेत त्या सुट्टया घेणे सर्व संस्थांना आणि सर्व शाळांना बंधनकारक आहे. या नियमानुसार शाळांना 76 सुट्टया घेण्याची परवानगी आहे. दिवाळीची सुट्टी आणि उन्हाळयाची सुट्टी सोडून राज्य शासनाने ज्या दिवशी सार्वजनिक सुट्टया जाहीर केलेल्या आहेत त्या सगळया सुट्टया या शाळांनी घेणे बंधनकारक असताना या शाळांमध्ये राम नवमीची, शिवजयंतीची, गांधी जयंतीची सुट्टी मिळत नाही. यांचा गांधी जयंतीशी काही संबंध नाही. राम नवमीशी काही संबंध नाही. शिवजयंतीशी काही संबंध नाही. यांना शिवजयंती माहीत नाही. ज्या शासकीय सुट्टया आहेत. ज्या राज्यातील सर्वांनी घेणे बंधनकारक आहे. ज्या दिवशी राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना सुट्टी असते. सर्व शाळांना सुट्टी असते. पण केंद्रीय बोर्डाच्या शाळा

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

मात्र सुरु असतात. त्यांना गौरी गणपतीची सुट्टी मिळत नाही. त्यांना गणेश चतुर्थीची सुट्टी मिळत नाही. त्यांच्या एकूणच प्रशासनामध्ये त्यांना अशी मस्ती आहे की, आमच्यावर कोणाचा कंट्रोल नाही. आम्ही तुमची परवानगी घेतलेली नाही. तुमचा आमचा काही संबध नाही म्हणून या सर्व शाळा....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटभ्ल (बसून) : याचा अर्थ 15 ऑगस्ट आणि 26 जानवारी हे राष्ट्रीय सण सोडले तर बाकीच्या दिवशी कामकाज सुरु ठेवायला पाहिजे.

श्री. रामनाथ मोत :याबाबत सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. हे वर्किंग डे ठेवा. आम्ही सुट्टी द्या असे म्हणत नाही. आम्ही सुट्टी द्या यासाठी म्हणतो की, सुट्टी असली तरी विद्यार्थी आणि शिक्षक शाळेमध्ये येतात आणि ते सण साजरे केले जातात. सभापती महोदय, माझ्या म्हणण्याचा उद्देश असा आहे की, हे राष्ट्रीय सण राज्यातील अन्य शाळांमध्ये साजरे होतात पण सीबीएसईच्या शाळेमध्ये हे सण साजरे होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मागच्या वेळी सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, आम्ही त्यांना मराठी शिकविण्याचे बंधन घालू. आंध्र प्रदेशमध्ये त्या ठिकाणची मातृभाषा शिकविली जाते. अन्य राज्यांमध्ये त्यांची मातृभाषा शिकविली जाते. जरी या केंद्रीय शाळा असल्या तरी सुध्दा ज्या राज्यामध्ये ती शाळा सुरु असेल मग त्या राज्याची जी काही मातृभाषा असेल ती भाषा भाषासूत्रामध्ये घेतली जाते. महाराष्ट्रामध्ये केंद्रीय बोर्डाच्या शाळांमध्ये मराठी भाषा भाषासूत्रमध्ये कां घेतली जात नाही. हे आम्ही निदर्शनास आणून दिले तेव्हा आम्ही ती सक्ती करुन त्यांना मराठी हा विषय घ्यावयास लावू अशा प्रकारची चर्चा झाली होती. इयत्ता अकरावी आणि बारावीच्या प्रवेशाचा प्रश्न निर्माण होतो. सात-आठ हजार विद्यार्थ्यासाठी आमचे लाखो विद्यार्थी वेठीस धरले जातात म्हणून हा विषय या ठिकाणी चर्चेला आला होता. इयत्ता अकरावी आणि बारावीचे वर्ग या शाळांनी सुरु करावेत त्यांच्या स्वतंत्र उच्च माध्यमिक शाळा सुरु व्हाव्यात अशा प्रकारचे बंधन त्यांच्यावर टाकू अशा प्रकारचीही चर्चा झाली. पण कोणत्याही केंद्रीय बोर्डाच्या शाळांनी केंद्रीय बोर्डाशी सलग्न सीबीएसई किंवा आयसीएसई शाळांनी उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु केलेले नाहीत. त्यांच्याकडे संच मान्यता नाही. वैयक्तिक मान्यता नाही. वेतन श्रेणी,सेवा शर्ती, परीक्षा पध्दती, अभ्यास क्रम याबाबतीतील शासनाची

..3..



SMT/ KTG/ SBT/ 15:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

कोणतीही बंधने या शाळां घेत नाहीत. सभापती महोदय, या शाळांची अशी मनसीकता निर्माण झालेली आहे की, राज्य शासनाने आम्हाला परवानगी दिलेली नाही त्यामुळे राज्य शासनाचा कायदा, राज्य शासनाचे आदेश, राज्य शासनाचे नियम, राज्य शासनाचे परिपत्रके यांचे पालन करणे, त्यांची अंमलबजावणी करणे आमच्यावर बंधनकारक नाही. सभापती महोदय, ही अत्यंत गभीर बाब मी या निमित्ताने सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

सभापती महोदय, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये आणि शाळांच्या कार्यालयामध्ये कोणत्या महापुरुषांचे फोटो लावणे आवश्यक आहे याबाबत शासनाची परिपत्रके आहेत. यासंदर्भात 24 जानेवारी, 1961 चे परिपत्रक आहे. यासंदर्भात 25 जुलै, 1985 चे परिपत्रक आहे. अशा प्रकारचे 6-7 आदेश आहेत. माननीय राष्ट्रपती, माननीय माजी राष्ट्रपती या सगळ्यांचे फोटो लावणे बंधनकारक आहे. आपण सीबीएसईच्या, केंद्रीय बोर्डाच्या शाळेमध्ये गेलात तर त्या शाळेमधील कार्यालयात एकाही महापुरुषाचा फोटो लावलेला दिसणार नाही. कारण त्यांचा दृष्टीकोन असा आहे की, ते आमच्यावर बंधनकारक नाही.

सभापती महोदय, अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत परंतु खऱ्या अर्थाने या शाळांना आपल्या कार्यकक्षेमध्ये आणण्याच्या संदर्भात आज अशी परिस्थिती आहे की, आपण फक्त बोलतो. या सभागृहामध्ये घोषणा होऊनही आपण त्याची अंमलबजावणी करु शकत नाही. त्याचे मूळ कारण असे आहे की, आपला 1977 चा जो कायदा आहे त्यामध्ये मान्यताप्राप्त शाळेची जी व्याख्या दिलेली आहे त्यामध्ये त्या शाळा बसत नाहीत. त्यामुळे त्या शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, त्या शाळांना ठिकाणावर आणण्यासाठी, त्या शाळांच्या प्रशासनावर खऱ्या अर्थाने आपला वचक निर्माण करण्यासाठी या कायद्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. या अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून मला या विषयावर बोलण्याची संधी मिळाली. या विधेयकावर अन्य सन्माननीय सदस्यही बोलतील आणि त्यानंतर माननीय मंत्रिमहोदय छा-छू उत्तर देतील आणि सांगतील की आम्ही प्रयत्न करतो, आपण हे विधेयक मागे घ्यावे. मी हे विधेयक मागे घेणार नाही. कारण त्या कायद्यामध्ये हा बदल होणे आवश्यक आहे. या ठिकाणी अनेक वेळा शासनाकडून आश्वासने मिळाली की, आम्ही हे करु. ते करण्याबाबत आम्हाला ठोस आश्वासन द्यावे आणि ते करावे. ते करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी मला या अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून हा विषय सभागृहासमोर आणावा लागला. या अशासकीय विधेयकामध्ये ज्या दुरुस्त्या सुचविलेल्या आहेत त्या या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक आदरणीय सदस्य श्री. रामनाथ मोते सर यांनी सभागृहासमोर मांडले आहे. त्यांनी या अतिशय महत्वाच्या विषयाच्या संदर्भात हे अशासकीय विधेयक मांडलेले आहे. या विधिमंडळामध्ये अनेक वेळा यासंबंधी चर्चा झालेली आहे. अनेक वेळा शासनातर्फे उत्तर देण्यात आले आहे परंतु प्रत्यक्षात असे बघावयास मिळते की, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फरक पडलेला नाही. या बिलाच्या उद्देश व कारणामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या एस.एस.सी. बोर्डाच्या मुलांना एक न्याय आणि अन्य बोर्डाच्या मुलांना दुसरा न्याय मिळतो. केंद्रीय बोर्डाच्या शाळा का आल्या ? देशातील निरनिराळ्या राज्यांमध्ये केंद्राचे जे कर्मचारी इकडून तिकडे जातात त्यांच्या मुलांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून अशा प्रकारच्या शाळा सुरु झाल्या. आज या शाळा मोठ्या प्रमाणावर सुरु झालेल्या आहेत. या शाळा आता जरी मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे या महत्वाच्या शहरांमध्ये दिसत असल्या तरी या शाळा तालुक्याच्या ठिकाणांपर्यंत जाण्यास वेळ लागणार नाही. आज देखील कोकणामध्ये केंद्रीय बोर्डाच्या शाळा सुरु झालेल्या आहेत. त्यांची संख्या वाढण्यास वेळ लागणार नाही. आज आपण जरी म्हणत असलो की, महाराष्ट्राच्या एस.एस.सी. बोर्डाचे 16 लाख विद्यार्थी आहेत तरी ती संख्या निम्मी निम्मी होण्यास जास्त वेळ लागणार नाही अशी स्थिती या ठिकाणी निर्माण झालेली नाही. या शाळांची मस्ती फार आहे. मी सर्वच शाळांच्या बाबतीत म्हणत नाही. या शाळांमध्ये मुख्याध्यापक नसतात तर सी.ई.ओ. असतात. त्यांना भेटावे लागते. या शाळांमधील व्यवस्थापन असेल किंवा सी.ई.ओ. असतील त्यांची एवढी मस्ती असते की, ते शिक्षण अधिकाऱ्याच्या चिठ्ठीला, त्यांच्या पत्राला जुमानत नाहीत. त्या पत्रांना ते केराची टोपली दाखवितात. शिक्षण अधिकारी त्या शाळेत गेले तर त्यांनाही ते प्रवेश देत नाहीत अशा या शाळा माजोरी झालेल्या आहेत. त्या संस्था बेमुर्वतपणे शाळा चालविताना दिसतात. आमच्याच जमिनीवर, आमच्याच शहरामध्ये, आमच्याच गावामध्ये या शाळा चालू आहेत आणि आमच्या डोक्यावर बसत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

आम्ही विचार करतो की, ही मुले आपली आहेत. त्या शाळेतील आणि या शाळेतील मुलेही आपली आहेत. परंतु डबल स्टॅण्डर्ड हटवावयाचे असेल तर यादृष्टीने हे महत्वाचे विधेयक आहे. त्यांना या नियमावलीमध्ये आणले पाहिजे. आमच्यावर जी नियमावली लादली आहे ती त्यांना सुध्दा लागू केली पाहिजे. राज्य सरकारने एनओसी दिल्यानंतर त्यांच्यावर कोणतेही बंधन रहात नाही. सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा मी देखील यापूर्वी मांडला होता. केंद्रीय पाठ्य पुस्तकांचा विषय देखील उपस्थित केला होता. या पाठ्यपुस्तकांमधून या राज्यातील महापुरुषांचा अपमान होत असेल तर या शाळा कशासाठी पाहिजेत ? या राज्यातील मातीच्या गुणाबाबत आणि या राष्ट्र पुरुषांच्या शिकवणीचे त्यांच्या पाठ्यपुस्तकातून अवमूल्यन होत असेल तर शासनाने त्याच्यावर बंदी आणली पाहिजे. शासनाने एकदा एनओसी दिल्यानंतर शासन काही करु शकत नाही. शासनाने दिलेल्या चिठ्ठीला केराची टोपली दाखवितात. माझ्या मुलीला सुध्दा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळाला होता. परंतु मी तेथून नाव काढून मराठी माध्यमाच्या शाळेत दाखल केले होते. त्यामुळे तिचे काही अडले नाही. आज ती पीएच.डी करीत आहे. या मंडळांच्या शाळेत जी मुले जातात त्यांच्यावर अनेक बंधने असतात. मुलींनी टिकली लावावयाची नाही, वेणी घालावयाची नाही. म्हणजे आपले जे संस्कार आहेत त्याला पोषक वातावरण तेथे नसेल तर त्याच्यावर बंधन घालण्याचे काम शासनाच्या माध्यमातून झाले पाहिजे. आपले राष्ट्रीय सण असतील, उत्सव असतील ते साजरे केले जात नाही. राष्ट्रगीत म्हटले जात नाही. 15 ऑगस्ट व 26 जानेवारी हे राष्ट्रीय सण साजरे केले जात नाहीत. तेथील विद्यार्थ्यांवर अनेक बंधने असतात. या मुलांची मान त्यांच्या हातामध्ये असल्यामुळे मुलांना त्यांचे नियम पाळावे लागतात. तेथील कर्मचारी, शिक्षक यांच्या सेवा शर्तीचाही विषय आहे. या शाळा मोठया प्रमाणावर फी आकारतात त्याच्यावर कोणतेही बंधन नाही. मोठया प्रमाणावर डोनेशन घेतात. त्यासाठी बंधन नाही. त्यांच्याकडून सर्व प्रकारे अवमान होत असेल तर त्यांच्यावर बंधन आणले पाहिजे. त्यांना नियमावलीमध्ये आणले पाहिजे. शिक्षण खात्याला अधिकार असावयास पाहिजे. या शाळा शासनाच्या नियमांचे पालन करीत नाहीत त्यामुळे त्यांच्यावर योग्य पध्दतीचे निलंबन करण्याचा अधिकार असावयास पाहिजे. ते नियमांचे

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

उल्लंघन करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याचा अधिकार असावयास पाहिजे. आतापर्यंत एकाही शाळेवर कारवाई केल्याचे दिसत नाही. म्हणून एका तरी शाळेवर कठोर कारवाई केल्याशिवाय हे थांबणार नाही. आम्ही दरवर्षी पाठ्यपुस्तकातील उदाहरणे देत असतो. शिवाजी महाराजांवरील धडा 4 ओळीचा असतो आणि मुघलांचा धडा मात्र 400 ओळींचा असतो. अशाप्रकारे आपल्या राष्ट्र पुरुषांचा अवमान होत असल्यामुळे आम्ही या धडयांची पाने सभागृहात दाखविलेली आहेत. त्यासाठी त्यांच्यावर कोणतेही बंधन येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अधिनियमात सुधारणा करण्याची आवश्यकता या विधेयकात व्यक्त केलेली आहे. या विधेयकाला मी पाठिंबा देतो आणि माझे भाषण संपवितो.

------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी महाराष्ट्र राज्यात, राज्य शासनाच्या परवानगीने अनेक खाजगी शाळा तसेच ICSE, CBSE, IGCSE व IB या मंडळांच्या शाळा सुरु आहेत. सुदैवाने सभागृहात माजी शिक्षण मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे उपस्थित आहेत. माजी शिक्षण मंत्री श्री.वसंत पुरके यांनी माझ्या प्रश्नाला जे उत्तर दिले होते ते माझ्यासमोर आहे. ते उत्तर मी मुद्दाम वाचून दाखवितो. त्यांनी त्यावेळी असे म्हटले होते की, ICSE, CBSE, IGCSE व IB या मंडळांनी स्वतंत्र अकरावी व बारावीचे वर्ग सुरु केले नाही तर त्या संस्थांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही. ते पुढे असेही म्हणाले होते की, सन्माननीय सदस्यांनी माझे थोडेसे ऐकून घेतले पाहिजे. "मी ICSE, CBSE, IGCSE व IB या मंडळांच्या शाळांना स्वतंत्र पॅरामीटर लावणार आहे. त्या लोकांना आम्ही एनओसी देतो, ते जर ॲण्टी नॅशनल ॲक्टीव्हीटीज राबवित असतील, शाळेत वंदे मातरम् म्हणत नसतील तर त्यांच्यावर मी कारवाई केल्याशिवाय राहणार नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:25

(डॉ. दीपक सावंत...

प्रश्न असा आहे की, आयसीएसई, सीबीएसईमध्ये समतेचे तत्व येण्यासाठी जे काही करणे आवश्यक आहे ते निश्चितपणे केल्या शिवाय राहाणार नाही." माननीय मंत्री महोदय पुढे असे म्हणतात की, "15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी या दोन दिवशी झेंडा वंदन आणि राष्ट्रगीत होईल. या पत्रातील संदिग्धता पुढे आहे. राज्यातील आयसीएसई, आणि सीबीएसई आणि आयबी, आयजी, सीएसई अभ्यासक्रमाच्या शळांना संबंधित मंडळ आणि परिषद मंडळांचे संलग्नीकरण प्राप्त करण्यापूर्वी राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते." या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना दोन तीन प्रश्न विचारु इच्छितो. गेल्या तीन वर्षात किती मराठी माध्यमाच्या शाळांनी आयसीएसई आणि सीबीएसईच्या शाळामध्ये कन्व्हर्जन होण्यासाठी शासनाकडे अर्ज केलेले आहेत ? शासन जेव्हा आयसीएसई, सीबीएसई बोर्डाच्या शाळा चालविण्यासाठी परवानगी देते त्यावेळी त्यांना कोणत्या अटी व शर्ती घातल्या जातात ? सभापती महोदय, हा सर्वांच्या अस्मितेचा प्रश्न आहे. आपल्या प्रथा आणि परंपरा त्या शाळा पाळत नसतील तर त्या शाळा बंद करा असे आम्ही म्हणणार नाही, परंतु त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी शासनाला विनंती करुन आणि या विधेयकाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे् (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2009चे वि.प.क्रमांक 4 महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक या अशासकीय विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर भावना व्यक्त करताना सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले त्या मुद्यांची पुनरावृत्ती न करता जे काही मुद्दे मांडायचे राहिलेले आहेत तेच मुद्दे मी हायलाईट करणार आहे. या शाळांमधून अगदी वेगळया पध्दतीने अभ्यासक्रम शिकविला जातो. या शाळांतून बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिकविले जात नाहीत तर बी.आर.आंबेडकर शिकविला जातो. या शाळांतून छत्रपती शिवाजी महाराज शिकविले जात नाहीत तर एस.एस.भोसला शिकविला जातो. या शाळांतून राष्ट्रपती महात्मा गांधी शिकविले जात नाहीत तर एम.के.गांधी शिकविला जातो. या शाळांतून आधुनिकीकरणाच्या नावाखाली महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे झपाट्याने पाश्चिमात्यकरण केले जात आहे. माझ्या नातलगातील एक मुलगा या शाळेमध्ये शिकून बाहेर पडल्यानंतर त्याने आपल्या आईवडिलांना घराबाहेर काढले, धर्मांतर करुन आपले घरदार उद्ध्वस्त केले. घटनेने धर्मांतर करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. तरीही या गोष्टी मी शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. आमच्या शाळांवर असलेली बंधने त्या शाळांनी देखील पाळायला पाहिजेत. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळांमध्ये प्रवेश घ्यावा यासाठी मोठमोठ्या साखर कारखान्यांना आणि शासनाला देखील परवडणार नाही अशा पानभर जाहिराती या शाळा वृत्तपत्रातून येत असतात. मार्केटिंग ॲडव्हर्टायझ ेशनची टॅक्टीक वापरुन या शाळा प्रचंड कमाई करतात. हम दोन, हमारे दो या जमान्यात पालकाला वाटत असते की अशा शाळामधून आपले मूल चांगल्या प्रकारे शिकेल. आता अब्जाधिशांच्या शाळा वेगळया, कोट्यधीशांच्या शाळा वेगळया, लक्षाधीशांच्या शाळा वेगळया आणि सर्वसामान्यांच्या शाळा वेगळया अशी स्थिती निर्माण झालेली आहे. अनियंत्रित शाळांचे पेव फुटलेले आहे. शाहू, फुले, आंबेडकरांच्या या महाराष्ट्रामध्ये ज्या मराठी माध्यमाच्या शाळा आहेत, मध्यमवर्गीयांच्या शाळा आहेत त्यांच्यावर अतिक्रमण होऊन त्या शाळा बंद पडत चालल्या आहेत. त्यांना नियंत्रित करुन आणि त्यांच्यामध्ये युनिफॉर्मिटी आणणे जरुरीचे आहे. म्हणून मी या अशासकीय विधेयकाचे समर्थन करतो आणि माझे भाषण संपवितो.

--

नंतर श्री. भोगले...

अग्रथित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी एकदा म्हटले होते की, देशातील इतर राज्यांप्रमाणेच महाराष्ट्राला भूगोल तर आहेच पण इतिहास देखील आहे. अत्रेंच्या या एका विधानाने महाराष्ट्राचे वैभव अधोरेखित करताना हा गौरवशाली इतिहास पुढे चालविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर टाकलेली आहे असे मी मानते. आपल्या राज्याच्या शैक्षणिक इतिहासाला महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यापासून भाऊराव पाटील यांच्यापर्यंत अनेक समाजसुधारकांनी अलंकृत केलेले आहे. शासनाचा साज आणि बाज आपल्याला जोपासावा लागणार आहे. नेमके याच निर्मळ भावनेने सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी हे अशासकीय विधेयक सभागृहात मांडले आहे असे मी समजते. मी त्यांना धन्यवाद देते.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्र हे अत्यंत पवित्र क्षेत्र असून त्याचे मांगल्य आणि गरिमा जपला गेला पाहिजे असे माझे ठाम मत असून त्यानुसार कार्य देखील राहिले आहे. हे सत्य आहे की, आयसीएसई, सीबीएसई आणि इतर बोर्डांवर शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे, हे कोणाला नाकारता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याच्याशी शासन पूर्णपणे सहमत आहे. म्हणूनच शासनाने दिनांक 7 ऑगस्ट, 2009 रोजी शासन निर्णय निर्गमित केला. त्यामध्ये सीबीएसई, आयसीएसई आणि इतर अभ्यासक्रम घेणारे जे बोर्ड आहेत त्यांच्या अपिलेटेड शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी ज्या निरनिराळ्या अटी लागू केल्या आहेत त्या अटींचे पालन त्यांच्याकडून होते की नाही याचा उहापोह करण्यात आला आहे. यावरुन त्यांच्यावर बंधने घालण्याचा शासनाकडून प्रयत्न झालेला आहे. मात्र ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी जे निकष ठरविले आहेत त्या निकषांना वैधानिक कक्षेत आणण्याची कार्यवाही आवश्यक आहे असे मला वाटते.......

Dr.Deepak Sawant : It is only on the paper.

Prof.Fauzia Khan : Don't say like this.

डॉ.दीपक सावंत : वैधानिक कक्षेत नसेल तर उपयोग काय? फक्त कागदावर असून चालणार नाही. कारवाई करण्याचा अधिकार आहे का?

प्रा.फौजिया खान : इतके भावनाप्रधान का होत आहात? आपण आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आता माझे म्हणणे ऐकून घ्यावे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदया जे सांगत आहेत ते चुकीचे आहे असे मला वाटते.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी काहीही चुकीचे सांगितलेले नाही. सन्माननीय सदस्यांना असे का वाटते? या बाबतीत शासनाने काय केले आणि काय करणार आहे हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. या संदर्भात संचालक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक यांच्याकडून या विषयातील तज्ज्ञ म्हणून प्रारुप प्रस्ताव मागविण्यात आला आहे. पुढील अधिवेशनात या सभागृहात विधेयकाचे सादरीकरण करणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या शाळांमध्ये राष्ट्रगीत म्हटले जात नाही, राष्ट्रीय सण साजरे होत नाहीत, राष्ट्रीय सणाची सुट्टी दिली जात नाही. या संदर्भात मला एकच सांगावयाचे आहे की, माननीय सदस्य सभागृहात जे मुद्दे मांडतात ते सत्य समजले जाते. हे खरे असले तरी अशाही काही सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या शाळा आहेत ज्या शाळांमध्ये भारतीय संस्कृती, महाराष्ट्राची संस्कृती जोपासण्यात येत आहे. तेथे सण साजरे केले जातात आणि आपल्यापेक्षा जास्त परिणामकारक आणि चांगल्याप्रकारे साजरे करतात अशा शाळा सुध्दा आहेत. We can not generalise all schools in such matters. आपल्याला जनरलाईज करुन चालणार नाही.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान.....

जर आपल्याकडे तशा स्पेसिफिक तक्रारी असतील तर अशा शाळांची नावे शासनाकडे आपण द्यावीत, त्या शाळांवर जरुर कारवाई करण्यात येईल. कारण प्रत्येक नागरिकाने राज्य आणि राष्ट्राचा सन्मान करणे हे बंधनकारकच असते आणि तसे नसेल तर It is mandatory for all citizens of this country to respect our national anthem and national flag आणि जे कोणी असा सन्मान करीत नसतील त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. पण स्पेसिफिक कोणत्या शाळा असतील त्या आपण दिल्या तर त्यांच्यावर जरुर कारवाई केली जाईल. त्याचबरोबर शासनाने अशा शाळांवर जे बंधन टाकलेले आहे ते म्हणजे तीन वर्षानंतर त्यांनी रिनोव्हेशन करावयाचे आहे त्यामुळे आपल्याला अशा शाळांना पकडणे शक्य आहे. त्यासाठी आज जरी हे कायद्यात अंतर्भुत नसले तरी यासंबंधीचा जी.आर. काढून अशा आयसीएसई, सीबीएसई वगैरे बोर्डांवर नियंत्रण आणण्याचा आपण प्रयत्न केला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी एक प्रश्न असाही उपस्थित केला आहे की, नवीन स्कुल्स ओपन करण्यासाठी किती संस्थांनी आपल्याकडे परवानगी मागितलेली आहे. ॲप्रॉक्झिमेटली 200 शाळांचे प्रस्ताव आपल्याकडे आलेले आहेत. म्हणून ज्या भावना सन्माननीय सदस्यांच्या आहेत त्याच भावना शासनाच्या देखील आहेत. अशा प्रकारे यासंबंधीचा कायदा आपण पुढील अधिवेशनात आणणार आहोत एवढेच या निमित्ताने मी सांगू इच्छिते.....

**उपसभापती** : सभागृहात विषय उपस्थित झाला म्हणून मी एक बाब निदर्शनास आणू इच्छितो की, ठाणे येथे जे.के. सिंघानिया नावाचे स्कूल आहे तेथे 2 लाख रुपये घेतल्याशिवाय ज्युनियर के.जी. ला देखील ॲडमिशन मिळत नाही. त्याच ठिकाणी पूर्वी सिंघानिया हॉस्पिटल होते आणि त्या हॉस्पिटलसाठी असलेले रिझर्व्हेशन काढण्याची त्यांनी शासनाकडे परवानगी मागितलेली आहे, ती परवानगी अशा जास्त पैसे घेणाऱ्या शाळांना शासनाने देऊ नये असे मला वाटते.

प्रा. फौजिया खान : ठीक आहे. त्याचबरोबर मला असेही सांगावयाचे आहे की, या अनुषंगाने कालच दि. 15 जुलै, 2010 रोजी शासनाने एक जी.आर. इश्यू केला त्यात आयसीएसई, सीबीएसई तसेच आयबी सारख्या सर्वच शाळांचा समावेश आहे. यासंदर्भात अधिनियम देखील करण्यात येणार आहेत आणि आपले ॲडव्होकेट जनरल यांनी सुध्दा शासनाला ॲडव्हाईस केले

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान.......
आहे की, याबाबतीत मॉडेल रुल्स तयार करुन सभागृहात आणावे. असे सांगून सन्माननीय सदस्यांनी विधेयक मागे घ्यावे अशी विनंती करते.

श्री. रामनाथ मोते : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना अशा प्रकारचा कायदा करण्याचे मनोगत व्यक्त केलेले आहे. पण आम्ही शासनाच्या अशा प्रकारच्या आश्वासनांवर किती विश्वास ठेवावयाचा असे आजवरच्या अनुभवावरुन वाटत आहे. कारण सर्वच प्रकारचे अनुभव आम्ही घेतलेले आहेत. अधिवेशन संपेपर्यंत आम्ही मंत्रिमंडळासमोर जाणार हे आश्वासन सभागृहात देऊन चार महिने झाले तरी देखील अद्यापही काहीच झालेले नाही. त्यामुळे पुढील अधिवेशनात हे विधेयक आपण सभागृहात आणणार असे आपण सांगितले त्यावर वैयक्तिक रित्या तसेच राज्य मंत्री म्हणून आमचा विश्वासही आहे पण शासनावर मात्र विश्वास नाही. म्हणून विधिमंडळात कायदा पास करण्याविषयीचे मनोगत आपण व्यक्त केले त्यासंदर्भात ब्युरोक्रसींवर मात्र आमचा अजिबात विश्वास नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

पाम बिच शाळा तसेच न्यू एरा हायस्कूल बंद पडलेले आहे. आपण त्यामध्ये मध्यस्थी केली, या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगूनही त्या शाळेच्या व्यवस्थापकीय मंडळाने नोटीसेस देऊन या शाळा बंद पाडण्याचे कारस्थान केले. या ठिकाणी सन्माननीय उपसभापती महोदयांनी सिंधानिया शाळेच्या संदर्भात माहिती दिलेली आहे.त्यामुळे अशा प्रकारच्या घटना आता दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. या शाळांची संख्या आता 2-4-8-10 वरुन शेकडोमध्ये वाढत जाणार आहे त्यामुळे आपल्याला आता कायद्यामध्ये बदल करण्याची गरज निर्माण झालेली आहे.या ठिकाणी मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, यासंदर्भात 7 ऑगस्ट, 2009 रोजी जीआर काढलेला आहे. परंतु शासनाचे जीआर आणि परिपत्रकही टिकत नाही. त्यामुळे इतर शाळांप्रमाणे या शाळांकडून नियमांची अंमलबजावणी होण्यासाठी आपल्याला कायद्यामध्येच बदल करावा लागणार आहे. कायदा तयार केल्याशिवाय, कायद्यामध्ये बदल केल्याशिवाय, या शाळांना कायद्याच्या कक्षेत आणल्याशिवाय हा विषय सुटणार नाही त्यामुळे किती दिवसात हे विधेयक सभागृहापुढे शासनाच्या वतीने आणण्यात येईल यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी ठोस असे सांगावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मला वाटते मी ठोसपणेच सांगितले आहे. पुढील अधिवेशनात यासंदर्भातील विधेयक आणले जाईल. मी स्वत: लक्ष देऊन फॉलोअप करणार आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानतो. आपण स्वत: सांगितले आहे की, ठाण्याच्या सिंघानिया शाळेत 2-2 लाख रुपये दिल्याशिवाय के.जी.च्या मुलांच्या ॲडमिशन होत नाही. पूर्वी पुणे-मुंबई येथ पर्यंत या शाळा मर्यादीत होत्या. या शाळेमध्ये प्रवेश घेणा-या मुलांच्या पालकांचा क्लास वेगळा होता. आता या शाळा हळू-हळू औरंगाबाद, लातूर, उस्मानाबाद या ठिकाणी सुरु होत आहेत. या शाळा सुरु होऊ नयेत या मताचे आम्ही नाही. या शाळेमध्ये प्रवेश कोणी घ्यावा हा त्या त्या मुलांच्या पालकांचा प्रश्न आहे,अधिकार आहे. परंतु शेवटी या शाळा महाराष्ट्रात चालतात, या शाळांवर महाराष्ट्र शासनाचा अंकुश असला पाहिजे. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाचे नियम जसे मराठी शाळा तंतोतंत पाळतात तसेच नियम या शाळांनी पाळले पाहिजे, यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. आपल्या

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

शिक्षण अधिका-याला पाहणी करण्यासाठी प्रवेश सुध्दा दिला जात नाही याची माननीय मंत्रीमहोदयांना सुध्दा कल्पना आहे. त्यामुळे यापेक्षा दुसरी कोणतीही सिरीअस बाब असूच शकत नाही. या शाळेमध्ये राष्ट्रीय नेत्यांचे फोटो लावलेच जात नाही. एवढया मोठया प्रमाणात माजखोरी या शाळा संचालकांमध्ये आहे ती कोठून आलेली आहे ? या संचालकांना आपण विचारले तर ते सांगतात की, आमचे ट्रस्टी दिल्ली,कलकत्ता, मुंबई येथे आहे त्यांनाच जाऊन आपण विचारा. या शाळामध्ये शासनाच्या सर्व नियमांची अंमलबजावणी झाली पाहिजे. तसेच या शाळामध्ये सामान्य माणसाच्या मुलालाही शिक्षण घेता आले पाहिजे, यादृष्टिकोनातून आपण ठोस उपाययोजना करणार आहात काय, तसेच यासंदर्भातील विधेयक येत्या हिवाळी अधिवेशनात आणणार आहात काय ? असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, स्पेसिफिक प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे.

श्री. रामनाथ मोते : माननीय मंत्रीमहोदयांनी जे आश्वासन दिलेले आहे त्यावर विश्वास ठेवून त्यांनी केलेल्या विनंतीनुसार मी हे विधेयक मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक,2009

L.C. BILL NO. II OF 2009

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002)

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 2- मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

सभापती महोदय, महाराष्ट्र मूल्यवर्धित अधिनियम, 2002 मध्ये चार्टर्ड अकाऊंटन्ट, आणि कॉस्ट अकाऊंटन्ट यांना लेखापरीक्षणाचा अहवाल सादर करण्याची तरतूद केली आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, गेल्या 46 वर्षापासूनची ही प्रथा होती की, अर्हता प्राप्त विक्रीकर संमत्रक हे व्यापा-यांसाठी मूल्य निर्धारण करीत होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ......

परंतु, आता नवीन धोरणानुसार चार्टर्ड अकौंटंट आणि कॉस्ट अकौंटंट यांनाच फक्त व्यापाऱ्यांचे हिशोब तपासण्यासंबंधीचे अधिकार दिले गेले. हा प्रश्न 30 ते 40 हजार व्यापाऱ्यांशी संबंधित आहे. त्या सोबत हिशोबाच्या कामाची गुणवत्ता कशी वाढवावी लागेल यासंबंधातील देखील हे विधेयक आहे. जून 2009 पासून जुलै 2010 पर्यंत हे अशासकीय विधेयक रखडले होते. ज्यांना अनुभव आहे अशा तज्ज्ञ व्यक्तींवर, व्यापाऱ्यांचा हिशोब ठेवण्याची जबाबदारी नसेल तर मग आर्थिक घोटाळे होतील. आपल्या देशात सत्यम घोटाळा झाला. काही वेळा तर कॉर्पोरेट ऑफिसेसचे सुद्धा हिशोब चुकीचे निघतात. इतर राज्यांमध्ये देखील व्हॅट लागू झाला आहे. त्या राज्यांनी अनेक सुधारणा केला आहे. एवढेच नव्हे तर आपल्या कायद्यांमध्ये त्यांनी बदल केले. गुजरात, झारखंड, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांनी त्यांच्या राज्यात विक्रीकर सल्लागारांना 1 एप्रिल 2005 पासून व्हॅट लेखा परीक्षक म्हणून मान्यता दिली. परंतु, महाराष्ट्रामध्ये 2010 साल उजाडले अजून देखील ही मान्यता मिळालेली नाही. पूर्वीच्या काळात बी.कॉम, एल.एल.बी. डी.टी.एल.ही पदविका आवश्यक मानली जात होती. म्हणजे पात्रता नसलेले लोक या क्षेत्रातील कामकाज पहात होते अशातला देखील भाग नाही. यासंबंधी महाराष्ट्र स्टेट टॅक्स प्रॅक्टीशनर्स असोसिएशनचे श्री.अप्पासाहेब शिंदे यांनी पाठपुरावा केला आहे. त्यांनी राज्यातील टॅक्स कन्सलटंटची संघटना उभी केली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, शासनाने अखिल भारतीय कॉस्ट अकौंटंट इन्स्टिटयूटच्या दबावाला बळी पडून ही दुरूस्ती केली आहे. खरे तर इन्स्टिटयूटच्या कायदा कलम 10 नुसार कॉस्ट अकौंटंट हे कुठलेही ताळेबंद, नफातोटा पत्रक परीक्षण अहवाल करण्यास प्रमाणित होत नाही. अशा वेळी जो कायदा उद्योगाला लागू आहे तोच व्यापाऱ्यांना लावून फार मोठा अन्याय टॅक्स कन्सलटंटवर केलेला आहे. तसेच टॅक्स देखील वेळेवर भरले गेले पाहिजेत. आता आपण एका बाजूला संगणकीकरण करीत आहोत. त्यामुळे आता आपण ई गव्हर्नन्स आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे विक्रीकर सल्लागारांचा अनुभव आहे, त्याचा फायदा लोकांना देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. पण त्यांना व्यवसाय करण्याचीच परवानगी नसेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ......

तर मग मात्र मोठ्या प्रमाणावर बेकारी वाढेल. म्हणून इतर राज्यांनी व्हॅटमधील कायद्यात सुधारणा करून तिथल्या विक्रीकर सल्लागारांना लिगल प्रॅक्टीशनर्स म्हणून मान्यता देऊन दिलासा दिलेला आहे. त्याप्रमाणे आपणही द्यावा अशी माझी विनंती आहे. विक्रीकर सल्लागार व लिगल प्रॅक्टीशनर्स यांचा समावेश लेखापाल या व्याख्येत करून लेखा परीक्षकांचा दर्जा द्यावा म्हणून मी हे अशासकीय विधेयक सभागृहासमोर आणले आहे. हा तात्पुरता बदल नाही. हा कायमस्वरूपी आहे. आपले आर्थिक व्यावसायिक कार्य चांगल्या प्रकारचे होण्याच्या दृष्टीने हा बदल होणे आवश्यक आहे. म्हणून मी हे विधेयक मांडले आहे. यासंबंधी सातत्याने शासनाकडे मी पाठपुरावा केलेला आहे. अशासकीय ठराव किंवा विधेयक हे पाठीमागे घ्यावेत अशी अपेक्षा असते. मी मंत्रिमहोदयांना विनंती करीन की, त्यांनी धोरणात्मक निर्णय घ्यावा. शेवटी या व्यावसायिकांना कोर्टामध्ये जाण्याचा एक मार्ग आहे. पण राज्याच्या विरोधात जाऊन कोर्टामध्ये जाण्यापेक्षा सकारात्मक दृष्टिकोन राज्य शासनाने घेतला तर तो योग्य होईल. कॉस्ट अकौंटंट, चार्टड अकौंटंट यांच्या बरोबरच विक्रीकर सल्लागार यांचा देखील समावेश अधिनियमामध्ये करावा अशा विनंती मी या अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून मांडत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 2- महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक आणलेले आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मागील चार वर्षापासून एस.टी.पी. आणि आय.टी.पी.या प्रश्नाचा पाठपुरावा करीत आहेत. महाराष्ट्रात चाळीस लाखांच्यावर व्यापारी आहेत. सन 2005 पासून सरकारने व्हॅट लागू केल्यानंतर त्या संदर्भातील ऑडीट करण्याचे काम एकट्या सी.ए.वर आले आणि तेवढ्या प्रमाणात सी.ए.ची संख्या पुरेशी नाही. खरे म्हणजे व्यापाऱ्यांच्या स्टेटमेंटचे ऑडीट एस.टी.पी.करतात, परंतु त्यावर शिक्का मात्र सी.ए.चा असतो. म्हणजे अप्रत्यक्षपणे एस.टी.पी.च काम करीत असतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे. एका बाजूला सी.ए.ची असलेली संख्या आणि दुसऱ्या बाजूला व्यापारी व उद्योजकांची असलेली संख्या याचा विचार करता व्यापाऱ्यांच्या व्हॅटचे ऑडीट त्यांच्याकडून विहित वेळेत होऊ शकेल काय ?

सभापती महोदय, एस.टी.पी. आणि आय.टी.पी.च्या प्रश्नासंदर्भात मी अनेकवेळा पत्र व्यवहार केलेला आहे. अर्थमंत्र्यांना अनेक शिष्टमंडळे भेटली आहेत. अशाप्रकारचा निर्णय घेण्यामागे कोणतेही लॉजिक नाही. पूर्वी हे काम एस.टी.पी.करीत होते म्हणजे व्हॅटचे फॉर्म भरणे, त्याचे व्हेरिफकेशन, ऑडीट व सर्टीफाय करुन ते सबमिट करणे ही कामे एस.टी.पी.च करीत होते. खरे म्हणजे तालुक्याच्या ठिकाणी इतक्या अडचणी आहेत की, तेथे काही सी.ए.नी व्हॅटचे ऑडीट करण्याच्या कामासाठी एस.टी.पी.ची नियुक्ती केलेली आहे. याचा अर्थ प्रत्यक्षात ऑडीटचे काम सी.ए.न करता एस.टी.पी. व आय.टी.पी. करीत आहेत, सी.ए.फक्त त्यांचा शिक्का मारत आहेत. अनेक प्रॅक्टीश्नर्सचे असे मत आहे की, सी.ए.कडे मोठ मोठे व्याप असतात. सेल्स टॅक्स संदर्भात व्हॅटमध्ये काही नवीन सुधारणा झाल्यास त्याची माहिती सी.ए.ना नसते आणि त्यांना ही माहिती एस.टी.पी.देतात.

सभापती महोदय, गेली 20-25 वर्षे एस.टी.पी. आणि आय.टी.पी. या क्षेत्रात काम करीत आहेत. या सरकारने केलेल्या कायद्यामुळे त्यांना यापुढे कोणत्याही प्रकारचे काम राहिलेले नाही. या विधेयकाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील जवळपास दोन लाख लोकांवर उपासमारीची वेळ येणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर......

आहे. कारण एका टॅक्स कन्सल्टन्टच्या कार्यालयात तीन-चार व्यक्ती कामास असतात. आता त्यांच्यावर बेरोजगार होण्याची वेळ आली आहे. सरकारने कलम 61 मध्ये सुधारणा केली तर तालुक्यातील व्यापाऱ्यांना त्यांचे व्हॅटचे ऑडीट वेळेवर करुन मिळून प्रॅक्टीशनर्सला देखील न्याय मिळेल आणि उद्योजकतामध्ये त्याचे स्वागत होईल. तेव्हा कलम 61 मध्ये सुधारणा करावी अशी विनंती करतो आणि सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडलेल्या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून कर सल्लागारासंदर्भात जो विषय मांडलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, मुंबई विक्री कर कायद्याखाली लेखापरीक्षणाची तरतूद नव्हती तेव्हा कर सल्लागार निर्धारण आणि अपीलसाठी हजर राहू शकत होते. सन 2005 मध्ये मूल्यवर्धित कायदा आला त्यामध्ये लेखापरीक्षण नव्याने आणले आणि कमीत कमी निर्धारण करण्याचे धोरण ठरल्याने व्यापाऱ्याने दाखल करण्याच्या लेखापरीक्षण अहवालामुळे नमुना 407 ला महत्व प्राप्त झाले.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडे्ट्टीवार ...

सभापती महोदय, खरे म्हणजे हा अहवाल परिपूर्ण आणि अचूक असावा यासाठी सी.ए. आणि आय.सी.डब्ल्यू.ए. यांनी प्रमाणित करावा अशी तरतूद करण्यात आली आहे.सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील कलम 61 मध्ये सुधारणा करण्यात यावी असे सांगितलेले आहे.आज सुध्दा विवरणपत्रे भरणे, अपील किंवा इतर कारणाच्या सुनावणीसाठी हजर राहण्याची कर सल्लागार कामे करु शकतात.फक्त लेखा परीक्षण करण्याचे अधिकार त्यांना दिलेले नाहीत. परंतु मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आय.सी.डब्ल्यू.ए. ही व्यावसायिक पदवी असून स्वतंत्र संस्थेमार्फत ती पदवी दिली जाते व त्यासाठी स्वतंत्र कोड ऑफ कॅन्डक्टस आहेत. त्यामुळे त्यांना तशा प्रकारचे अधिकार दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी जे सागितले आहे ते खरे आहे. ज्यावेळेस सी.ए.नव्हते त्या वेळेस ग्रामीण भागातील छोटया छोटया व्यापा-यांची कामे या मडळीकडून केली जात होती.कर सल्लागाराला कन्सलटंट म्हटले जाते व अशा प्रकारची कामे त्यांच्याकडून केली जावयाची. हया कामामध्ये ही मंडळी अत्यंत निपुण होती आणि या कामातून मिळणा-या पैशातून त्यांचा चरितार्थ चालत होता.त्यानंतर व्हॅटचा कायदा आला त्यामुळे या मंडळीना सी.ए.कडे सहया कराव्या लागतात. त्यासाठी त्यांना मेहनत करावी लागते आणि पैसेही मोजावे लागतात ही वस्तुस्थिती आहे.या लोकांचा व्यवसाय आज हिरावून घेतला गेला आहे.ही मंडळी अत्यंत निपुण आहेत त्यांची शैक्षणिक अर्हता कमी असली तरी त्या क्षेत्रात ती अत्यंत निपुण आहेत व कॉम्प्युटरचासुध्दा ते चांगल्या प्रकारे वापर करु शकतात. निर्धारण आणि लेखा परीक्षण यामध्ये थोडासा फरक आहे.निर्धारणाच्या पध्दतीमध्ये सबंधित व्यापा-यांनी सर्व वहया घेऊन विक्रीकर कार्यालयात जावयाचे आणि लेखा परीक्षण करुन घ्यावयाचे असे आहे.या ठिकाणी मला आपल्याला हे सांगितले पाहिजे की, लेखा परीक्षण करुन घेणे सर्व व्यापा-यांवर बंधनकारक करण्यात आलेले नाही. 60 लाख रुपयापेक्षा जास्त उलाढाल असणा-या व्यापा-यांसाठी व सर्व मद्य विक्रेत्यांसाठी बंधनकारक करण्यात आलेले आहे. लहान व्यापा-यांसाठी लेखा परीक्षण बंधनकारक करण्यात आलेले नाही. त्यामुळे सी.ए. आणि आय.सी.डब्ल्यू.ए. हे काम करु शकतात. सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे त्या म्हणण्याशी काही अंशी मी निश्चितपणे सहमत आहे.या बाबी जरी वेगळया असल्या आणि व्हॅट लागू



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वड्डेट्टीवार ..

झाल्यानंतर या लोकांवर अन्याय झालेला आहे याची जाणीव शासनाला आहे.ही सर्व मंडळी कोर्टामध्ये देखील गेली होती.कोर्टात गेल्यानंतर कोर्टाने या बाबतीत राज्य सरकारने निर्णय घ्यावा असे म्हणून हे काम राज्य सरकारावर सोडून दिले आहे. 2009 सालचे हे अशासकीय विधेयक असून मागच्या वेळी या विषयावर चर्चा होणार होती परंतु त्यावेळी चर्चा होऊ शकली नाही त्यामुळे आज या विधेयकावर चर्चा होत आहे.या संदर्भात शासन सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करीत आहे एवढेच मी आपल्याला सांगू इच्छितो. आवश्यकता वाटल्यास पुढच्या काळात या सबंधी विधेयक आणण्याची देखील शासनाची तयारी आहे. एवढया लोकांचा जर रोजगार हिरावून घेतला जात असेल त्याला रोजगार उपलब्ध करुन दिला पाहिजे. आज रोजगार मिळविण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत. ही मंडळी ग्रामीण भागामध्ये काम करणारी आहेत आणि त्यांना रोजगार मिळणे आवश्यक आहे.सी.ए. हे जिल्हयाच्या ठिकाणी असतात आणि त्यांच्या भरवशावर ही मंडळी ग्रामीण भागात काम करीत आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्याचा विचार केल्यानंतर. आवश्यकता वाटल्यास विधेयक आणण्याची सुध्दा शासनाची तयारी आहे तेव्हा येनकेनप्रकारेण या मंडळीना न्याय देण्याच्या बाबतीत सकारात्मक भूमिका घेण्यात येईल असा विश्वास मी देऊ इच्छितो.

डॉ.नीलम गो-हे : आवश्यकता वाटल्यास विधेयक आणू असे न म्हणता विधेयक आणले जाईल असे आपणं् सांगावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सकारात्मक दृष्टीने विचार करण्यात येईल व विधेयक आणण्याचा शासनाचा विचार आहे असे मी सांगितलेले आहे.या मंडळीची गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी या अशासकीय विधेयकाच्या रुपाने या ठिकाणी मांडली गेली आहे. त्यांचा प्रश्न सुटावा अशी सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे त्याचप्रमाणे माझीसुध्दा तीच इच्छा आहे. माझ्यासुध्दा मनात आपल्यासारख्याच भावना आहेत.या मंडळीनीसुध्दा स्वतंत्रपणे संघटना करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. तेव्हा त्यांनी स्वतंत्र संघटना करावी व त्याला स्वतंत्र रजिस्ट्रेशन देऊन वा त्यांना वेगळा कोड ऑफ कंडक्ट दिला पाहिजे अन्यथा शासनाने त्यांच्यासाठी काही करावयाचे म्हटल्यानंतर बाकीच्या लोकांकडून त्याला विरोध होण्याची शक्यता आहे तेव्हा या सर्व बाबीची पडताळणी करुन या लोकांना न्याय कसा देता येईल ही भूमिका शासन स्तरावर घेण्यात येईल.

नंतर श्री.सरफरे

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार...

तेव्हा माननीय सदस्यांनी आपले विधेयक मागे घ्यावे अशी मी विनंती करतो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी शासनाची सकारात्मक भूमिका जाहीर करतांना "आवश्यकता पडल्यास विचार करु" असे शब्द वापरले. त्यामुळे पुन्हा शासकीय कामकाजामधून काय साध्य होणार हा प्रश्न पडतो? तेव्हा शासनाने खरोखरच प्रत्यक्षात असे विधेयक आणून त्याव्दारे संबंधितांना न्याय देण्याबरोबर त्यामधून मनुष्य बळ किंवा मनुष्य बल संवर्धन होईल व त्यांच्या अनुभवाचा फायदा आपल्याला घेता येईल. ज्यांची आर्थिक उलाढाल 60 लाखावर आहे, त्यांच्या हिशेबाची तपासणी सी.ए.कडून करुन घेण्याबाबत नियम लावला आहे. खरे म्हणजे धर्मादाय संस्थांकडून अशाप्रकारच्या हिशेबाची आपण अपेक्षा ठेवतो ती योग्य आहे. ज्यांचे लाखोंचे व्यवहार आहेत त्यांच्या हिशेबाची तपासणी सी.ए. कडून करुन घेणे बंधनकारक केले पाहिजे. परंतु ज्यांचे व्यवहार 5 ते 10 हजाराच्या आतील आहेत त्यांचे हिशेब सी.ए.कडून करुन घ्यावयाचे झ ााल्यास त्यांना दीड ते दोन हजार रुपये फी द्यावी लागते. तेव्हा या गोष्टीचा आपण विचार केला पाहिजे. धर्मादाय आयुक्तांकडे हिशेब सादर करीत असतांना प्रत्येकाने सी.ए. कडे गेले पाहिजे. किंवा एका ठराविक उत्पन्नाच्या मर्यादेपलिकडे गेल्यानंतर त्यांनी सी.ए. कडे गेले पाहिजे याबाबत आपण विचार करावा अशी मी मंत्रिमहोदयांना विनंती करते.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, यानिमित्ताने मला एक सूचना करावयाची आहे की, आपण विधेयक आणण्याबाबत सकारात्मक विचार करु असे सांगितले. सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्सचे रजिस्ट्रेशन केले जाते. यापुढे सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्सचे नव्याने रजिस्ट्रेशन करीत असतांना त्यामध्ये त्यांना किमान पाच वर्षाच्या अनुभवाचे निकष लावण्यात आले तर आपल्याला निश्चितपणे चांगला रिझल्ट मिळेल.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच म्हटले आहे की, या सर्व बाबींची तपासणी करतांना त्यामध्ये कोणत्या प्रकारचे निकष ठरविता येतील, त्यांची अर्हता कोणती असली पाहिजे या सर्व बाबींची तपासणी करुन हे विधेयक आणता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला हे विधेयक परत घेण्यासाठी सभागृहाने अनुमती द्यावी.

विधेयक सभागृहाच्या अनुमतीने परत घेण्यात आले.

----

**सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 1 बाबत**

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांनी सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 1 - मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक नंतर घेण्यात यावे अशी विनंती केली आहे. त्यामुळे सदरहू विधेयक आता चर्चेला घेण्यात येणार नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

**पृ. शी.** : (नागरी क्षेत्र) इलेक्ट्रॉनिक कचरा (नियमन, नियंत्रण आणि विल्हेवाट) विधेयक

L.C. BILL NO. II OF 2010.

(A BILL TO PROVIDE FOR REGULATION AND CONTROL AND SYSTEMS FOR DISPOSAL OF ELECTRONIC WASTE BY MAKING THEIR REGISTRATION COMPULSORY WITH AN APPROPRIATE AUTHORITY AND PRESCRIBING NORMS AND STANDARDS FOR E-WASTE GENERATORS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO IN THE STATE OF MAHARASHTRA.)

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 2 सामुचित प्राधिकरणाकडे नोंदणी अनिवार्य करुन आणि ई-कचरा निर्माण करणाऱ्यांसाठी प्रमाणके आणि मानके विहित करुन इलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी यंत्रणा, नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक तीन वर्षापासून मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे आपण मला याठिकाणी हे विधेयक मांडण्याकरिता संधी दिल्याबद्दल प्रथमत: आपले आभार मानतो. इलेक्ट्रॉनिक कचरा आणि बाकीचा कचरा यामध्ये फार मोठा फरक आहे, तो या महाराष्ट्र राज्याला आजपर्यंत समजला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आपण नेहमीचा घरगुती कचरा गोळा केल्यानंतर तो डंपिंग ग्राऊंडवर नेऊन टाकतो. परंतु हा ई-कचरा कुठे नेऊन टाकायचा हाच खरा प्रश्न आहे? हा ई-कचरा म्हणजे नेमके काय? याला इलेक्ट्रॉनिक कचरा म्हणतात, इलेक्ट्रॉनिक वस्तूंपासून तयार होणारा कचरा म्हणतात. या कचऱ्यापैकी काही कचऱ्याचा पुर्नवापर केला जातो, त्यावर पुर्नप्रक्रिया करुन तो पुन्हा वापरला जातो तर काही वेस्ट असतो म्हणजे त्याचा कचरा होतो. तेव्हा या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता खरोखरच स्वतंत्र कायदा करण्याची गरज आहे काय? या प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. हा कायदा कशासाठी असला पाहिजे? याचे कारण हा इलेक्ट्रॉनिक कचरा पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय घातक आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/ प्रथम श्री. सरफरे.... 16:05

डॉ. दीपक सावंत ....

कॉम्प्युटर, टी.व्ही.,फ्रीज,इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स आज प्रत्येक घरामध्ये आपल्याला दिसतात. आपण बँकांचे उदाहरण घेतले तर साधारणपणे 1500 पेक्षा जास्त अधिक बँका या मुंबई शहरात आहेत. मग त्या शेडयुल्ड बँका असतील, बाकीच्या बँका असतील. या बँकामध्ये सरासरी सगळे काही कॉम्प्युटराईज्ड आहे. मंत्रालय कॉम्प्युटराईज्ड आहे. विधानमंडळ कॉम्प्युटराईज्ड आहे. पुढच्या दहा वर्षानंतर ज्यावेळी हे कॉम्प्युटर ॲब्सॉल्यूट होतील त्यावेळी ते जाणार कुठे? ते आपण कुठे फेकून देणार हा प्रश्न आज आपल्यापुढे आहे. आपल्या घरात टी.व्ही.असतो, फ्रीज असतो, इलेक्ट्रॉनिक इस्त्री असते, एअर कंडिशन मशीन असते याचे नेमके काय करायचे? ते जुने झाले की, आपण भंगारवाल्याला देतो पण भंगारवाला पुढे जाऊन काय करतो हे आपण कधीच बघत नाही. भंगारवाला कुठे जाऊन विकतो, त्याचे विघटन कसे होते हे कोणीच सांगत नाही. सभापती महोदय, सुमारे एक हजार वस्तूंपासून हा इलेक्ट्रॉनिक कचरा तयार होतो. आपण वापरलेली साधने असतात ती कदाचित पुन्हा व्यवहारात आणली जातात. त्यातील पार्टस् काढले जातात. त्यातील चांगले पीसीबी काढले जातात आणि पुन्हा नवीन संचामध्ये ते वापरले जातात. आपल्याला कदाचित माहीत नसते. आपण नवीन म्हणून त्या गोष्टी घेऊन येतो पण त्याच्या आतील पार्टस् जुनेच असतात. रीअसेंबल कॉम्प्युटर्स आपल्याला सगळयांना माहीत आहेत. रीअसेम्बल एअर कंडिशन मशीन्स हया सगळयांना माहीत आहेत पण त्यातील सगळे पार्टस् जुने असतात. म्हणून इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचा प्रश्न निकालात निघत नाही. त्यातून काही स्क्रॅप निघतो. या स्क्रॅप पासून कॉपर काढले जाते. स्टील काढले जाते. प्लास्टिक काढले जाते आणि ते विघटीत केले जाते. मग त्यातून फक्त कचरा राहतो. यामध्ये दोन वाद आहेत.

माननीय मंत्रिमहोदय, आपण ज्यवेळी यासंबंधीचा कायदा बनवाल त्यावेळी कमोडिटी आणि वेस्ट या दोन महत्वाच्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. या वस्तूंचे जे निर्माते असतील त्यांनी ते कमोडिटी आहे की वेस्ट आहे याचे डेफिनेशन करावयास पाहिजे. कमोडिटी म्हणजे विक्रेय वस्तू म्हणजे पुन्हा त्यामध्ये मायनर बदल करुन पुन्हा बाजारामध्ये घेऊन येऊ शकतो. आणि वेस्ट म्हणजे टोटल वेस्ट. म्हणजे जी फेकून देण्याच्या लायकीची गोष्ट आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर** )

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, इलेक्ट्रॉनिक वेस्ट पासून काय काय बनते? अतिशय विषारी आणि घातक असे लीड,मर्क्युरी,कॅडमिअम सारखे जे भयानक धातू आहेत. त्याचे आरोग्यावर फार भयानक परिणाम होतात असे धातू त्यातून निघतात. सभापती महोदय, पॉलीक्लोरिनेटेड व बायोफिनाईल म्हणजे पीसीबी कॉम्प्युटरमधून निघते त्यामध्ये 6% लीड असते. आपण असे म्हणतो की, पीसीबी गेला आहे. हा पीसीबी बऱ्याच वेळा पुन्हा उपयोगात येत नाही. तो असाच फेकला जातो. आणि त्यामधून लीड बाहेर पडते. या पीसीबीमधून 37 वेगवेगळे केमिकल्स निघतात. हे सगळे केमिकल्स आरोग्याला घातक असतात. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे ज्यावेळी डेव्हलप कंन्ट्रीजमधून माल इंम्पोर्ट केला जातो त्यावेळी या इम्पोर्ट मालाबरोबर अनेक गोष्टी अशा येतात की, ज्याला आपण इलेक्ट्रॉनिक वेस्ट असे म्हणतो. यासाठी कोणत्याही प्रकारचे नियम नाहीत. समजा मी चार फ्रीज मागविले असतील तर त्या चार फ्रीज बरोबर काही टन कचरा देखील येऊ शकतो. या कचऱ्याला इम्पोर्टचे देखील नियम नाहीत. म्हणून इलेक्ट्रॉनिक वेस्ट यासाठी नियम असणे महत्वाचे आहे. सभापती महोदय, सगळयात अगोदर स्वित्र्झलँडने याबाबतीत विचार केला. स्वित्र्झलँडने कां विचार केला? त्यांच्याकडे फ्रिज खूप होते त्यामुळे आता या फ्रिजचे काय करायचे हा स्वित्र्झलँड गव्हर्नमेंट समोर प्रश्न निर्माण झाला आणि त्यांनी सगळयात अगोदर यासंबंधीचा कायदा बनविला.

स्वित्र्झलँडमध्ये फ्रिज जास्त होते. इलेक्ट्रॉनिक वेस्टचा सगळयात प्रथम कायदा स्वित्र्झलँडने केला. त्यानंतर 2000 मध्ये अमेरिकेने कायदा केला. चायनाने कायदा केला पण आज पर्यंत महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचा कायदा केलेला नाही. सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, आपल्याकडे 1549 बँका आहेत. आपल्याकडे आय.टी. इंडस्ट्रिज किती आहेत? मला वाटते प्रत्येक मेट्रॉपॉलिटन शहरात आय.टी. इंडस्ट्रिज आहेत. सभापती महोदय, मोबाईल्स किती आहेत? सगळयात जास्त मोबाईल्स मुंबईमध्ये आहेत.

यानंतर श्री. बरवड...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

दिल्लीमध्ये आहेत. आपण घरांची आणि माणसांची संख्या बघितली तर प्रत्येक व्यक्तीच्या मागे एक मोबाईल असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. इतके जर मोबाईल्स असतील, इतके जर फ्रीज असतील, इतके जर टी.व्ही.असतील, माननीय मंत्रिमहोदयांनी मोजले आहे की नाही हे माहीत नाही पण 2010 मध्ये 19 हजार टन इतका इलेक्ट्रानिक कचरा जमा झाला. हा 19 हजार टन कचरा कोठे गेला याचा आपण कोठे तरी विचार करा. यामध्ये 13 हजार टन कचरा हा फक्त पी.सी.चा म्हणजे कॉम्प्युटरचा कचरा आहे आणि जवळजवळ साडेसात हजार टन कचरा घरातील हाऊसहोल्ड वस्तूंचा आहे. त्यामध्ये टी.व्ही., फ्रीज वगैरे अनेक गोष्टी आहेत. आपण यावर कधी विचार करणार ? आपण 2011 चा विचार केला तर साधारणपणे गेल्या तीन वर्षातील 4 लाख कॉम्प्युटर ॲब्सॉल्यूट होणार आहेत म्हणजे त्यांचा काही उपयोग होणार नाही. ते आपण कोठे फेकणार आहात ? ते कोणत्या भंगारवाल्याकडे देणार आहात ?

सभापती महोदय, अनेक ठिकाणी कंपन्या या ॲब्सॉल्यूट गोष्टी घेतात आणि नॉन वर्कीन्ग इक्विपमेंट म्हणून त्याची नोंद करतात आणि त्यातील वस्तू काढून नवीन उपकरणात टाकतात आणि राज्य शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवितात. इलेक्ट्रॉनिक कचरा म्हणून दिसावयास ही गोष्ट फार सोपी वाटते पण त्यामध्ये प्रचंड उलाढाल आहे. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचा प्रचंड रेव्हेन्यू जातो. सन 2004 मध्ये असे लक्षात आले की, सगळे जे असेम्बल्ड कॉम्प्युटर्स आहेत ते पुढच्या तीन वर्षामध्ये ॲब्सॉल्यूट होणार आहेत आणि ते खरोखर ॲब्सॉल्यूट झाले. मुंबईतील काही भागामध्ये माननीय मंत्रिमहोदय गेले आहेत की नाही हे माहीत नाही. पण या ठिकाणी या वस्तू विघटनाच्या इंडस्ट्रीज आहेत. माननीय मंत्रिमहोदय, आपण साकीनाका, कुर्ला, कामाठीपुरा, जोगेश्वरी, मालाड या ठिकाणी गेलात तर त्या ठिकाणी या इलेक्ट्रॉनिक्स कचऱ्याच्या इंडस्ट्रीज आहेत. आपण एकदा त्या ठिकाण्‍ाी भेट द्यावी. त्या ठिकाणी हा सगळा कचरा जमा केला जातो. आपल्याकडून भंगारवाले जे सगळे कॉम्प्युटर्स, फ्रीज घेऊन जातात ते सगळे या पाचसहा ठिकाणी जमा केले जातात. त्या ठिकाणी या वस्तूंचे विघटन केले जाते. त्यातील कॉम्पोनंट

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

डॉ. दीपक सावंत .....

रिसायकल होतात. पर्टीक्युलर जागेमध्ये कशाचे विघटन होते याची देखील माहिती माझ्याकडे आहे.

आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, साकीनाका येथे कॉम्प्युटर डिसमेंटल केले जातात. त्या ठिकाणी कॉम्प्युटरचे सगळे पार्ट वेगवेगळे केले जातात. त्यामध्ये कॅथोड रे ट्यूब असते त्याला सीआरटी म्हणतात. आपल्या मॉनिटरवर जी स्क्रीन असते, जी ट्यूब असते ती तोडली जाते. त्यातून प्लास्टीक काढले जाते आणि त्या प्लास्टीकच्या गोळ्या बनविल्या जातात. या इंडस्ट्रीकडे कोणाचेही लक्ष नाही. या इंडस्ट्रीज झोपडपट्टयांमध्ये चालतात. छोटी छोटी मुले या इंडस्ट्रीजमध्ये काम करतात. कुर्ला येथे इस्त्री वगैरे ज्या इलेक्ट्रीकच्या वस्तू आहेत त्या जमा केल्या जातात आणि त्यातून स्क्रॅप काढले जाते. कामाठीपुरा येथे डिसमेंटलींग ऑफ कॉम्प्युटरची मोठी इंडस्ट्री आहे. आपल्याला माहीत नसेल पण या गोष्टी मुंबईमध्ये होत आहेत. जोगेश्वरी येथे अशाच प्रकारे आपण जे फ्रीज विकतो ते तोडले जातात आणि त्यापासून वेगवेगळे भाग काढले जातात. या ठिकाणी दिल्ली, आग्रा, मिरत येथील व्यापारी येतात आणि यातील जे चांगले पार्ट आहेत ते करोडोच्या टनमध्ये घेऊन जातात. ते घेऊन काय करतात त्यावर कोणाचेही लक्ष नाही. आपल्याला माहीत आहे की, कुर्ला येथे मिठी नदी आहे. त्या मिठी नदीच्या किनाऱ्यावर वॉशिंग मशिन्स, झेरॉक्स मशिन्स तोडल्या जातात आणि त्या विघटित करुन त्यातील कॉम्पोनंट बाजूला केले जातात. लॅमिंग्टन रोड आपणा सर्वांना माहीत आहे. ज्यावेळी हे विघटन केले जाते त्यावेळी आरोग्याला घातक असे अनेक वायू त्यातून उत्सर्जित होतात. टी.व्ही.ची ट्यूब जर आपण तोडली तर त्यातून जी धूळ उडते त्याचा परिणाम रक्ताभिसरणावर होतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

मज्जा संस्थेवर होतो. विशेषत: लहान लहान मुलांवर होतो आणि हीच टयूब तोडण्याचे काम 17 वर्षाच्या खालील मुले करतात. या उद्योगामध्ये लहान मुले काम करीत असतात.

सध्या बाजारात एलसीडी उपलब्ध आहेत. एलसीडी म्हणजे लिक्विड क्रिस्टल डिस्प्ले. हा एलसीडी तोडला जातो. एमपी-3 प्लेअर सगळयांकडे असतो तोडला जातो. मोबाईल फोन तोडला जातो. त्यावेळी त्याचा परिणाम किडनीवर होतो. फुफ्फुसावर होतो, प्रजनन संस्थेवर होतो. गर्भातील बाळावर देखील होतो आणि तो मोठया प्रमाणावर होतो. ज्यावेळी कॉम्प्युटर तोडला जातो त्यावेळी त्यातून गॅस बाहेर पडतो, कॉपर निघते, तसेच ॲसिडचा पाऊस पडतो असे म्हणतात, तो पडण्यास सुरुवात होते. त्यातून सल्फरडाय ऑक्साईड, लीड, मर्क्युरी, अर्सेनिक व कॅडमिअम हे वायू वातावरणात जातात आणि वायूमंडळाचे हरितगृह आहे त्याला डिस्टर्ब करतात. सेमीकंडक्टर्स म्हणजे मायक्रोचीप कम्पाऊंड करतात त्यावेळी श्वसनाचे आजार होतात, किडनीचे आजार होतात, लिव्हरवर त्याचा परिणाम होतो. पीसी तोडला जातो त्यावेळी त्यातून जे प्लास्टिक निघते त्याचा थायरॉईड ग्लॅण्डवर परिणाम होतो. हे सर्व घडत असतानाही शासनाने यासंबंधी अद्याप कायदा केलेला नाही. एवढी मोठी इंडस्ट्री आहे. या इंडस्ट्रीमधून 19-20 हजार मे.टन सामान निघते. त्यातून लाखो, करोडो रुपयांची उलाढाल होते. त्यासाठी कायदा नको का ? या व्यवसायात काम करणा-यांसाठी देखील कायदा पाहिजे. त्याचे डिस्पोजल कसे करावे, ते कोठे डम्प करावे, यासाठी यंत्रणा पाहिजे, नियमन पाहिजे, यासाठी प्रमाणके, मानके ठरविली पाहिजेत. त्यासाठी हे अशासकीय विधेयक आणलेले आहे. खूप विचाराअंती, अभ्यास करुन मी हे अशासकीय विधेयक आणलेले आहे. शासनाने हे विधेयक स्पोर्टिंग स्पिरीट दाखवून जसेच्या तसे स्वीकारावे आणि कायद्यात त्याचे रुपांतर करावे अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो. आपण एकविसाव्या शतकात आहोत, परंतु हा कायदा विसाव्या शतकातच करावयास पाहिजे होता. त्यामुळे आपल्याला आधीच उशीर झालेला असल्यामुळे म्हणून आणखी उशीर न करता नोकरशाहीच्या लालफितीमध्ये न अडकता हे विधेयक जसेच्या तसे स्वीकारावे. यासाठी राज्यात जेवढया महानगरपालिका, नगरपालिका आहेत त्या सर्वांना ई-कचऱ्याच्या अनुषंगाने इलेक्ट्रॉनिक प्राधिकरणाचे अध्यक्ष कोण

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

डॉ.दीपक सावंत....

असावेत यासाठी जी समुचित रचना कशी असावी याबाबत अवगत करावे अशी मी शासनाला कळकळीची विनंती करतो. अगदी प्रेमपूर्वक हे स्वीकारावे. महाराष्ट्राच्या जनतेला वेळ घालविण्यासाठी व वापरासाठी इलेक्ट्रॉनिक वस्तू हव्या असल्या तरी त्याचे दूरगामी परिणाम विचारात घेतले पाहिजेत. कारण कोणतीही वस्तू कुजली तर त्याचा वास येतो, परंतु इलेक्ट्रॉनिक कच-याचा वास येत नाही. परंतु त्यातून निघणारे वायू, विषारी पदार्थ हे शरीरावर परिणाम करणारे असतात. पर्यावरणाचा, वातावरणाचा समतोल बिघडवित असतात तो बिघडू नये म्हणून शासनाने या अशासकीय विधेयकाचे ताबडतोब कायद्यात रुपांतर करण्यासाठी हे विधेयक स्वीकारावे अशी मी विनंती करुन मी आपली रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

प्रश्न प्रस्तुत झाला.

-----

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी इलेक्ट्रॉनिक कच-यासंबंधी सभागृहासमोर अशासकीय विधेयक मांडलेले आहे. या विधेयकाचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, खरे तर राज्यामध्ये निरनिराळी धोरणे व निर्णय जाहीर केली जातात. परंतु गेल्या 20 वर्षापासून एका विषयाची चर्चा चालू केली आहे. त्या चर्चेमध्ये विश्वाचा विचार केला जातो. कृती मात्र स्थानिक पातळीची केली जाते, म्हणजे Think Globally, Act locally. आपण ग्लोबलचा फक्त विचार करीत आहोत. परंतु यासंदर्भात आपण स्थानिक पातळीवर सुध्दा कृती करीत नाही ही त्यातील वस्तुस्थिती आहे. आपण जी कृती करतो ती वैयक्तिक स्तरावर करतो. आपण एक व्यक्ती म्हणून मोबाईल घेतो, एक व्यक्ती म्हणून कॉम्प्यूटर घेतो, घरातील गॅझ ेटस् वाढवितो. परंतु नागरी संस्कृतीमध्ये, खेडयाच्या संस्कृतीमध्ये त्याचा काय काय परिणाम होत आहे याचा मात्र आपण विचार करीत नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे....

दुसरे असे की, काही वस्तू यूज ॲण्ड थ्रो अशा पध्दतीच्या असतात. आपण एखादी गोष्ट घेतो आणि फेकून देतो ही प्रवृत्ती आपल्यामध्ये सहजगत्या भिनलेली आहे. पॅरलल नोबेल प्राईज मिळवणा-या दक्षिण आफ्रिकेतील वांगार मथाई या कार्यकर्त्यांचे भाषण ऐकण्याची संधी मला मिळाली. त्यामध्ये त्यांनी तीन आरचे महत्व वर्णन केले. पूर्वी एखादी गोष्ट नादुरुस्त झाली, बिघडली तर ती आपण रिपेअर करुन,दुरुस्त करुन वापरत होतो. अलीकडे आपण पहातो की, पादत्राणे असोत, पेन असो, ब्रश असो, चष्मा असो, घरातील वेगवेगळी आयुधे असोत, ती दुरुस्त होतच नाहीत. तेव्हा दुरुस्त होऊ शकतील अशी आयुधे, यंत्रे असली पाहिजेत जेणेकरुन अधिकाधिक उत्पादने खपविण्याचा विचार त्यामध्ये असता कामा नये. दुसरे म्हणजे रिसायकलिंग. एखादी गोष्ट वापरल्यानंतर त्यामधून दुस-या कशाची निर्मिती करता येईल हे पाहिले पाहिजे आणि तिसरे म्हणजे रिजनरेशन. एखाद्या गोष्टीमधून नवीन असे उगवू शकेल का, कोणत्या प्रकारे नवीन गोष्ट आपण निर्माण करु शकतो हे पाहिले पाहिजे. थोर समाजसेवक सन्माननीय बाबा आमटे यांच्या आनंदवन आश्रमाला आम्ही भेट दिली त्यावेळी तेथील एक मोठा सेक्शन पाहून आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. वापरलेल्या एक्स-रे फिल्म्स मधून त्यांनी सुशोभित वस्तू तयार केल्या होत्या. मला या निमित्ताने सांगायचे आहे की, हा ई-कचरा व्यक्तीपुरता मर्यादित नाही. राज्य शासनाने त्याबाबतीत धोरण ठरविले पाहिजे. ठिकठिकाणी कचरा डेपोवरुन जसा वाद तयार होतो तशी व्यावसायिक आपत्ती, ऑक्युपेशनल हझ ार्डस् यामधून तयार होत राहील. या अशासकीय विधेयकाच्या वेळी सदनामध्ये फार कमी सदस्य उपस्थित आहेत. तरीही मला असे वाटते की, चांगला विचार करणारे लोक सुरुवातीला थोडे असतात आणि नंतर हळुहळू त्यांच्या बाजूने बहुमत वळते. तेव्हा या विधेयकातील तरतुदी प्रत्यक्षात आणण्यासाठी महानगरपालिकांनी छोटे छोटे प्रकल्प राबविणे गरजेचे आहे. तसेच जे लोक इनोव्हेटिव्ह मेथडस् वापरतात, वेगवेगळे मार्ग वापरतात त्यांचा अवलंब करुन राज्यस्तरावर आपल्याला कशा पध्दतीने धोरण आखता येईल याचा गांभीर्याने विचार करायला पाहिजे. हा केवळ राज्य शासनाचा एकट्याचा प्रश्न नाही. कारण इथे येणारी प्रॉडक्स परदेशातून येत असतात. मध्यंतरी मी एक कॉफीची जाहिरात पाहिली. त्या जाहिरातीमध्ये त्यांनी ती कॉफी का वेगळी आहे हे सांगितले होते. त्या कॉफीची दुकाने मला सगळीकडे दिसली.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...

एक विशिष्ट प्रकारच्या प्राण्याच्या विष्टेतून बिया बाहेर काढल्या जातात आणि त्यावर प्रक्रिया करुन कॉफी जगभर विकली जाते. लोक देखील अशा कॉफीमागे धावतात. अशा प्रकारची कॉफी जगभर विकली जाते हे वाचून मला आश्चर्य वाटले. त्यांना वेडे म्हणायचे की शहाणे म्हणायचे हे कळत नाही. त्या बिया मिळविण्यासाठी त्या प्राण्यांची अनेक ठिकाणी पैदास केली जाते आणि मग ती कॉफी सगळीकडे विकली जाते. तेव्हा जागतिक ब्रॅण्डच्या नावाखाली आपण जे काही स्वीकारतो त्याच्या पाठीमागे काय असते हे आपण समजून घेतले पाहिजे. परदेशात ज्या ब्रॅण्डना बंदी आहे ते ब्रॅण्ड आपल्या देशात आणून ते आपल्या माथी मारले जातात. म्हणून याबाबतीत राज्य शासनाने सजग धोरण ठेवल्या शिवाय आपण भारताच्या संस्कृतीचे रक्षण करु शकणार नाही असे मला वाटते. धन्यवाद.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि अतिशय आवश्यक असणारे इलेक्ट्रॉनिक कच-याची विल्हेवाट आणि नियंत्रण करण्यासाठीचे जे अशासकीय विधेयक आणलेले आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक मांडत असताना सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जी सांख्यिकी माहिती सदनाला सादर केली आहे ती शासनाला आणि तुम्हा आम्हा सर्वांनाच अंतर्मुख करणारी आहे. आपल्या भाषणामध्ये त्यांनी इलेक्ट्रॉनिक कचरा म्हणजे एक हजार वस्तूपासून तयार होणारा कचरा असा उल्लेख केला. अजूनही विविध प्रकारची अप्लायन्सेस निर्माण होत असून त्यांचाही आकडा वेगाने वाढत आहे. या विविध अप्लायन्सेसचा पुढे कचरा निर्माण होऊन ई-कच-यामध्ये वाढ होणार आहे. या कच-यामुळे निर्माण होणारे प्रदुषण, नानाप्रकारचे आजार आणि त्यांचे गांभीर्य शासनाच्या आणि या सदनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. या गोष्टी विचारात घेतल्या तर या विधेयकाची अंमलबजावणी किती तातडीने करायला पाहिजे हे लक्षात येते. नेमेची येतो मग पावसाळा या प्रमाणे अशा प्रकारचे विधेयक या अधिवेशनात नाही तर पुढच्या अधिवेशनात आणू, किंवा पुढच्या पाच वर्षात आणू असे सांगून इतक्या ढिलेपणाने या प्रश्नाचे गांभीर्य घेऊन चालणार नाही. या ई-कच-याचे रिसायकलिंग करुन त्यामधून नवीन निर्मिती ....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.........

कसे होते, काय होते यासाठी तज्ज्ञांची समिती नेमून त्यांच्या माध्यमातून अभ्यास करुन विधेयक आणून ते मंजूर करण्याची नितांत आवश्यकता आहे असे मला वाटते. या संदर्भात प्रशासकीय आणि राजकीय विचारसरणीचा भाग महत्वाचा आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आणलेले अशासकीय विधेयक असल्यामुळे ते नामंजूर करावयाचे असते, ते विथड्रॉ करावयाचे असते. शासनाच्या पठडीमधून ते मांडावयाचे असते. शासनाच्या धिमेपणाच्या पध्दतीने मांडायचे असते हा प्रकार या विधेयकाबाबत सरकारने करु नये अशी मी कळकळीची विनंती करतो. हे विधेयक स्वीकारुन पुढे यामध्ये काय सुधारणा करावयाच्या असतील त्या करण्याचा प्रयत्न करावा. परंतु हे विधेयक स्वीकारण्यात यावे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपल्या भाषणातून अनेक बारकावे लक्षात आणून दिले आहेत. या संदर्भात अभ्यास गट निर्माण करुन शासनाने परिपूर्ण विधेयक आणून ते मंजूर कसे करता येईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. हे विधेयक मागे घेण्याची विनंती न करता आहे त्या परिस्थितीत ते स्वीकारुन पुढे विस्तारीकरण करावे अशी विनंती करतो. सवतीचे असते ते नाकारायचे असते हा भाग आपल्या मनामध्ये असतो, तसे करु नये अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून चर्चा उपस्थित केली आणि या विधेयकाला अनुमोदन देण्याचे काम सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे आणि सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी केले आहे.

सभापती महोदय, या विषयाचे गांभीर्य आपल्याला समजून घ्यावे लागेल. या विषयाबाबत सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना लक्षात घेऊन शासनाने गांभीर्याने या पुढच्या काळात नेमके काय धोरण आखले आहे, सध्याच्या वस्तुस्थिती काय आहे हे सभागृहासमोर येणे गरजेचे आहे. थोडे मागे वळून पाहिले तर पर्यावरणाबाबत कायदा अस्तित्वात केव्हा आला? यापूर्वी पर्यावरणाबाबत कायदा असावा, किंबहुना या संदर्भात एन्फोर्समेंट असावे अशी आवश्यकता नाही अशी सर्वांची समजूत होती. परंतु भोपाळ वायू गळतीच्या घटनेनंतर या विषयाचे गांभीर्य लक्षात आले आणि 1986 साली देशाच्या पातळीवर कायदा आणण्याचा प्रयत्न झाला. पर्यावरण कायदा आणि त्या अंतर्गत एन्फोर्समेंटची भूमिका स्वीकारण्याचा प्रयत्न झाला. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे इतर देशांची प्रगती झाली तशी आपल्या देशाचीही हळूहळू प्रगती झाली. त्यानुसार या कायद्यामध्ये वेळोवेळी बदल घडविण्याचे काम केंद्र शासनाच्या पातळीवर करण्यात आले. 2008 साली रुल्स फ्रेम करण्यात आले त्यावेळी आपण 21 व्या शतकात पदार्पण करीत होतो. 21 व्या शतकात पदार्पण करीत असताना यापुढच्या काळात हाय टेक्नॉलॉजी किंवा ई-टेक्नॉलॉजी क्षेत्राचा विचार करुन 2008 साली केंद्र स्तरावर रुल्स तयार करण्याचे काम करण्यात आले. सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली चिंता रास्त आहे. त्यांनी तीन-चार महत्वाच्या गोष्टींकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. ई-समस्या म्हणून आज या प्रश्नाकडे बघण्याचा प्रयत्न केला नाही तर कदाचित भविष्यकाळात याचे दुष्परिणाम मानव जातीला भोगावे लागतील की काय अशी भीती व्यक्त करण्यात आली. ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही. दुर्लक्षित असलेल्या ई-वेस्टच्या समस्येवर सन्माननीय सदस्यांनी प्रकाश टाकण्याचे काम केले आहे. त्यांनी सांगितले की, 19 हजार टन ई-वेस्ट निर्माण होत आहे. त्यापैकी काही प्रमाणातील ई-वेस्टचे रिसायकल करण्याचे काम केले जाते. याची नेमकी वस्तुस्थिती काय आहे? काय जाणून घेतले पाहिजे? काय केले पाहिजे? यासाठी शासन स्तरावर विचार करण्यात आला असून केस स्टडी म्हणून अभ्यास गट निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अभ्यास

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 16:25

श्री.सचिन अहिर.......

गटाच्या माध्यमातून सर्व्हे करण्याचा प्रयत्न केला असून त्याबाबतची आकडेवारी मी सभागृहासमोर मांडणार आहे.

मुंबई महानगरपालिका तद्वत पुणे, पिंपरी-चिंचवड या भागात मोठया प्रमाणात आय.टी.क्षेत्राचा विस्तार होत असल्यामुळे या दोन ठिकाणी प्रायोगिक तत्वावर सर्व्हे करण्याचे काम केले आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .......

त्यानुसार मुंबईत सध्याच्या स्तरावर 23211 टन कचरा दरवर्षी निर्माण होतो आणि पुणे-पिंपरी-चिंचवड परिसरात हा कचरा 1970 टन एवढा तयार होतो. भविष्यात देखील अशीच परिस्थिती राहिली तर सन 2015 मध्ये 50 हजार आणि 35 हजार टन हा आकडा देखील पार होऊ शकतो, हे आपण नाकारु शकणार नाही. ज्या पध्दतीने आपला देश प्रगतीशील आहे तसेच देशात आपले राज्य प्रगतीशील आपण म्हणतो तेव्हा नवीन नवीन टेक्नॉलॉजी सुध्दा ॲडॉप्ट करण्याचा प्रयत्न होत असतो. ती टेक्नॉलॉजी कधी ना कधी कालबाह्य होत असते. आपली संस्कृती अशी आहे की, एकदा टी.व्ही. घेतल्यानंतर तो 10 वर्षे वापरतो. दुसरा टी.व्ही. घेतला तरी दुसऱ्या रुममध्ये आपण लावतो, शक्यतोवर फेकून देत नाही. अशा प्रकारे ईलेक्ट्रॉनिक्सचे प्रॉडक्ट दर 6 महिन्यांनी चेंज होत असतात. समजा आपण एखादा मोबाईल घेतला आणि बाजारात एखादे नवीन मॉडेल आले तर आपल्याला वाटायला लागते की आपण जी वस्तू घेतली त्यात चूक झाली म्हणून आपण ती नवीन वस्तू घेत असतो, जुनी वस्तू हा कचरा म्हणूनच भर पडते. अशा प्रकारे ग्लोबलायझेशनमुळे नवनवीन टेक्नॉलॉजी विकसित होत असते हे आपण नाकारु शकणार नाही. त्याचबरोबर अशा वस्तूंची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने जुन्या वस्तूंच्या वेस्टेजमध्ये सुध्दा वाढ होत आहे. त्याचबरोबर दुसरी भीती सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे की, केवळ वस्तूंच्या निवडीपर्यंत विचार करुन चालणार नाही तर त्याचे दुष्परिणाम सुध्दा मानव जातीवर भविष्यात होणार आहेत, याचेही भान ठेवावे लागणार आहे. मग आपण लिडचा उल्लेख केला, मर्क्युरी तसेच कॅडमियमसारख्या धातूंचाही उल्लेख केला. अशा प्रकारे या वस्तूंचा वापर झाल्यानंतर त्या डिस्ट्रॉय केल्या तरी हे धातू जमिनीत वितळतात आणि भविष्यात त्याचा परिणाम जमिनीतील पाण्याच्या स्त्रोतांवर होण्याची शक्यता असते. परिणामी जमिनीतील पाणीही दूषित होऊ शकते व त्याचा परिणाम शेतीवर होऊ शकतो, हे देखील यासंदर्भात केलेल्या अभ्यासाच्या माध्यमातून समोर आले असून ही वस्तुस्थिती नाकारण्याची भूमिका शासनाची नाही. या सर्व गोष्टी करीत असताना काही बाबतीत वस्तुस्थिती निदर्शक काम चालले आहे त्यात कुर्ला, साकीनामा अथवा मालाड वगैरे भागात ई-वेस्टेजच्या डिस्पोज-अप ई-पध्दतीने भंगार म्हणूनच युटिलाईज्ड करण्याचे काम करण्यात येते. हे थांबविणे शासनाचे कर्तव्य आहे म्हणून सन्माननीय सदस्यांना मी या माध्यमातून सांगू

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .......

इच्छितो की, अशा प्रकारे ज्या ज्या ठिकाणी काम होते, तेथे नेमके काय चालले आहे त्यावर अंकुश कसा ठेवता येईल हे काम शासन या वर्षभरात करणार आहे.

आपण बोलताना अनेक देशांची सुध्दा नावे घेतली. त्या देशांमध्ये वेगवेगळ्या माध्यमातून ई-वेस्टच्या माध्यमातून असा कायदा करण्याचे काम केले आहे. तसेच प्राधिकरणाबद्दल बोलत असताना त्या प्राधिकरणाला निधी देऊन त्या माध्यमातून हे काम करावे व त्यावर मॉनिटरिग करण्याची आवश्यकताही असल्याचेही आपण सांगितले. कॅलिफोर्नियामध्ये ई-कचऱ्याच्या बाबतीत काय केले आहे त्याच धर्तीवर हे काम करावे, अशी सूचना आपण केली आहे. संपूर्ण देशाचा विचार करता आपले राज्य प्रगतीशील आहे आणि हाच प्रो-ॲक्टीव्हनेस पुढे घेऊन जावा, अशीही आपण सूचना केली असून ही कल्पना देखील अयोग्य नाही असे मला वाटते. कारण पुढील काळात हे करण्याची गरज भासणारच आहे. यापूर्वी सन 2008 मध्ये ज्यावेळी केंद्रशासनाने याबाबतचे रुल्स तयार केले होते त्यावेळी हजार्डस वेस्ट असलेल्या ज्या इंडस्ट्रीज आहेत त्यातील वेस्टेज आयडेंटिफाय करण्याचे काम केले होते. या सर्व सूचनांमध्ये एक बदल असा लिहिला होता की इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रॉनिक गुड्समधून तयार होणारे वेस्टेज..

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ KTG/ 16:35

श्री. सचिन अहिर......

इलेक्ट्रॉनिक कचरा हा हॅजर्डस् वेस्टमध्ये समावेश करण्याचे काम केन्द्र सरकारच्या रुल्सच्या धर्तीवर करण्याची भूमिका आम्ही घेतली. ज्यावेळेस यासंदर्भात शेडयूल तयार केले त्यावेळेस त्यामध्ये सर्व प्रकारच्या वेस्टचा समावेश करण्याचे काम करण्यात आले. घरात वापरल्यो जाणा-या छोटया छोटया इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्याही पुढे जाऊन इलेक्ट्रॉनिक्सची वेगवेगळी यंत्रे, पार्टस् यांना आयडेन्टीफाय करण्याचे काम व्हावयास पाहिजे होते, ते झाले नाही हे आपण नाकारु शकत नाही. आता सन 2008 मध्ये केन्द्र सरकारच्या ॲक्टच्या धर्तीवर काम केल्यानंतर त्याची जलद गतीने अंमलबजावणी करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे. हा हॅजार्डस् वेस्ट कंपनीमधून बाहेर जात असतांना तो बरोबर जातो आहे की नाही याबाबत सन्माननीय सदस्यांनी भिती व्यक्त केलेली आहे. त्यामुळे या हॅजार्डस् वेस्टच्या संदर्भात राज्य शासनाने पुढाकार घेतला व 50 कोटी पेक्षा जास्त खर्च करुन हा सर्व इलेक्ट्रॉनिक्स कचरा इंडस्ट्रीज डिपार्टमेंट कडून एकत्रित करुन त्याचे डिस्पोज करणारे सेंटर्स सुरु करण्याचे काम केले आहे. तळोजा, रांजणगाव, बुटीबोरी तसेच इतर ठिकाणी असे सेंटर्स तयार केलेले आहेत. या सेंटर्समध्येच ई-वेस्ट टाकावा लागेल यासंदर्भात कम्पलशन केल्याशिवाय हे काम होणार नाही. त्या त्या परिसरातील, जिल्हयातील ई-वेस्ट त्या त्या सेंटर्समध्ये जाऊन विल्हेवाट लावली पाहिजे, अशी भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे. असेही लक्षात आले की, हा हजार्डस् वेस्ट कंपनीमधून तर घेऊन जातात पण तो दुसरीकडेच टाकून देतात. तेव्हा याबाबत कोणती टेक्नॉलॉजी वापरावी याबाबत विचार करेला व नवीन प्रयोग करण्याचा प्रयत्न केला व ट्रॅक डॉटकॉम इन्ट्रोडयूस करण्याची भूमिका घेतली व जेवढे कंटेनर्स किंवा ट्रक हा हजार्डस् वेस्ट घेऊन जातात त्या सर्व वाहनांवर जीपीएस सिस्टम बसवली आहे. हा प्रयोग एमपीसीबी बोर्डाने केलेला आहे. त्यामुळे हे कन्टेनर्स कंपनीतून निघाल्यानंतर ते बरोबर सेंटर्सवर गेले की, नाही किंवा मध्येच थांबले तर त्यासंदर्भातील माहिती आपल्याला समजते. जीपीएसचे सॉफ्टवेअर लावण्याचे आपण प्रत्येक कन्टेनर्सवर कम्पलशन केलेले आहे तसेच ट्रॅकींग ठेवण्याचे सुध्दा काम केलेले आहे. मी स्वत: या ट्रॅक डॉट कॉमच्या सॉफ्टवेअरचे उद्‌घाटन केले असून ते ऑब्झर्व्ह सुध्दा केलेले आहे. हे कन्टेनर्स हजार्डस् वेस्ट घेऊन जात असतांना मध्येच थांबले तर, हा कन्टेनर्स कोठे थांबला, का थांबला याची चौकशी करण्याचे, त्या ठिकाणी भेट देण्याचे काम आरओचे आहे. तसेच कन्टेनर्स हजार्डस् वेस्ट घेऊन जात असतांना मध्येच हा कचरा

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ KTG/ 16:35

श्री. सचिन अहिर......

टाकला गेल्याच्या घटनाही उघडकीस आलेल्या आहेत. केवळ कायदा करुन नाही तर प्रोॲक्टव्हली आपल्याला करता येईल ते सुध्दा आपण केलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. हजार्डस् वेस्टची व्याप्ती वाढते आहे. या राज्यात पुढील काळात ई-वेस्ट कचरा मोठया प्रमाणात वाढल्यावर कायद्याने बंधन आणू शकतो काय, याचा विचार शासन करीत आहे. मुंबई शहरात आज घरातून जो काही कचरा निघतो, त्या कच-यापासून सुध्दा पैसे मिळू शकतात. या कच-यापासून वीज व खत मिळू शकते. ई-वेस्ट नष्ट करण्याच्या संदर्भात राज्य शासन केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करीत आहे. मला सांगण्यास आनंद होतो आहे की, केंद्र सरकारशी यासंदर्भात पाठपुरावा केल्यानंतर केंद्र शासनाच्या लक्षात आले आहे की, प्रगतीशील देशात आपल्याला प्रोॲक्टीव्ह होऊन काम करावे लागणार आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर...

ही देखील राज्य शासन म्हणून आपली इच्छा होती. त्यादृष्टीने केंद्र शासनाशी पत्रव्यवहार केला आणि पाठपुरावा देखील केला. आम्ही पाठपुरावा केल्यामुळे केंद्र शासनाच्या लक्षात आले की, प्रगतिशील देशामध्ये, राज्यामध्ये काही तरी प्रोॲक्टीव्हली काम करावे लागेल. ई वेस्टसंबंधी कायद्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करावी लागेल. त्यामुळे केंद्र शासनाने मे 2010 मध्ये नवीन अधिसूचना काढून एक मसुदा देशासमोर ठेवण्याचे काम केले आहे. हा मसुदा वेबसाईटवर अपलोड केलेला आहे. त्यामुळे तो वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. माझ्याकडे ती कॉपी आता उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांना ती पाहिजे असेल तर ती देण्याचीही माझी तयारी आहे. केंद्र शासनाने सदर मसुद्यावर सूचना, हरकती व शिफारशी करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत दिलेली आहे. एखाद्या उद्योगाला पॉईंट आऊट करून चालणार नाही अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली आहे. रिसायकल सारख्या गोष्टीसुद्धा कायद्याच्या कक्षेत आपण आणणार आहात काय ? असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. सुरूवातीला इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रॉनिक्स टुल्स यांचाच अंतर्भाव होता. आता सर्वांना त्यात समाविष्ट करता येईल काय असा प्रश्न होता. ते काम करण्याची भूमिका आता केंद्र शासनानेच घेतली आहे. हा जो मसुदा आहे तो कोणाला लागू होणार आहे ते मी आता सांगतो. " It will be applied to every Producers, Dealers, Collection Centres, Re-furbishers, Dismantlers, Recyclers, Auctioners & Consumers." या सर्वांना हे लागू राहील. राज्य शासनाच्या प्रयत्नामुळे देश पातळीवर स्कोप वाढविण्याचे काम आपण करीत आहोत. पूर्वी हा विषय फक्त उत्पादनासंबंधी मर्यादित होता तो आता इतर घटकांना देखील कायद्यान्वये लागू करणार आहोत. आता आपण ई वेस्टची कॅटेगरी बदलण्याचे काम देखील केले आहे. यात आपण लार्ज हाऊसहोल्ड अप्लायसेन्स समाविष्ट करण्याचे काम केले आहे. त्यामध्ये कोणकोणत्या गोष्टी येतात हे आपणा सर्वांना माहिती आहे. यात रेफ्रिजरेटर,वॉशिंगमशिन,कुकींग रेंज आदि वस्तू समाविष्ट होतात. हा विषय पूर्वी कंपनीपुरता मर्यादित होता. यात आपण हाऊसहोल्ड अप्लायन्सेस समाविष्ट करण्याचे काम केले. स्मॉल हाऊसहोल्ड म्हणजे व्हॅक्युम क्लिनर,किचनसाठी वापरण्यात येणारे लहान

श्री.सचिन अहिर...

अप्लायन्सेस सह सर्व लहान लहान वस्तू यात समाविष्ट करण्याचे काम केले आहे. एवढेच नव्हे तर डिजिटल क्लॉक व त्यांचे सेल तसेच बाजारात येणारी नवनवीन प्रकारची इलेक्ट्रॉनिक खेळणी यांचा देखील समावेश केला आहे. हा विषय ठराविक लीड पुरता मर्यादित नाही. अनेक प्रकारचे लीड असतात. उदा. ड्राय ऑक्साईड, वेस्ट लीड, लीड ऑक्साईड, मर्क्युरी, इ.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर..

अशा प्रकारच्या हजार्डसमधून लिकेजेस होऊ शकतात आणि त्यातून भविष्यकाळात नुकसान होऊ शकते. किंबहुना मनुष्यजातीचे नुकसान होऊ शकते. तेव्हा कायदा करुन गप्प न बसता या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याची जबाबदारी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळावर टाकलेली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने इतरांशी कशाप्रकारे समन्वय साधला पाहिजे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची काय जबाबदारी आहे, याचा या ड्राफ्टमध्ये विचार झालेला आहे. या संदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण विभाग काम करीत आहे असे नाही तर माहिती व तंत्रज्ञान विभाग देखील ई कचऱ्याची कशाप्रकारे विल्हेवाट लावावी या संदर्भात विचार करीत आहे आणि यासर्व बाबी ड्राफ्टमध्ये आलेल्या आहेत.

मी अगोदर सांगितल्याप्रमाणे सन 2008 मध्ये हे सर्व रुल्समध्ये होते. पहिल्यांदाच देश पातळीवर कोणत्याही प्रकारचे रुल्स न करता ई-कचऱ्यासाठी अधिसूचना आणण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतल्यामुळे केंद्र सरकारने मे 2010 मध्ये हा ड्राफ्ट इन्ट्रोड्युस केलेला आहे. आपली कितीही मानसिकता असली तरी आपल्याला एका कार्यपध्दतीमध्ये राहून काम करावे लागते. केंद्रीय व राज्य कायद्याच्या अधीन राहून आपणास काम करावे लागते. कायद्यातील तरतुदींच्या बाहेर जाऊन काम करण्याची शासनाची मानसिकता नसते. सन्माननीय सदस्यांचा विचार चांगला आहे आणि तो काही राज्यात यशस्वी झालेला आहे. कॅलिफोर्नियामध्ये तो यशस्वी झाला आहे. परंतु कॅलिफोर्निया फेडरल आहे. कॅलिफोर्नियाला देशाचा दर्जा दिलेला आहे. ज्यांना स्वत:चा कायदा आणि सुव्यवस्था असेल किंवा ॲक्ट असेल त्यांना अशाप्रकारचा कायदा आणण्याचा अधिकार आहे. परंतु आपण घटनेनुसार काम करतो. देशाला 21 व्या शतकासाठी लागणारा ई कचरा कायदा आपल्यासमोर येत आहे त्यामध्ये आपण सर्वांनी सहभागी होऊ या. केंद्र शासनाचा कायदा आल्यानंतर आपल्या रुल्समध्ये काही बदल करायचे असतील किंवा आपल्याला काही दिशा व मार्गदर्शन पाहिजे असेल तर ते निश्चितपणे सन्माननीय सदस्यांकडून घेण्यात येईल किंवा त्यांच्या सूचनांचा विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी विनंती करतो की, या ड्राफ्टमुळे आपला हेतू साध्य होणार आहे. तेव्हा मी आश्वासन देण्याची काही गरज नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर..

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, " Think Globally Act Locally." ग्लोबली ॲक्ट आला आहे,तो आपण मिळून लोकली करु, एवढे या निमित्ताने सांगून सन्माननीय सदस्यांनी त्यांचे विधेयक मागे घ्यावे, अशी त्यांना मी विनंती करतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी विश्लेषणात्मक माहिती दिली असली तरी अजून एक-दोन प्रश्न शिल्लक राहतात. माननीय मंत्रिमहोदयांनी येथे सांगितले की, या संदर्भात केंद्र सरकारचा कायदा येत आहे. परंतु प्रत्येक राज्यात वेगवेगळी परिस्थिती असते. एखादा इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे रि-सायकलींग व्यवस्थित करीत नसेल किंवा चुकीचे करीत असेल तर त्यास आपण कोणत्या कायद्याखाली शिक्षा करणार आहात ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ..

किंवा त्यांच्याविरुध्द आरोपपत्र दाखल करण्यासबंधी आपल्याकडे आज कोणताही कायदा नाही. त्यासबंधी क्रिमिनल ॲक्टमध्ये कोणतीही तरतूद नाही .तेव्हा या साठी स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता आहे. केन्द्र सरकारने या संदर्भात कायदा तयार केल्यानंतर कदाचित राज्य सरकारने कायदा तयार करावा. अशा प्रकारे कायदा करण्याचा विषय राज्य सरकारने आपल्यासमोर ठेवावा. राज्याच्या दृष्टीकोनातून जरी थिंक ग्लोबली आणि ॲक्ट लोकली असली तरी लोकल सोडून ग्लोबलमध्ये जाता येत नाही कारण लोकलमधील माणूस लोकलमध्येच असतो.तेव्हा अशा प्रकारे कायदा करण्याचा राज्य सरकार विचार करणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, 1986 साली पर्यावरणासंबंधात आपण कायदा केला होता त्या कायद्यातील कलम 15 नुसार हजार्डस वेस्टच्या शेडयुलमध्ये ज्या गोष्टी आहेत त्याबाबीमध्ये जर कोणी दोषी आढळून आले तर त्याला एक लाख रुपये दंड आणि पाच वर्षे तुरुंगवासाची शिक्षा करण्यासंबंधी तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर या विषयी भविष्यात कायदा करण्यात आल्यानंतरसुध्दा या प्रोव्हिजन अंतर्गत सबंधिताविरुध्द कारवाई करण्याचे काम आपण करु शकू.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अशासकीय विधेयक हे सवतीचे असते अशी सभागृहाची परंपरा आहे. त्याप्रमाणे आपला सन्मान राखून हे विधेयक मी मागे घेऊ इच्छितो.त्यामुळे हे विधेयक मागे घेण्यासाठी मला सभागृहाने अनुमती द्यावी.

श्री.सचिन अहिर : परंपरेचा उल्लेख आपण का करीत आहात ?

डॉ.दीपक सावत :या संदर्भात ज्या दिवशी परिपूर्ण कायदा होईल त्या दिवशी सभ्ंागृहामध्ये मी आपले अभिनंदन करीन त्याचबरोबर आपले आभार देखील मानीन. तोपर्यत मी आपल्याला शुभेच्छा देतो.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.परशुराम उपरकर )** :सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 19 जुलै 2010 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 4 वाजून 52 मिनिटांनी,सोमवार दिनांक 19 जुलै 2010 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यत स्थगित झाली ).

----------------

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही